# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र

**(International Economics)**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून

**एम. ए. भाग-२ : सत्र-४**

**अर्थशास्त्र :**

EC-7 (Compulsory Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
**सुधारित आवृत्ती :** २०२३
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : २५०**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-77-9

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ अर्थशास्त्र अभ्यासमंडळ ■

अध्यक्ष – **डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, मलकापूर, ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

- **डॉ. विद्यावती प्रल्हाद कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. पी. एस. कांबळे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मनोहर आप्पासाहेब कोरे**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
- **डॉ. प्रकाश कृष्णा टोने**
  सावित्रिबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. किरण शंकर पवार**
  सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगुड,
  ता. कागल, जि. कोल्हापूर
- **डॉ. सचिन आप्पासाहेब सरदेसाई**
  राजा श्रीपतराव भगवंतराव महाविद्यालय, औंध,
  जि. सातारा
- **डॉ. प्रभाकर तानाजी माने**
  जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर
  शिरोळ-वाडी रोड, जयसिंगपूर, जि. कोल्हापूर
- **डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**
  मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. हणमंत एन. कठारे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  राजाराम कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. रमेश गणेशराव दंडगे**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. मोहन गोविंद सदामते**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड कॉलेज, कुंडल,
  जि. सांगली
- **श्री. मोहन नरहर पंडितराव**
  यशोदीप ८५, मंगेशकर नगर, सुभाष रोड,
  मंगळवारपेठ, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एम. ए. भाग-२ अर्थशास्त्र या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१४-१५ पासून सत्र पद्धती सुरू आहे. त्या अनुषंगाने 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सत्र ४ साठी लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, कोष्टके, गणितीय सूत्रे, आकृत्या इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, क्षेत्रीय अभ्यासासाठी विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या विषयातील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्याचे मोजमाप, व्यापारातील हस्तक्षेपाचे सिद्धांत, व्यवहारतोल आणि आर्थिक एकीकरण सिद्धांत या घटकांचे सविस्तरपणे विश्लेषण केलेले आहे.

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. त्याबद्दल घटक लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**

प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,

प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड-मलकापूर,

ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र**
**एम. ए. भाग–२ : आवश्यक पेपर**–EC-7

## अभ्यास घटकांचे लेखक



| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **प्रा. डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव | १, ३ |
| **डॉ. प्रसाद दावणे**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | १ |
| **प्रा. डॉ. आण्णा काका पाटील**<br>अर्थशास्त्र विभाग,<br>सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | २, ४ |

■ संपादक ■

**डॉ. जयवंत शंकरराव इंगळे**
प्राध्यापक आणि अर्थशास्त्र विभागप्रमुख,
प्रा. डॉ. एन. डी. पाटील कॉलेज, पेरीड–मलकापूर,
ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत | १ |
| २. | आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्याचे मोजमाप | २८ |
| ३. | व्यापारातील हस्तक्षेपाचे सिद्धांत | ६१ |
| ४. | एकीकरण सिद्धांत | ८८ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

# आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र

**(International Economics)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**एम. ए. भाग-२ : सत्र-४**

**अर्थशास्त्र :**

EC-7 (Compulsory Paper)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२०
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,०००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-77-9

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■


**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) पी. आर. शेवाळे**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. एन. काशिद** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### ■ अभ्यासमंडळ : अर्थशास्त्र ■

अध्यक्ष - **डॉ. अनिलकुमार कृष्णराव वावरे**
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा

- **प्रा. डॉ. डी. सी. तळुले**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती विद्या कट्टी**
  अर्थशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संतोषकुमार बबनराव यादव**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर
  जि. कोल्हापूर
- **डॉ. बाळासो पांडुरंग पाटील**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज, इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. नेताजी व्ही. पोवार**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. निवास जाधव**
  राजा शिव छत्रपती आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,
  महागांव, जि. कोल्हापूर
- **डॉ. एस. एम. भोसले**
  सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, सातारा
- **डॉ. विजय भिमाप्पा देसाई**
  राजर्षी शाहू आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रुकडी
  जि. कोल्हापूर
- **डॉ. विजयकुमार आप्पासाहेब पाटील**
  आर्टस ॲण्ड सायन्स कॉलेज, आटपाटी,
  जि. सांगली
- **प्रा. डॉ. सिद्धाप्पा टिप्पान्ना बागलकोटे**
  डिपार्टमेंट ऑफ स्टडीज इन इकॉनॉमिक्स,
  कर्नाटक विद्यापीठ, धारवाड (कर्नाटक राज्य)
- **डॉ. वाय. एस. गायकवाड**
  विलिंग्डन कॉलेज, सांगली.
- **प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**
  अक्षय, बी-६, तारा टेसेसेस, एस.एस.सी. बोर्ड रोड,
  सम्राट नगर, कोल्हापूर
- **डॉ. राहूल शंकरराव म्होपरे**
  देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर
- **श्री. सुर्यकांत बाबूराव पाटील-बुद्धिहाळकर**
  सागर, २१०३/७+८, ई वॉर्ड, रुक्मीनीनगर, कोल्हापूर

# प्रस्तावना

शैक्षणिक वर्ष २००७ पासून शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, यांच्या वतीने दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांना दूरशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने एम. ए. भाग-२ अर्थशास्त्र या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी सन २०१४-१५ पासून सत्र पद्धती सुरू आहे. त्या अनुषंगाने 'आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र' या विषयाचे स्वयंःअध्ययनासाठी हे पुस्तक सत्र ४ साठी लिहिले आहे. सदर पुस्तकाच्या लेखनासाठी शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पदव्युत्तर विभागात अध्ययन करणाऱ्या अनुभवी व तज्ञ लेखकांकडून या विषयाच्या अभ्यासक्रमानुसार असलेल्या विविध घटकांचे लेखन करून घेण्यात आले आहे. या पुस्तकातील विविध घटक लिहिताना साधी व सोपी भाषा, संकल्पनात्मक स्पष्टता, विषयाच्या आकलनासाठी तक्ते, कोष्टके, गणितीय सूत्रे, आकृत्या इत्यादींचा वापर केलेला आहे. वाचक व विद्यार्थ्यांना समजेल अशी विषयाची सोपी व सुटसुटीत मांडणी करण्यात आलेली आहे. प्रत्येक घटकाच्या शेवटी स्वयंःअध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, क्षेत्रीय अभ्यासासाठी विषय व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची सूची दिलेली आहे.

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या विषयातील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत, आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्याचे मोजमाप, व्यापारातील हस्तक्षेपाचे सिद्धांत, व्यवहारतोल आणि आर्थिक एकीकरण सिद्धांत या घटकांचे सविस्तरपणे विश्लेषण केलेले आहे.

आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र या पुस्तकामध्ये विविध घटकांच्या विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु त्यामध्ये कांही उणिवा असल्यास वाचक व विद्यार्थ्यांनी त्या आमच्या निदर्शनास आणून द्याव्यात. त्याचा उपयोग पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित करण्यासाठी निश्चितपणे होईल. हे पुस्तक पदवी, पदव्युत्तर व विविध स्पर्धा परीक्षांच्या विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरेल असा आम्हाला विश्वास आहे. सदर पुस्तक पूर्ण करण्यासाठी घटक लेखकांनी जे परिश्रम घेतले. त्याबद्दल घटक लेखकांना मनःपूर्वक धन्यवाद. पुस्तक प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठाचे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, दूरशिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी जे परिश्रम घेतले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) पी. एस. कांबळे**
अर्थशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. बी. पी. पाटील**
यशवंतराव चव्हाण आर्टस ॲण्ड
कॉमर्स कॉलेज, इस्लामपूर

दूरशिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र**
**एम. ए. भाग-२ : आवश्यक पेपर-**EC-7

## अभ्यास घटकांचे लेखक



| **लेखक** | **घटक क्रमांक** |
|---|---|
| **प्रा. डॉ. अनिल धोंडिराम सत्रे**<br>मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगाव | **१, ३** |
| **प्रा. डॉ. आण्णा काका पाटील**<br>अर्थशास्त्र विभाग,<br>सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड | **२, ४** |

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) पी. एस. कांबळे**
अर्थशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. बी. पी. पाटील**
यशवंतराव चव्हाण आर्टस ॲण्ड
कॉमर्स कॉलेज, इस्लामपूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत | १ |
| २. | आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्याचे मोजमाप | २६ |
| ३. | व्यापारातील हस्तक्षेपाचे सिद्धांत | ५९ |
| ४. | एकीकरण सिद्धांत | ८६ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र-४ : घटक-१

# आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिध्दांत

( Theories of International Trade )

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक सिध्दांत-आंतरराष्ट्रीय व्यापाराचा निरपेक्ष खर्च लाभ सिध्दांत-तौलनिक उत्पादन खर्च सिध्दांत-टॉसिंग यांचे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार

१.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेक्श्चर-ओहलिन सिध्दांत-लिऑन्टिफचा विरोधाभास-क्रुगमन यांचा आर्थिक भूगोलाचा सिध्दांत

१.२.३ व्यापार निर्मितीमधील गतिशील घटकांची भूमिका-अभिरूचीतील बदल-तांत्रिक प्रगती-घटक सधनता

१.२.४ पूरक व्यापार सिध्दांत- लिंडर यांचा सिध्दांत-आयर्विन बी. क्रेविस यांचा उपलब्धता सिध्दांत

१.३ सारांश

१.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे

१.६ पारिभाषिक शब्द

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.० उद्दिष्ट्ये

सदर प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील बाबींची अधिक कल्पना येण्यास मदत होते.

१. आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक सिध्दांत, त्यामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराचा निरपेक्ष खर्च लाभ सिध्दांत, तौलनिक उत्पादन खर्च सिध्दांत, टॉसिंग यांचे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार स्पष्ट होण्यास यदत होते.
२. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेक्श्चर-ओहलिन सिध्दांत, लिऑन्टिफचा विरोधाभास, क्रूगमन यांचा आर्थिक भूगोलाचा सिध्दांत स्पष्ट होतो.
३. व्यापार निर्यितीमधील गतिशील घटकांची भूमिका समजते, त्यामध्ये अभिरूचीतील बदल, तांत्रिक प्रगती, घटक सधनता यांचे व्यापारावरील परिणाम स्पष्ट होतात.
४. पूरक व्यापार सिध्दांतमध्ये लिंडर यांचा सिध्दांत तसेच आयर्विन बी. क्रेविस यांचा उपलब्धता सिध्दांत यांची कल्पना येण्यास मदत होते.

## १.१ प्रास्ताविक

विशिष्ट कालखंडामध्ये व्यक्ती आणि संस्थांनी नफाप्राप्तीच्या हेतूने वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे व्यापार होय. व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने देशाच्या सीमेच्या आत, वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे अंतर्गत व्यापार होय. एका देशातील व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांशी वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक सिध्दांत (Theories of International Trade)

### अ) आंतरराष्ट्रीय व्यापाराचा निरपेक्ष खर्च लाभ सिध्दांत (Theory of Absolute Cost Advantages) :-

ॲडम स्मिथ यांनी १७७६ मध्ये लिहिलेल्या An Inquiry into the Nature and Causes of the Wealth of Nations या पुस्तकात हा सिध्दांत मांडला. स्मिथ यांच्या मते, नैसर्गिक अनुकूलता, भौगोलिक परिस्थिती यासारख्या कारणांनी काही वस्तूंच्या उत्पादनाचा खर्च, एखाद्या देशात इतर देशांच्या तुलनेत कमी असतो. अशा वस्तूंचे त्या देशाने उत्पादन करावे व त्यांची निर्यात करावी, तर ज्या वस्तू उत्पादनात इतर देशांच्या तुलनेत उत्पादन खर्च अधिक आल्याने निरपेक्ष तोटा होतो, अशा वस्तू आयात कराव्यात.

## ❑ निरपेक्ष खर्च लाभ सिध्दांताची गृहीते :-

१) फक्त श्रमखर्चाचा विचार.

२) पूर्ण रोजगार.

३) फक्त दोन वस्तूंचा व्यापार.

४) फक्त दोन देशांचा व्यापारामध्ये सहभाग.

५) कामगार देशांतर्गत भागात पूर्ण गतिशील तर आंतरराष्ट्रीय स्तरावर गतिहीन असतात.

## ❑ सिध्दांताचे विधान :-

प्रत्येक राष्ट्राने त्यांना ज्या वस्तूंच्या बाबतीत निरपेक्ष खर्च लाभ प्राप्त होतो अशाच वस्तूंचे उत्पादन करुन त्यांची निर्यात करावी, तर अन्य वस्तूंचे उत्पादन न करता त्यांची आयात करावी.

जेव्हा दोन्ही देशांमध्ये एक दिवस श्रम खर्चामध्ये ज्वारी आणि गहू यांच्या उत्पादन खर्चामध्ये निरपेक्ष फरक असेल तर त्या दोन देशात व्यापार उदभवतो. ॲडम स्मिथ यांनी आपल्या निरपेक्ष खर्च लाभ सिध्दांतामध्ये स्पष्ट केले की जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झालेल्या दोन्ही देशांना दोन वेगवेगळ्या वस्तूंच्याबाबतीत निरपेक्ष लाभ प्राप्त होत असेल तर तो व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरतो. पुढील पत्रकावरून हे अधिक स्पष्ट होण्यास यदत होते.

| देश | एक दिवस श्रम खर्चातील | | देवाण घेवाणीचा दर |
|---|---|---|---|
| | ज्वारी उत्पादन (कि.ग्रॅ.) | गहू उत्पादन (कि.ग्रॅ.) | |
| भारत | ७५ | १५० | १ कि.ग्रॅ. ज्वारी = २ कि.ग्रॅ. गहू |
| श्रीलंका | १५० | ७५ | १ कि.ग्रॅ. ज्वारी = ०.५ कि.ग्रॅ. गहू |

वरील पत्रकावरून स्पष्ट होते की, भारतामध्ये ज्वारी उत्पादनाच्या तूलनेत गहू उत्पादनामध्ये निरपेक्ष लाभ प्राप्त होतो तर श्रीलंकेला ज्वारी उत्पादनामध्ये निरपेक्ष लाभ प्राप्त होत असल्याचे दिसून येते. अशा स्थितीमध्ये व्यापार उदभवल्यास भारत गव्हाची निर्यात करेल व श्रीलंकेला १ कि.ग्रँ. ज्वारीच्या मोबदल्यात ०.५ कि.ग्रँ. पेक्षा अधिक गहू देण्यास तयार होईल, तर श्रीलंका भारतास २ कि.ग्रँ. गव्हाच्या मोबदल्यात १ कि.ग्रँ. पेक्षा अधिक ज्वारी देण्यास तयार होईल. भारतामध्ये नैसर्गिक अनुकूलता असल्याने गव्हाच्या उत्पादनात निरपेक्ष लाभ प्राप्त होतो, तर श्रीलंकेला ज्वारी उत्पादनात निरपेक्ष लाभ प्राप्त होत असल्याने भारताने गव्हाचे उत्पादन व निर्यात करुन श्रीलंकेकडून ज्वारी आयात करावी. दोन्ही ठिकाणी

देशांतर्गत देवाण-घेवाणीच्या दरापेक्षा अधिक वस्तू मिळत असल्याने व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरतो.

## ब) तौलोनिक उत्पादन खर्च सिध्दांत (The Comparative Cost Theory) :-

डेव्हिड रिकार्डो यांनी १८१७ मध्ये लिहिलेल्या Principles of Political Economy and Taxation ग्रंथामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक लाभ खर्च सिध्दांताची मांडणी केली आहे. दोन देशांमध्ये उत्पादीत होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादन खर्चातील तफावत हेच व्यापार निर्मितीचे महत्त्वाचे कारण आहे असे मत रिकार्डो यांनी आपल्या तुलनात्मक खर्च लाभ सिध्दांतामध्ये व्यक्त केले आहे. **ॲडम स्मिथ यांनी त्यांच्या निरपेक्ष खर्च लाभ सिध्दांतामध्ये प्रत्येक राष्ट्राने त्यांना ज्या वस्तूंच्या बाबतीत निरपेक्ष खर्च लाभ प्राप्त होतो अशाच वस्तूंचे उत्पादन करुन त्यांची निर्यात करावी, तर अन्य वस्तूंचे उत्पादन न करता त्यांची आयात करावी** असे मत व्यक्त केले होते. म्हणजेच फक्त निरपेक्ष खर्च लाभाच्या अवस्थेमध्येच व्यापार उद्‌भवतो व तो दोन्ही देशांना फायदेशीर ठरतो असे मत ॲडम स्मिथ यांनी आपल्या सिध्दांतामध्ये व्यक्त केले.

रिकार्डो यांनी ॲडम स्मिथ यांच्या सिध्दांतामध्ये सुधारणा करून आपला **तौलोनिक उत्पादन खर्च लाभ सिध्दांत** मांडला व या सिध्दांतामध्ये असे मत व्यक्त केले की निरपेक्ष खर्च लाभ प्रमाणेच तुलनात्मक खर्च लाभाच्या अवस्थेला देखील दोन देशांमध्ये व्यापार उद्‌भवतो व तो फायदेशीर पण ठरत असतो. प्रत्येक देशाने कमीत कमी उत्पादन खर्च येणाऱ्या वस्तूंचे उत्पादन करावे तसेच निर्यातही करावी तर ज्या वस्तूंच्या निर्मितीचा खर्च अधिक येतो अशा वस्तूंची आयात करावी यामध्ये तुलनात्मक लाभ मिळत असेल तरी असा व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरू शकतो हे त्यांनी उदाहरणासह पटवून देण्याचा प्रयत्न आपल्या सिध्दांतामध्ये रिकार्डो यांनी केला आहे. त्यांच्या विचारांनाच तौलनिक उत्पादन खर्च लाभ सिध्दांत असे म्हटले जाते.

## ❑ तुलनात्मक खर्च लाभ सिध्दांताची गृहीते :-

१) फक्त श्रमखर्चाचा विचार.

२) सर्व श्रमिक एकजिनसी असतात.

३) मुक्त व्यापाराचा स्विकार.

४) वाहतूक खर्चाचा विचार नाही.

५) दोन्ही देशांमध्ये स्थिर उत्पादन खर्चाचा व स्थिर उत्पादन फलाचा प्रत्यय येतो.

६) श्रम तसेच वस्तू बाजारात पूर्ण रोजगाराची अवस्था.

७) फक्त दोन वस्तूंचा विचार.

८) फक्त दोन देशांचा सहभाग.

## ❑ उत्पादन खर्चाच्या अवस्था व आंतरराष्ट्रीय व्यापार :-

रिकार्डो यांनी आपल्या सिध्दांताव्दारे असे स्पष्ट केले की व्यापार निर्माण होण्यासाठी तसेच तो फायदेशीर ठरावा यासाठी तौलनिक लाभाचे तत्व पूरेसे ठरते. त्यांच्या मते जरी एखाद्या राष्ट्राला व्यापारामध्ये निरपेक्ष लाभ प्राप्त होत नसला तरी जोपर्यंत दोन्ही देशातील खर्च गुणोत्तर भिन्न आहे तोपर्यंत एका देशाला एका वस्तूच्या बाबतीत तर दुसऱ्या देशाला दुसऱ्या वस्तूच्याबाबतील तौलनिक लाभ प्राप्त होत राहतो तो पर्यंत व्यापार दोन्ही देशांना लाभदायक ठरतो भले त्यापैकी एखाद्या देशाला दोन्ही वस्तूच्या उत्पादनाबाबत निरपेक्ष लाभ मिळत नसेल तरी तो व्यापार फायदेशीर ठरत असतो. या सिध्दांताच्या अधिक स्पष्टीकरणासाठी रिकार्डो यांनी उत्पादन खर्चाच्या तिन अवस्थामधील व्यापार अवस्था स्पष्ट केली आहे.

## अ) समान खर्चाची अवस्था व आंतरराष्ट्रीय व्यापार :-

जेव्हा दोन्ही देशातील खर्च गुणोत्तर समान असेल तर त्या दोन देशांमध्ये व्यापार निर्माण होणार नाही तसेच तो फायदेशीरही ठरणार नाही असे मत रिकार्डो यांनी आपल्या सिध्दांतामध्ये स्पष्ट केले. समान श्रम खर्चातीमध्ये दोन देशात उत्पादीत होणाऱ्या वस्तूच्या देवाण घेवाणीचे गुणोत्तर जर समान रहात असेल तर त्या दोन देशांमध्ये व्यापाराची निर्मिती होणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. समजा एक दिवस श्रम खर्चात ज्वारी आणि गहू उत्पादनाचा दर समान असेल म्हणजेच उत्पादन खर्च गुणोत्तर दोन्ही देशात समान असेल तर त्या दोन देशात व्यापार होणार नाही. कारण दोन देशातील देवाण घेवाणीचा समान म्हणजेच दर १ कि.ग्रॅ. ज्वारी = २ कि.ग्रॅ. गहू असा असल्याने तो फायदेशीर ठरणार नाही.

**समान खर्चाची अवस्था व आंतरराष्ट्रीय व्यापार**

| देश | एक दिवस श्रम खर्चातील | | देवाण घेवाणीचा दर |
|---|---|---|---|
| | ज्वारी उत्पादन (कि.ग्रॅ.) | गहू उत्पादन (कि.ग्रॅ.) | |
| भारत | ७५ | १५० | १ कि.ग्रॅ. ज्वारी = २ कि.ग्रॅ. गहू |
| श्रीलंका | ५० | १०० | १ कि.ग्रॅ. ज्वारी = २ कि.ग्रॅ. गहू |

## ब) निरपेक्ष फरक व आंतरराष्ट्रीय व्यापार :-

जेव्हा दोन्ही देशांमध्ये एक दिवस श्रम खर्चामध्ये ज्वारी आणि गहू यांच्या उत्पादन खर्चामध्ये निरपेक्ष फरक असेल तर त्या दोन देशात व्यापार उद्भवतो. ॲडम स्मिथ यांनी आपल्या निरपेक्ष खर्च लाभ सिध्दांतामध्ये सांगितल्याप्रमाणे जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झालेल्या दोन्ही देशांना दोन वेगवेगळ्या वस्तूंच्याबाबतीत निरपेक्ष लाभ प्राप्त होत असेल तर तो व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरतो. पुढील पत्रकावरून हे अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

**निरपेक्ष फरक व आंतरराष्ट्रीय व्यापार**

| देश | एक दिवस श्रम खर्चातील | | देवाण घेवाणीचा दर |
|---|---|---|---|
| | ज्वारी उत्पादन (कि.ग्रॅ.) | गहू उत्पादन (कि.ग्रॅ.) | |
| भारत | ७५ | १५० | १ कि.ग्रॅ. ज्वारी = २ कि.ग्रॅ. गहू |
| श्रीलंका | १५० | ७५ | १ कि.ग्रॅ. ज्वारी = ०.५ कि.ग्रॅ. गहू |

वरील पत्रकावरून स्पष्ट होते की, भारतामध्ये ज्वारी उत्पादनाच्या तूलनेत गहू उत्पादनामध्ये निरपेक्ष लाभ प्राप्त होतो तर श्रीलंकेला ज्वारी उत्पादनामध्ये निरपेक्ष लाभ प्राप्त होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे भारतातील दोन वस्तूंच्या देवाण-घेवाणीचा दर १ कि.ग्रॅं. ज्वारी = २ कि.ग्रॅं. गहू असा आहे. तर श्रीलंकेमधील दोन वस्तूंचा देवाण-घेवाण दर १ कि.ग्रॅं. ज्वारी = ०.५ कि.ग्रॅं. गहू असा आहे. अशा स्थितीमध्ये व्यापार उदभवल्यास भारत गव्हाची निर्यात करेल व श्रीलंकेला १ कि.ग्रॅं. ज्वारीच्या मोबदल्यात ०.५ कि.ग्रॅं. पेक्षा अधिक गहू देण्यास तयार होईल, तर श्रीलंका भारतास २ कि.ग्रॅं. गव्हाच्या मोबदल्यात १ कि.ग्रॅं. पेक्षा अधिक ज्वारी देण्यास तयार होईल. दोन्ही ठिकाणी देशांतर्गत देवाण-घेवाणीच्या दरापेक्षा अधिक वस्तू मिळत असल्याने व्यापार दोन्ही देशांना फायदेशीर ठरतो.

## क) तुलनात्मक फरक व आंतरराष्ट्रीय व्यापार :-

जोपर्यंत दोन्ही देशातील खर्च गुणोत्तर भिन्न आहे तोपर्यंत एका देशाला एका वस्तूच्या बाबतीत तर दुसऱ्या देशाला दुसऱ्या वस्तूच्याबाबतीत तौलनिक लाभ प्राप्त होत राहतो तो पर्यंत तो व्यापार दोन्ही देशांना लाभदायक ठरतो भले त्यापैकी एखाद्या देशाला दोन्ही वस्तूच्या उत्पादनाबाबत निरपेक्ष लाभ मिळत नसेल तरी तो व्यापार फायदेशीर ठरत असतो. जेव्हा दोन्ही देशामध्ये एक दिवस श्रम खर्चामध्ये ज्वारी आणि गहू यांच्या उत्पादन खर्चामध्ये तुलनात्मक फरक असेल तर त्या दोन देशात व्यापार उदभवतो व तो फायदेशीर ठरतो.

**तुलनात्मक फरक व आंतरराष्ट्रीय व्यापार**

| देश | एक दिवस श्रम खर्चातील | | देवाण घेवाणीचा दर |
|---|---|---|---|
| | ज्वारी उत्पादन (कि.ग्रॅ.) | गहू उत्पादन (कि.ग्रॅ.) | |
| भारत | १५० | १५० | १ कि.ग्रॅ. ज्वारी = १ कि.ग्रॅ. गहू |
| श्रीलंका | ५० | १०० | १ कि.ग्रॅ. ज्वारी = २ कि.ग्रॅ. गहू |

या उदाहरणामध्ये भारताला दोन्ही वस्तूंच्या उत्पादनामध्ये निरपेक्ष लाभ प्राप्त होतो तर श्रीलंकेला कोणत्याही वस्तूच्याबाबतीत निरपेक्ष लाभ प्राप्त होत नसला तरी तुलनात्मक लाभ प्राप्त होत असल्याने हा व्यापार उदभवतो व तो दोन्ही देशांना लाभदायक ठरतो. या व्यापारामध्ये भारत ज्वारीचे उत्पादन तसेच निर्यात करेल व श्रीलंकेला २ कि.ग्रँ. गव्हाच्या मोबदल्यात १ कि.ग्रँ. पेक्षा अधिक ज्वारी देण्यास तयार होईल. कारण व्यापारापूर्वी भारतातील देवाण-घेवाणीचा दर १ कि.ग्रँ. ज्वारी = १ कि.ग्रँ. गहू म्हणजेच २ कि.ग्रँ. ज्वारी = २ कि. ग्रँ. गहू असा आहे. तर श्रीलंका भारताला १ कि. ग्रँ. ज्वारीच्या मोबदल्यात १ कि.ग्रँ. पेक्षा अधिक गहू देण्यास तयार होईल कारण व्यापारापूर्वी श्रीलंकेतील देवाण-घेवाणीचा दर १ कि.ग्रँ. ज्वारी = २ कि.ग्रँ. गहू म्हणजेच १ कि.ग्रँ. गहू = ०.५ कि. ज्वारी असा आहे. दोन्ही ठिकाणी देशांतर्गत देवाण-घेवाणीच्या दरापेक्षा अधिक वस्तू मिळत असल्याने व्यापार फायदेशीर ठरतो.

वरील उदाहरणामध्ये भारताला दोन्ही वस्तूंच्या उत्पादनामध्ये निरपेक्ष लाभ प्राप्त होतो तर श्रीलंकेला कोणत्याही वस्तूच्याबाबतीत निरपेक्ष लाभ प्राप्त होत नसल्याने हा व्यापार फायदेशीर होणार नाही असा निष्कर्ष ॲडम स्मिथ यांच्या सिध्दांतामधून निघत होता. परंतू रिकार्डो यांच्या सिध्दांतावरून अशा अवस्थेमध्येदेखील व्यापार उदभवतो व तो दोन्ही देशांना फायदेशीर ठरतो असे स्पष्ट होते. अशा प्रकारे उत्पादन खर्चामध्ये निरपेक्ष फरकाबरोबरच, तुलनात्मक फरक असताना देखील व्यापार उदभवतो व तो फायदेशीर ठरतो असे मत रिकार्डो यांनी उदाहरणासहीत स्पष्ट केले आहे.

## ❑ तुलनात्मक खर्च लाभ सिध्दांताचे टिकात्मक परीक्षण :-

**१. श्रमखर्चाचे चुकिचे गृहीत :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये समाविष्ट असलेले देश फक्त दोनच वस्तूंची आयात-निर्यात करतात आणि त्या वस्तूंच्या उत्पादनासाठी फक्त श्रम या एकाच उत्पादन घटकांचा वापर केला जातो हे गृहीत या सिध्दांतामध्ये विचारात घेण्यात आले आहे. परंतू प्रत्यक्षात मात्र सद्यस्थितीला आज वस्तूंच्या उत्पादनासाठी भांडवल, श्रम या घटकांबरोबरच भूमी तसेच संयोजकांचा ही वापर होत असल्याने सदर सिध्दांतावर मर्यादा येतात.

**२. उत्पादन घटक देशांतर्गत भागात पुर्ण गतिशील नसतात :**

**३. वाहतूक खर्चाचा विचार नाही :** रिकार्डो यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतच्या या सिध्दांताची मांडणी करताना वाहतूक खर्चाचा विचार केलेला नाही. परंतु सद्यपरिस्थितीमध्ये काही वस्तूंच्या बाबतीत उत्पादन खर्चापेक्षा वाहतूक खर्च अधिक येत असल्याचे दिसून येते. म्हणूनच वाहतूक खर्चाकडे दुर्लक्ष करून केलेले विश्लेषण सदोष आहे अशी टिका यावर केली जाते.

**४. पूर्ण रोजगाराचे अवास्तव गृहीत :** रिकार्डो यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांताची मांडणी करताना अर्थव्यवस्थेमध्ये पूर्ण रोजगाराची स्थिती अस्तित्वात असते गृहीत विचारात घेतले आहे. परंतू पूर्ण रोजगाराची अवस्था सर्वसाधारण अवस्था नसल्याने पूर्ण रोजगाराचे सर्व दोष या सिध्दांतामध्ये समाविष्ट होतात अशा स्वरूपाची टिका या सिध्दांतावर टिकाकार करतात.

**५. पूर्ण स्पर्धेचे सदोष गृहीत :** आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हा सिध्दांत पूर्ण स्पर्धेच्या आधारावर मांडला गेला आहे. परंतू पूर्ण स्पर्धा ही आदर्श बाजारपेठ असून ती अस्तित्वात नसल्याने पूर्ण स्पर्धेचे सर्व दोष या स्पष्टीकरणामध्ये दिसून येतात ही टिका या सिध्दांतावर केली जाते.

**६. उत्पादन तंत्रातील बदलांचा विचार नाही :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी दोन्ही देशांमध्ये वापरले जाणारे उत्पादन तंत्र स्थिर असते त्यामध्ये फारसा बदल होत नाही या विचाराचा आधार घेत हा सिध्दांत मांडला गेला आहे, परंतू कोणत्याही देशातील उत्पादनाचे तंत्र सातत्याने बदलत असल्याने या सिध्दांतावर मर्यादा येतात.

**७. स्थिर उत्पादन फलाचे अयोग्य गृहीत :** कोणत्याही देशामध्ये उत्पादन घेत असताना ते वाढते उत्पादन फल,  स्थिर उत्पादन फल तसेच घटते उत्पादन फल या तीन फलांची प्रवृत्ती दिसून येत असते. परंतू या सिध्दांताची मांडणी करताना फक्त स्थिर उत्पादन फलाचा विचार केला असल्याने हे स्पष्टीकरण सदोष असल्याची टिका टिकाकारांनी केली आहे.

**८. दोन्ही देशांची आर्थिक स्थिती समान नसते :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी असलेल्या दोन्ही देशांची आर्थिक स्थिती समान असते असे विचारात घेवून सिध्दांताची मांडणी केलेली आहे परंतू जागतीक स्तरावर कोणत्याही देशांची आर्थिक स्थिती समान नसते. त्यामुळे रिकार्डो यांच्या या सिध्दांतावर मर्यादा येतात.

**९. मुक्त व्यापारातील दोष :** रिकार्डो यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये मुक्त व्यापाराचे धोरण स्विकारलेले असते आणि आयात निर्यातीवर कोणत्याही स्वरूपाची बधने लादली जात नाहीत असे गृहीत धरले जाते. परंतु प्रत्यक्षात प्रत्येक देश आपल्या आयात-निर्यात व्यापारामध्ये कोणते ना कोणते बंधन लादत असतात अशी टिका केली जाते.

वरील स्वरूपाचे अनेक दोष रिकार्डो यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांतामध्ये दिसून येत असले तरी हा सिध्दांत ॲडम स्मिथ यांच्या व्यापार विषयक विचारांपेक्षा नक्कीच श्रेष्ठ आहे. त्यामूळे याचे महत्त्व कमी होत नाही.

## १.२.१.१ टॉसिंग यांचे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार (Monetary Expression by Taussing) :-

अर्थतज्ञ रिकार्डो यांनी आपल्या तुलनात्मक खर्चाच्या सिध्दांताचे स्पष्टीकरण देत असताना फक्त श्रम हा एकमेव उत्पादनाचा घटक विचारात घेतला आहे. त्यांच्या या विचारामध्ये सुधारणा करून टॉसिंग यांनी श्रममूल्यातील तुलनात्मक फरकापेक्षा किंमतीतील निरपेक्ष फरक विचारात घेऊन आपले आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याच्या या विचारांचा उल्लेख टॉसिंग यांचे तुलनात्मक खर्च-लाभ सिध्दांतावरील प्रतिपादन असा केला जातो.

टॉसिंग यांनी आपल्या विचारांचे स्पष्टीकरण करण्यासाठी पुढील पत्रकाचा आधार घेतला आहे.

**वस्तूंचा पैशातील खर्च आणि किंमत**

| देश | श्रमिकांचे १ दिवसातील उत्पादन | दैनंदिन वेतन = पैशातील खर्च (रुपये) | पैशातील खर्च=उत्पादनाची प्रत्येक घटकाची पुरवठा किंमत(रुपये) |
|---|---|---|---|
| अ | दारू २० नग | १०० | ५.० |
| | कापड २० नग | १०० | ५.० |
| ब | दारू १० नग | ८० | ८.० |
| | कापड १५ नग | ८० | ५.३३ |

वरील पत्रकावरून हे स्पष्ट होते की, 'अ' या देशातील दारू उत्पादनाची पैशातील किंमत 'ब' देशातील किंमतीपेक्षा कमी आहे. त्यामुळे 'अ' हा देश दारू उत्पादनावर भर देईल व त्याची निर्यात करेल. तर 'ब' हा देश कापड उत्पादनावर भर देईल व कापडाची निर्यात 'अ' देशाला करेल असा निष्कर्ष टॉसिंग यांनी आपल्या संशोधनामधून काढला आहे. श्रम खर्चाऐवजी जर पैशातील खर्च विचारात घेऊन व्यापार केल्यास दोन्ही देशांना लाभ प्राप्त होतो असे मत टॉसिंग यांनी व्यक्त केले.

## १.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेक्श्चर-ओहलिन सिध्दांत (Trade Theory of Heckscher-Ohlin) :-

अर्थतज्ञ हेक्श्चर यांनी आपल्या 'The effects of foreign trade on Distribution of

Income' तसेच अर्थतज्ञ ओहलिन यांनी 'Inter-regional and International Trade' या ग्रंथामध्ये सदर सिध्दांताची मांडणी केली. १९३३ मध्ये अर्थतज्ञ हेक्श्चर आणि ओहलिन यांनी जे आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विचार मांडले आहेत त्यांना परस्परावलंबन सिध्दांत तसेच उत्पादन घटक देणग्यांचा आधुनिक सिध्दांत असेही म्हटले जाते. रिकार्डो तसेच अन्य सनातनवादी व्यापारविषयक विचारांचा पुढचा टप्पा म्हणून हेक्श्चर-ओहलिन यानी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधुनिक सिध्दांत मांडला.

हेक्श्चर-ओहलिन यांच्या सिध्दांतानुसार विविध देशातील उत्पादन घटकांच्या उपलब्धता तसेच किंमतींवरून त्या-त्या देशातील आयात-निर्यातीची रचना ठरत असते. विकसित देशांमध्ये भांडवल विपूल प्रमाणात असल्याने हे देश भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब करतात व भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करतात. तर अल्प विकसीत तसेच विकसनशील देशांमध्ये श्रमीकांचा पुरवठा विपूल प्रमाणात असल्याने ते श्रमप्रधान उत्पादन तंत्रांचे अधिक उत्पादन व निर्यात करतात.

### ☼ हेक्श्चर-ओहलिन सिध्दांताची गृहीते :-

१) दोन देश, दोन वस्तू व दोन उत्पादन घटक विचारात घेतले आहेत.

२) श्रमा बरोबरच भांडवल या उत्पादन घटकाचा विचार.

३) उत्पादन घटक देशांतर्गत भागात पूर्ण गतिशील तर आंतरराष्ट्रीय स्तरावर गतिहीन असतात.

४) मुक्त व्यापाराचे धोरण.

५) वाहतूक खर्चाचा विचार नाही.

६) तंत्रज्ञान बदलत नाही.

७) पूर्ण रोजगार.

८) फक्त वस्तूंच्या व्यापाराचा विचार.

या सिध्दांतामध्ये काही राष्ट्रे भांडवलप्रधान तर काही राष्ट्रे श्रमप्रधान असतात असे गृहीत धरले आहे.

**भांडवल प्रधान देश (Capital Intensive Countries) :** जेव्हा देशामध्ये श्रमिकांच्या तुलनेत भांडवल मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते तेव्हा त्यास भांडवल प्रधान देश असे म्हणतात.

**श्रम प्रधान देश (Labour Intensive Countries) :** जेव्हा देशामध्ये भांडवलाच्या तुलनेत श्रमिक मोठ्याप्रमाणात उपलब्ध असतात तेव्हा त्यास श्रम प्रधान देश असे म्हणतात.

जी राष्ट्रे श्रम प्रधान असतात त्याठिकाणी अन्य राष्ट्रांच्या तुलनेत श्रमिक स्वस्त असतात. तर भांडवलप्रधान असणाऱ्या ठिकाणी भांडवलाचा खर्च कमी असतो. हेक्श्चर ओहलिन यांच्या मते प्रत्येक

राष्ट्राने श्रमखर्च व भांडवलीखर्च या दोहोचा विचार करुन ज्या वस्तूंच्या उत्पादनाबाबत एकूण खर्च कमी येतो, त्यांचे उत्पादन व निर्यात करावी, तर ज्या वस्तूंच्या उत्पादनाबाबत एकूण खर्च अधिक येतो, त्यांचे उत्पादन न करता ते अन्य देशांकडून आयात करावे. भांडवल प्रधान देशांमध्ये भांडवल सधनता असल्याने भांडवली वस्तूंच्या उत्पादनाबाबत खर्च तुलनेने कमी येतो. त्यामुळे हे देश भांडवली वस्तूंच्या उत्पादन व निर्यातीवर भर देतात तर श्रमप्रधान देशांमध्ये श्रमसधनता असते. श्रम प्रधान वस्तूंच्या उत्पादनाचा खर्च तुलनेने कमी येत असल्याने हे देश श्रमप्रधान वस्तूच्या उत्पादन व निर्यातीवर भर देतात.

## ❑ सिध्दांताचे स्पष्टीकरण :-

**(अ) आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमेय :** या प्रमेयानुसार देशांमध्ये उपलब्ध असलेल्या उत्पादन घटकांवरच त्या देशांचा व्यापार अबलंबून असतो असे मत व्यक्त केले. असे उत्पादनाचे घटक व अन्य साधने उपलब्ध असतील तर त्यांच्या सहायाने उत्पादीत करता येणाऱ्या वस्तूंचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेता येते व त्याची अन्य देशाला निर्यात करता येते. याउलट तुलनात्मकदृष्ट्या उत्पादन घटकांची कमतरता असलेल्या वस्तू देशामध्ये उत्पादीत न करता तो त्या आयात करणे पसंत करतो. म्हणजे हेक्श्चर ओहलिन यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या या प्रमेयानुसार दोन देशातील आयात निर्यात ही उत्पादन घटकांच्या उपलब्धतेवर अवलंबून असते. तसेच उपलब्ध साधनांचा वापर हा घटक त्यावरती परीणाम करत असतो.

**(ब) उत्पादन घटकांच्या समानतेचे प्रमेय :** आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे उत्पादन घटकांच्या समानतेचे प्रमेयामध्ये हेक्श्चर यांनी मुक्त व्यापारामुळे उत्पादन घटकांच्या मोबदल्यांमध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावर समानता निर्माण होते व त्यामधून आंतरराष्ट्रीय स्तरावर दोन देशातील आयात निर्यात म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यापार वाढत जाण्यास मदत होते असे मत व्यकत केले. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जरी उत्पादनाचे घटक गतिहीन असले तरी व्यापारात सहभागी दोन्ही देशांमध्ये त्याचा वापर वाढत जातो तसेच किंमतीदेखील वाढतात त्यामधून व्यापार वाढ घडून येण्यास मदत होते.

हेक्श्चर यांच्या विधानाला समर्पक असे विचार आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये मांडत असताना ओहलिन यांनी असे मत व्यक्त केले की आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी देशांमध्ये उत्पादन घटकांना प्राप्त होणाऱ्या मोबदल्यांचे संपुर्णपणे समानीकरण शक्य नसले तरी मुक्त व्यापाराचे धोरण घटक किंमतीमध्ये समानीकरण होण्याची प्रवृत्ती दिसून येते.

## ❑ हेक्श्चर ओहलिन सिध्दांताचे टिकात्मक परिक्षण :-

**१. वाहतूक खर्चाकडे दुर्लक्ष :** हेक्श्चर ओहलिन यांनी या सिध्दांताची मांडणी करत असताना वाहतूक खर्चाचा विचार केलेला नाही. परंतु सद्यपरिस्थितीमध्ये काही वस्तूंच्या बाबतीत उत्पादन

खर्चापेक्षा वाहतूक खर्च अधिक येत असल्याचे दिसून येते. वाहतूक खर्च हा उत्पादन खर्चामध्ये तसेच वस्तूच्या किंमतीमध्ये मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडत असतो. म्हणूनच वाहतूक खर्चाकडे दुर्लक्ष करून केलेले विश्लेषण सदोष आहे अशी टिका यावर केली जाते.

**२. लिऑन्टिफ यांचा विरोधाभास :** हेक्श्चर-ओहलिन यांच्या सिध्दांतानुसार भांडवल प्रधान देशांमध्ये भांडवल सधनता असल्याने भांडवली वस्तूंच्या उत्पादनाबाबत खर्च तुलनेने कमी येतो. त्यामुळे हे देश भांडवली वस्तूंच्या उत्पादन व निर्यातीवर भर देतात तर श्रमप्रधान देशांमध्ये श्रमसधनता असते. श्रम प्रधान वस्तूंच्या उत्पादनाचा खर्च तुलनेने कमी येत असल्याने हे देश श्रमप्रधान वस्तूच्या उत्पादन व निर्यातीवर भर देतात. परंतू लिओन्टिफ यांच्या संशोधनाचे निष्कर्ष पुर्णत: या विधाानाच्या विरोधी आले. लिऑन्टिफ यांच्या अमेरिकेतील संशोधनामध्ये हे सिध्द झाले की अमेरिका भांडवल-प्रधान देश असूनही त्यांच्या निर्यातीमध्ये श्रमप्रधान वस्तूंचे प्रमाण अधिक तर आयातीमध्ये भांडवलप्रधान वस्तूंचे प्रमाण अधिक आहे. यावरून हेक्श्चर ओहलिन यांच्या सदर सिध्दांतावर मर्यादा येत असल्याचे दिसून येते.

**३. ग्राहकांची पसंती स्थिर नसते :** हेक्श्चर-ओहलिन यांनी सदर सिध्दांताची मांडणी करत असताना ग्राहकांची वस्तूच्या मागणीची पसंती स्थिर असते त्यामध्ये बदल होत नाही असे गृहीत धरले होते. परंतू प्रत्यक्षात उत्पन्नातील बदल, तंत्रज्ञानातील बदल, संशोधन, अनुकरण प्रवृत्ती, जाहिरातीचा प्रभाव या सारख्या अनेक कारणांनी ग्राहकांची पसंत्ती सातत्याने बदलत असते. त्यामुळे ग्राहकांची पसंती स्थिर असते असे गृहीत धरून केलेले स्पष्टकरण अयोग्य वाटते.

**४. घटक किंमतींच्या समानतेचा अभाव :** हेक्श्चर-ओहलिन यांच्या मते आंतराष्ट्रीय स्तरावर उत्पादन घटकांच्या किंमतींमध्ये समानतेची प्रवृत्ती असते असे गृहीत तत्व विचारात घेतलेले होते. परंतू प्रत्यक्षात मात्र उत्पादन घटकांची उपलब्धता राष्ट्रा-राष्ट्रानूसार भिन्न असल्याने त्यांच्या मागणी पुरवठ्याच्या समतोलातून कमी अधिक अशा ठरत असतात म्हणून हे विचार सदोष आढळतात.

**५. पूर्ण रोजगाराचे अवास्तव गृहीत :** हेक्श्चर-ओहलिन यांचा हा सिध्दांत अर्थव्यवस्थेमध्ये पुर्णरोजगाराची स्थिती अस्तित्वात असते गृहीत धरून याची मांडणी केली असल्याने पुर्णरोजगाराचे सर्व दोष या सिध्दांतामध्ये समाविष्ट होतात अशास्वरूपाची टिका या सिध्दांतावर टिकाकार करतात.

**६. पूर्ण स्पर्धेच्या चुकीच्या गृहीताचा आधार :** पूर्ण रोजगाराप्रमाणेच या सिध्दांतामध्ये पुर्णस्पर्धेचे गृहीत विचारात घेतलेले आहेत त्यामधून पूर्ण स्पर्धेच्या बाजारपेठेचे सर्व दोष या स्पष्टकरणामध्ये दिसून येतात ही टिका या सिध्दांतावर केली जाते.

**७. उत्पादन तंत्र व घटक यांच्यात एकजीनसीपणाचा अभाव :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये समाविष्ट असणाऱ्या दोन्ही देशांमध्ये वापरले जाणारे उत्पादनाचे तंत्र तसेच उत्पादनाचे सर्व घटक एकजीनसी स्वरूपाचे असतात त्यांच्यात भिन्नता आढळत नाही या विचारांवर या सिध्दांताची मांडणी

हेक्श्चर ओहलिन यांनी केली आहे. परंतू प्रत्यक्षातमात्र कोणत्याही देशामध्ये उत्पादनाचे तंत्र आणि उत्पादनाचे घटक यामध्ये एकजीनसीपणा दिसून येत नससल्याने सदर सिध्दांतावर मर्यादा येतात अश स्वरूपाची टिका या सिध्दांतावर केली जाते.

**८. दोन देश, दोन वस्तू व दोन उत्पादनाचे घटक या चूकीच्या गृहितावर आधारीत :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये दोन देश समाविष्ट असतात आणि ते फक्त दोनच वस्तूंची आयात-निर्यात करतात व त्या दोन वस्तूंच्या उत्पादनासाठी भांडवल आणि श्रम या दोनच उत्पादन घटकांचा वापर केला जातो या गोष्टी सदर सिध्दांतामध्ये गृहीत धरण्यात आल्या आहेत. परंतू प्रत्यक्षात मात्र सद्यस्थितीला आज अनेक देश, अनेक वस्तूंची आयात-निर्यात आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये करत असतात. आणि त्या वस्तूंच्या उत्पादनासाठी भांडवल, श्रम या घटकांबरोबरच भूमी तसेच संयोजकांचा ही वापर होत असल्याने सदर सिध्दांतावर मर्यादा येतात.

अशा स्वरूपाच्या अनेक मर्यादा हेक्श्चर ओहलिन यांच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या सिध्दांतामध्ये असल्याचे दिसून येते. असे असले तरी या सिध्दांतामधील विचार हे ॲडम स्मिथ तसेच डेव्हीड रिकार्डो यांच्या व्यापार विषयक विचारांपेक्षा नक्कीच श्रेष्ट आहे. हेक्श्चर-ओहलिन यांनी दोन देश, दोन वस्तूंच्या बरोबरच दोन उत्पादन घटकांचा देखील विचार केला आहे तसेच उत्पादन घटक सधनतेचा एक नवा विचार आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या स्पष्टीकरणामध्ये दिला असल्याने या सिध्दांताचे महत्त्व कमी होत नाही.

## ❑ लिओन्टिफचा विरोधाभास (Leontiefs Paradox) :-

हेक्श्चर-ओहलिन यांच्या सिध्दांतानुसार विविध देशातील उत्पादन घटकांच्या उपलब्धता तसेच किंमतींवरून त्या-त्या देशातील आयात-निर्यातीची रचना ठरत असते. विकसीत देशांमध्ये भांडवल विपूलप्रमाणात असल्याने हे देश भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब करतात व भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करतात. तर अल्प विकसीत तसेच विकसनशील देशांमध्ये श्रमीकांचा पुरवठा विपूल प्रमाणात असल्याने ते श्रमप्रधान उत्पादन तंत्रांचे अधिक उत्पादन व निर्यात करतात. हेक्श्चर ओहलिन यांच्या या विचाराचे परीक्षण करण्यासाठी लिऑन्टिफ यांनी अमेरिकेतील १९४७ या वर्षाची आकडेवारी विचारात घेतली व भांडवल व श्रमाचे गुणोत्तर आयात पर्यायी व निर्यातप्रधान उद्योगांच्या संदर्भात तपासले. त्याच्या या संशोधनाचे निष्कर्ष हे हेक्श्चर ओहलिन यांच्या विचारांच्या पुर्णत: विरोधी होते म्हणूनच या विचाराचा उल्लेख लिऑन्टिफ यांचा विरोधाभास या नावाने प्रसिध्द झाल्याचे दिसून येते.

## ☼ लिऑन्टिफचे स्पष्टीकरण :-

सदर अभ्यासासाठी त्यांनी निर्यात उद्योगामधून अधिक भांडवल मुक्त होईल तर आयात पर्यायी

उद्योगामध्ये अधिक श्रमीक लागतील असे गृहीत तत्व विचारात घेतले होते. लिऑन्टिफ यांनी आपल्या अभ्यासाच्या आधारे पुढील पत्रक मांडले.

| उत्पादन घटक | निर्यात वस्तू | आयात पर्यायी वस्तू |
|---|---|---|
| भांडवल (००० डॉलर) | २५५१ | ३०९१ |
| श्रम (श्रम वर्ष) | १८२ | १७० |
| भांडवल-श्रम गुणोत्तर | १३.९९ | १८.१८ |

हेक्श्चर-ओहलिन यांच्या सिध्दांताची पडताळणी अमेरिकेच्या व्यापाराच्या संदर्भात करण्यासाठी लिऑन्टिफ यांनी १९४७ मध्ये अमेरिकेतील निर्यात १ दशलक्ष डॉलरने कमी करून आयात पर्यायी वस्तू १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी आवश्यक असलेल्या उत्पादन घटकांच्या वापरावर होणाऱ्या पीरणामाचे मोजमाप केले. वरील पत्रकावरून असे स्पष्ट होते की, निर्यात उद्योगामध्ये १ दशलक्ष डॉलरने कमी केल्यास २५५१ हजार डॉलर भांडवल तर १८२ वर्ष श्रम मुक्त होत. याउलट आयात पर्यायी उद्योगात उत्पादन १ दशलक्ष डॉलरने वाढविण्यासाठी ३०९१ हजार डॉलर भांडवल तर १७० श्रम वर्ष अधिक श्रम खर्च करावे लागतात. तसेच निर्यात वस्तू उद्योगामध्ये भांडवल-श्रम गुणोत्तर १३.९९ असे आहे तर हेच गुणोत्तर आयात पर्यायी वस्तू उद्योगामध्ये १८.१८ असे आहे. यावरून असे स्पष्ट होते की अमेरिका हा भांडवलप्रधान देश असूनसुध्दा त्याच्या निर्यातीमध्ये मोठ्या प्रमाणात श्रमप्रधान वस्तूंचा समावेश होतो तर आयातीमध्ये भांडवलप्रधान वस्तूंचे प्रमाण अधिक आहे. यावरून हेक्श्चर ओहलिन यांचे व्यापार विषयक विचार अमेरिकेच्या व्यापाराला लागू पडत नसल्याचे स्पष्ट होते म्हणूनच या विचारांचा उल्लेख लिऑन्टिफ यांचा विरोधाभास असा केला जातो.

हेक्श्चर-ओहलिन यांच्या सिध्दांताप्रमाणे अमेरिकेच्या आयात निर्यातीचे आकडे जमा केले. त्यावरुन आलेले निष्कर्ष हे पूर्णपणे हेक्श्चर-ओहलिन सिध्दांताच्या विरोधी होते यालाच लिऑन्टिफचा विरोधाभास असे म्हटले जाते. हेक्श्चर-ओहलिन यांच्या सिध्दांतानुसार भांडवल प्रधान देश भांडवली वस्तूंची निर्यात व श्रमप्रधान वस्तूंची आयात करतात. तर श्रमप्रधान देश श्रमप्रधान वस्तूंची निर्यात व भांडवली वस्तूंची आयात करतात. लिऑन्टिफ यांच्या अमेरिकेतील संशोधनामध्ये हे सिध्द झाले की अमेरिका भांडवल-प्रधान देश असूनही त्यांच्या निर्यातीमध्ये श्रमप्रधान वस्तूंचे प्रमाण अधिक तर आयातीमध्ये भांडवलप्रधान वस्तूंचे प्रमाण अधिक आहे, यालाच लिऑन्टिफ विरोधाभास असे म्हणतात.

## ❑ लिऑन्टिफ यांच्या विरोधाभासावरील टिका :-

अमेरिकेतील आयात-निर्यातीचे प्रत्यक्ष आकडे विचारात घेऊन अभ्यासाअंती लिऑन्टिफ यांच्या संशोधनाच्या निष्कर्षावर अनेक अर्थतज्ञांनी टिका केल्याचे दिसुन येते.

१. लिऑन्टिफ यांनी भांडवलाचा टिकाऊपणा विचारात न घेता अमेरिकेतील भांडवलाचे मोजमाप केले आहे. अशी टिका बुचानन यांनी केली आहे.

२. हेक्श्चर-ओहलिन यांच्या सिध्दांताच्या पडताळणीसाठी फक्त निर्यात उद्योगातील आणि आयात पर्यायी उद्योगातील भांडवलाच्या वापरातील फरक विचारात घेणे पुरेसे ठरत नाही अशी टिका अर्थतज्ञ लोब यांनी केली आहे.

३. अमेरिकेत निर्यात उद्योगातील आणि आयात पर्यायी उद्योगातील वस्तूचे उत्पादन करण्यासाठी अन्य राष्ट्राच्या तुलनेत अधिक भांडवल प्रधान तंत्राच्या सहाय्याने तयार केल्या जात असल्याने हेक्श्चर-ओहलिन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार योग्यच आहेत अशी टिका अर्थतज्ञ आर.जोन्स यांनी केली.

४. अभ्यासासाठी लिऑन्टिफ यांनी सर्वसाधारण वर्षाची निवड करणे आवश्यक होते. १९४७ हे वर्षामध्ये जागतिक अर्थकारणामध्ये अनेक उलाढाली घडलेल्या असल्याने अयोग्य निष्कर्ष आले असतील अशी टिका अर्थतज्ञ स्वरलिंग यांनी केली.

५. अमेरिकेत भांडवल प्रधान वस्तूंची मागणी अधिक व पुरवठा कमी असल्याने तो भांडवलप्रधान वस्तूंची आयात करत असेल अशी टिका केली जाते.

६. लिऑन्टिफ यांनी अमेरिकेबरोबरच अन्य देशातील उत्पादन घटकांच्या उपलब्धतेचा विचार करून निष्कर्ष काढले असते तर ते अधिक समर्पक आले असते अशीही टिका या विचारांवर केली जाते.

अशा स्वरूपाच्या टिका जरी होत असल्या तरी लिऑन्टिफ यांनी अमेरिकेतील प्रत्यक्ष अभ्यासावरून हेक्श्चर ओहलिन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापारबाबतचे विचार तपासून पहाण्याचा शास्त्रशुध्द प्रयत्न केला असल्याने त्यांचे आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे विचार श्रेष्ठ ठरतात.

## ❑ क्रूगमन यांचा आर्थिक भूगोलाचा सिध्दांत (Theory of Economic geography - Krugman) :-

अर्थतज्ञ डेव्हिड रिकार्डो आणि हेक्श्चर ओहलिन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्पष्टीकरण देताना तौलनिक लाभ हा महत्वपुर्ण घटक मानला होतो. त्यांच्या विचारांमध्ये सुधारणा करून पॉल क्रूगमन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत सुधारीत विचार मांडले आहेत. आज आधूनिक कालखंडात आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक बाबतीमध्ये समानता असलेल्या देशांमध्ये व्यापाराचे प्रमाण खुपच जास्त आहे. अशा स्वरूपाच्या व्यापाराचे स्पष्टकरण करण्यासाठी अर्थतज्ञ डेव्हिड रिकार्डो तसेच हेक्श्चर ओहलिन यांचे तौलनिक लाभ विषयक विचारांच्या आधारे करण्यामध्ये अनेक अडचडणी होत्या म्हणूनच नविन स्वंतत्र

विचारांची मांडणी करण्याचे कार्य पॉल क्रूगमन  यांनी १९७९ मध्ये जरनल ऑफ इंटरनॅशनल इकॉनॉम्मिस या नियतकालीकात लिहलेल्या लेखाद्वारे केले आहे.

### ☼ पॉल क्रूगमन यांच्या सिध्दांताची गृहीते :-

पॉल क्रूगमन यांनी आपल्या आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत विचारांची मांडणी करताना दोन मुख्य गृहीते विचारात घेतलेली आहेत.

१. ग्राहक विविध स्वरूपाच्या वस्तूंची प्रतवारी पसंत करतात.

२. वेगवेगळ्या देशात मोठ्या प्रमाणावर उत्पादन करण्याचे फायदे भिन्न असतात.

वरील ग्रहीतांच्या आधारे क्रूगमन यांनी आपले आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे विचार स्पष्ट करताना विविध देशामध्ये उत्पादित होणाऱ्या चार चाकी वाहनांचे उदाहरण दिलेले आहे. त्याच्या सहाय्याने विविध देशात मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतल्यास उत्पादक राष्ट्रांना विविध स्वरूपाचे फायदे प्राप्त होतात असे मत व्यक्त केले. तसेच ग्राहक आपल्या सेवन कार्याचा अग्रक्रम ठरवितात हा एक नविन विचार त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या विचारांमध्ये अंत्यत महत्वपूर्ण योगदान दिलेले आहे. क्रूगमन यांच्या नंतरच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतच्या विचारांच्या स्पष्टीकरणामध्ये या ग्राहकांची पसती अग्रक्रम व मोठ्या प्रमाणावरील उत्पादनाचे फायदे या नविन विचारधारेचा खुप मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. त्यांच्या ग्राहकांची विविध वस्तू व सेवा खरेदीबाबतचे अग्रक्रम यासंदर्भातील महत्वपूर्ण योगदानाबाबत २००८ मध्ये अर्थशास्त्रातील जागतिक किर्तीचे नोबेल पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

क्रूगमन यांनी त्यांच्या नविन व्यापारविषयक विचारांची सांगड आर्थिक भूगोलाशी घातल्याने त्यांनी नविन आर्थिक भूगोल ही अत्यंत महत्वपूर्ण अशी संकल्पना आंतरराष्ट्रीय व्यापाराला योगदान स्वरूपात दिलेली आहे. ग्राहकाच्या पसंतीच्या वस्तूंचे उत्पादन हे अधिक लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये एकवटलेले असते व त्याचा प्रभाव आंतरराष्ट्रीय व्यापारावर व त्यामध्ये सहभागी असलेल्या वस्तूंच्या व्यापारावर मोठ्याप्रमाणात पडत असतो असे मत त्यांनी व्यक्त केले.

## १.२.३ व्यापार निर्मितीमधील गतिशील घटकांची भूमिका–अभिरूचीतील बदल–तांत्रिक प्रगती– घटक सधनता

### ❑ व्यापार निर्मितीमधील गतिशील घटकांची भूमिका (Role of dynamic factors in the emergence of trade) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारबाबतचे विचारांचे स्पष्टीकरण देत असताना अन्य घटक स्थिर असतात व

त्याचा व्यापाराच्या निर्मितीवर फारसा प्रभाव पडत नाही असे गृहीत धरून स्पष्टीकरण दिलेले आहे. परंतू कालखंडातील बदलाबरोबर अनेक घटक बदलत असतात व त्याचा देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापारावर कमी अधीक प्रमाणात प्रभाव पडत असतो. त्या गतिशील घटकांचा विचार करून व त्यामध्ये होणारे बदल विचारात घेऊनच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अभ्यास करणे महत्वाचे असते. उत्पादनाच्या चवितील बदल, तंत्रज्ञानातील बदल तसेच उत्पादन घटकांची उपलब्धता यामध्ये होणारा बदल आंतरराष्ट्रीय व्यापारावर काय परीणाम करतात याचा विचार करूनच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा अभ्यास महत्वाचा ठरतो.

## अ) अभिरूचीतील बदल (Changes in Test) :-

जेव्हा देशातील नागरिकांच्या अभिरूचीमध्ये बदल होतो तेव्हा उत्पादन घटकांचा पुरवठा आणि तंत्रज्ञान स्थिर असताना देखील देशाचा प्रस्ताव वक्र स्थलांतरीत होऊ शकतो. एखाद्या देशाच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराचे आकारमान तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारातील व्यापारशर्ती यामध्ये बदल घडविण्याचे कार्य अभिरूची करू शकते. देशातील नागरिकांची अभिरूची आयात वस्तूंच्याऐवजी देशांतर्गत भागात उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या दिशेने बदलल्यास आयात कमी होवून त्या देशाला व्यापारशर्ती अनुकूल होण्यास तसेच व्यापारतोल व व्यवहारतोल देखील समतोलात येण्यास मदत होते.

याउलट देशातील नागरिकांची अभिरूची आयात वस्तूंच्यादिशेने वाढली व देशांतर्गत भागात उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या बाबतीत कमी झाली तर आयात व्यापार मोठ्याप्रमाणात वाढतो तसेच त्यामधून देशाला व्यापारशर्ती प्रतीकूल बनतात. अशा देशांचा व्यापारतोल व व्यवहारतोल यामधील तूट देखील मोठ्याप्रमाणात वाढत जाते. म्हणजेच देशांतील नागरिकांच्या अभिरूचीमध्ये कोणत्या दिशेन बदल होतो त्यावर व्यापारशर्ती, व्यापारतोल व व्यवहारतोल यावर काय परीणाम होणार हे स्पष्ट होते.

## ब) तांत्रिक प्रगती (Technical Progress) :-

एखाद्या देशामध्ये जेव्हा तांत्रिक प्रगती घडून येते तेव्हा देशातील उत्पादन घटकांची उत्पादकता वाढते. उत्पादकता वाढीचा परीणाम म्हणून देशाचा उत्पादन शक्यता वक्रदेखील वाढत जातो व देशाची आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अन्य देशांना निर्यात मोठ्याप्रमाणात वाढत जाते. व्यापारतोल, व्यवहारतोल यामध्ये समतोल निर्माण होवून देशाचा आर्थिक विकास गतिमान होण्यास मदत होते. म्हणजेच तांत्रिक प्रगतीमधून आंतरराष्ट्रीय व्यापार तसेच आर्थिक प्रगती गतिमान होण्यास मदत होते.

### ☼ तांत्रिक प्रगतीचे प्रकार :–

१. **भांडवलाची बचत करणारी तांत्रिक प्रगती :** भांडवलाची बचत करणाऱ्या तांत्रिक प्रगतीमध्ये अर्थव्यवस्थेत तुलनात्मदृष्ट्या भांडवलापेक्षा श्रमाची उत्पादकता जलदगतीने वाढण्यास मदत होते.

२. **श्रमाची बचत करणारी तांत्रिक प्रगती :** श्रमाची बचत करणाऱ्या तांत्रिक प्रगतीमध्ये अर्थव्यवस्थेत तुलनात्मदृष्ट्या श्रमापेक्षा भांडवलाची उत्पादकता जलदगतीन वाढण्यास मदत होते.

३. **नैसर्गिक तांत्रिक प्रगती :** नैसर्गिक तांत्रिक प्रगतीने भांडवलाची तसेच श्रमाची उत्पादकता समप्रमाणात वाढते व त्यामधून देशाचा उत्पादन शक्यता वक्र बाहेरील बाजूस स्तलांतरीत होत असतो.

### क) घटक सधनता (Factor Endowments) :-

एखाद्या देशातील घटक सधनता ही त्या देशामध्ये उपलब्ध असलेल्या भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजन या घटकावर अवलंबून असते. देशाची घटक सधनता जेवढी अधिक असते तेवढ्याप्रमाणात त्यादेशाच्या समृध्दीमध्ये वाढ घडून येण्यास मदत होते. देशातील उद्योगधंदे, शेती, व्यापार तसेच सेवा क्षेत्र यांचा विकास गतीमान करण्याचे कार्य देशातील उपलब्ध असलेली घटक सधनात खुपच सहाय्यभूत ठरते. उत्पादन घटकांच्या मदतीने मोठ्याप्रमाणात उत्पादन घेवून देश त्याची मोठ्याप्रमाणात निर्यात करू शकतो व त्यामधून व्यापारतोल, व्यवहारतोल तसेच व्यापारशर्ती त्या देशाला अनुकूल होण्यास मदत होते.

अर्थतज्ञ हेक्श्चर ओहलिन यांनी याच घटक सधनतेच्या आधार घेत आपले आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत विचार मांडले आहेत. त्यांच्या सिध्दांतानुसार विविध देशातील उत्पादन घटकांच्या उपलब्धता तसेच किंमतींवरून त्या-त्या देशातील आयात-निर्यातीची रचना ठरत असते. विकसीत देशांमध्ये भांडवल विपूलप्रमाणात असल्याने हे देश भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा अवलंब करतात व भांडवलप्रधान वस्तूंची निर्यात करतात. तर अल्प विकसीत तसेच विकसनशील देशांमध्ये श्रमीकांचा पुरवठा विपूल प्रमाणात असल्याने ते श्रमप्रधान उत्पादन तंत्रांचे अधिक उत्पादन व निर्यात करतात.

## १.२.४ पूरक व्यापार सिध्दांत- लिंडर यांचा सिध्दांत-आयर्विन बी. क्रेविस यांचा उपलब्धता सिध्दांत

### अ) लिंडर यांचा सिध्दांत (Linder Theory) :-

स्टाफेन बी. लिंडर या स्वीडन अर्थतज्ञाने औद्यागीक उत्पादनाच्या आयात-निर्यात व्यापाराबाबत जे विवेचन केलेले आहे ते लिंडर यांची परिकल्पना या नावाने ओळखले जाते. लिंडर यांनी मागणी संरचनेतील समानतेची परिकल्पना मांडली आहे. त्यामध्ये त्यांनी सारखी उत्पन्न पातळी असलेल्या म्हणजेच मागणीमध्ये समानता असलेल्या देशांचा परपस्परांमधील व्यापार अधिक असतो असे मत व्यक्त

केले. हेक्श्चर-ओहलीन प्रमेयाचा आधार घेत लिंडर यांनी आपले आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

## ❑ लिंडर यांनी व्यापाराचे केलेले प्रकार :-

लिंडर यांनी व्यापारामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तूंच्या आधारावर व्यापाराचे पुढील दोन प्रकार केले आहेत.

**अ) प्राथमिक वस्तूंचा व्यापार (Trade of Primary Goods) :** अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या सर्व प्रकारच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा समावेश प्राथमिक वस्तूंमध्ये करण्यात आला.

**ब) उत्पादक वस्तूंचा व्यापार (Trade of Manufactures Goods) :** प्राथमिक वस्तूंवर प्रक्रिया करून निर्माण केल्या जाणाऱ्या वस्तूचा समावेश उत्पादक वस्तूमध्ये करण्यात आला.

हेक्श्चर-ओहलीन प्रमेयानुसार नैसर्गिक साधनसंपत्तीमधील असमानता हीच आंतरराष्ट्रीय व्यापाराचा आधार आहे. देशातील नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये जेवढे अधिक असमानता असेल तेवढ्याप्रमाणात त्यादेशातील व्यापार अधिक प्रमाणात असतो असे मत हेक्श्चर-ओहलीन यांनी व्यक्त केले होते. लिंडर यांनी अभ्यासावरून असे मत व्यक्त केले की युरोपीय देशांमधील व्यापार मोठ्याप्रमाणात असून तो वाढत आहे. असे असले तरी त्या देशामधील नैसर्गिक साधनसंपत्तीमध्ये असमानतेऐवजी समानता जास्त असल्याचे दिसून येते. अशा स्वरूपाच्या व्यापाराची प्रवृत्ती समजून घेण्यासाठी हेक्श्चर-ओहलीन यांचे विचार अपुरे पडतात असे मत लिंडर यांती व्यक्त केले आहे.

आंतर-गट व्यापाराचे स्पष्टीकरणासाठी हेक्श्चर-ओहलीन यांचे व्यापार विषयक विचार उपयुक्त ठरतात परंतू गटांतर्गत व्यापाराच्या स्पष्टीकरणामध्ये हेक्श्चर आहेलिन यांच्या सिंध्दातावर मर्यादा येत होत्या त्या अनुषंगाने गटांतर्गत व्यापाराचे स्पष्टीकरण देण्याचे महत्वपूर्ण कार्य लिंडर यांनी आपल्या व्यापारविषयक विचारामधून केल्याचे दिसून येते. लिंडर यांनी असे मत व्यक्त केले की एखादी वस्तू निर्यात वस्तू होण्यासाठी त्या वस्तूचे प्रथम देशांतर्गत उत्पादन होणे आवश्यक असते त्यानंतरच ती निर्यात केली जाते.

व्यापारातील सहभागी देशांमधील अंतर्गत मागणीच्या रचनेवरूनच देशातील निर्यातीची रचना ठरत असते. दोन देशातील मागणी संरचना सारखीच असेल तर त्या देशातील वस्तू उत्पादनाची तसेच निर्यातीची रचनाही सारखीच असते. तसेच सदर देशातील उत्पन्न जेवढे अधिक असते तेवढे त्यांचा व्यापारदेखील अधिक असतो. दोन देशातील उत्पन्न पातळी म्हणजे मागणीची संरचना सारखी नसेल तर त्या दोन देशातील व्यापार अगदीच मर्यादीत असतो. याच कारणाने अविकसित देशांचा विकसित देशांबरोबर होणारा व्यापार मर्यादीत राहील कारण त्याच्या उत्पन्न पातळीमध्ये तसेच मागणीच्या

संरचनेमध्ये समानता नसते. म्हणजेच दरडोई उत्पन्नामधील सारखेपणावरून मागणीच्या संरचनेची कल्पना येते असे मत लिंडर यांनी व्यक्त केले आहे.

## ब) आयर्विन बी. क्रेविस यांचा उपलब्धता सिध्दांत (Availibility Theory of Irving B. Karvis) :-

आयर्विन बी. क्रेविस यांचे आंतरराष्ट्रीय व्यापाराबातचे विचार महत्वपूर्ण मानले जातात. त्यांनी विदेशी व्यापारातील आयात आणि निर्यातीची रचना कोणत्या कारणांनी प्रभावीत होते किंवा निश्चित होते याबाबत अनुभवाधारीत संशोधन केले. त्याचे हे विचारच उपलब्धता परिकल्पना या नावाने ओळखले जाते. क्रेविसपुर्व कालखंडात कमी वेतनदर असलेल्या देशातून उच्च वेतनदर असणाऱ्या देशाकडे वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात होत असते असे विचार आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत मांडले गेले होते. म्हणजेच वेतनदर हा घटक देशांच्या निर्यातीवर मोठ्या प्रमाणात प्रभाव पाडत असतो असे अनेक अर्थतज्ञांचे होते.

या विचारांना छेद देत प्रथमत: क्रेविस यांनी आपल्या संशोधनाअंती असे निष्कर्ष काढले की आयात निर्यात व्यापाराची रचना देशादेशातील वेतन पातळीमधील तफावतीवर फारशी अवलंबून नसते. यासंदर्भात त्यांनी अमेरिकेच्या व्यापारासंदर्भात केलेल्या संशोधनावरून असे निदर्शनास आले की, कमी वेतनदर असलेल्या देशातून उच्च वेतनदर असणाऱ्या देशाकडे वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात होत असते हे विचार अमेरिकेच्या व्यापाराबाबत खरे ठरणारे नाहीत. अमेरिकेतील निर्यात उद्योगातील मजुरीचे दर देशातील सर्वसाधारण वेतन पातळीपेक्षा अधिक आहेत. त्यापूढे त्यांनी असे मत व्यक्त केले की आयात निर्यात व्यापार हा वेतन तफावतीवर अवलंबून नसून तो वस्तूच्या उपलब्धतेशी असतो.

**उपलब्धता :** ज्या वस्तू देशामध्ये अगदी सहजपणे उपलब्ध होत नाहीत अशा वस्तूंची आयात करावी लागते तर ज्या वस्तू मोठ्या प्रमाणात सहजपणे उपलब्ध होतात त्यांची निर्यात केली जाते.

## ❑ अनुउपलब्धतेची कारणे :-

पुढील घटकांमुळे अनुउपलब्धता निर्माण होत असते.

**१. दुर्मिळता :** एखाद्या अर्थव्यवस्थेमध्ये काही वस्तू दुर्मिळतेमुळे आढळून येत नाहीत. उदा रत्ने, हिरे, दुर्मिळ खनिजे या सारख्या काही वस्तू सहज उपलब्ध होत नसल्याने त्याची दुर्मिळता निर्माण होत असते. म्हणजेच दुर्मिळता हा घटक अनुउपलब्धतेचे मुख्य कारण आहे.

**२. उच्च उत्पादन खर्च :** नैसर्गिक प्रतीकुलता, कच्चा मालाची कमतरता, मागासलेले तंत्रज्ञान यासारख्या कारणांनी काही वस्तूंच्या उत्पादनाचा खर्च खुपच जास्त येत असतो. त्यामुळे त्यांचे उत्पादन घेण्यास उत्पादक तयार नसतात त्यामधून अशा वस्तूच्याबाबतीत अनुउपलब्धता निर्माण होत असते.

अनुउपलब्धतेच्या अवस्थेत समाजाच्या मागणीची (गरजांची) पुर्तता करण्याच्या अनुषंगाने त्या वस्तूंची आयात करावीच लागते. म्हणजेच कमी वेतनदर असलेल्या देशातून उच्च वेतनदर असणाऱ्या देशाकडे वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात होत असते हे विधान कसे चुकीचे आहे हे क्रेविस यांनी उदाहरणासह पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

## ❑ उपलब्धतेवर परीणाम करणारे घटक :-

अर्थव्यवस्थेतील वस्तू व सेवांच्या उपलब्धतेवर पुढील घटक कमी अधिक प्रमाणात प्रभाव पाडत असल्याचे दिसून येते.

**१. नैसर्गिक साधनसंपत्ती (Natural Resources) :** जागतिक स्तरावर देशा-देशांमध्ये नैसर्गिक साधन संपत्तीची उपलब्धता कमी-अधिक प्रमाणात असते. जी साधनसंपत्ती ज्या देशामध्ये मुबलक प्रमाणात उपलब्ध असते त्याआधारीत उत्पादीत झालेल्या वस्तू व सेवांची निर्यात करता येते. तर जी नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध नाही अशा वस्तूची आयात करावी लागते.

**२. वस्तू भेद (Product Differentiation) :** आपली वस्तू अन्य वस्तूंपेक्षा वेगळी, चांगली आणि उच्च दर्जाची असून हे ग्राहकांना भासवण्याचा प्रयत्न उत्पादक करत असतो त्यास वस्तूभेद असे म्हटले जाते. वस्तूभेदासाठी उत्पादक वस्तूचा रंग, चव, वेष्टन यामध्ये फरक करत असतो. त्यामधून ही अशा वस्तूंची निर्यात अन्य देशांमध्ये होत असते. देशी बाजारपेठेत अशा स्वरूपाच्या वस्तू उपलब्ध असुन देखील वस्तूभेदाचा प्रभाव म्हणून नागरिक अशा वस्तूंची मागणी करत असल्याने त्या वस्तूंची आयात वाढत जाते.

**३. तांत्रिक प्रगती (Technical Progress) :** काही देश तांत्रिकदृष्ट्या प्रगत असल्याने ते अल्प उत्पादन खर्चामध्ये चांगल्या दर्जाच्या वस्तूंचे उत्पादन मोठ्याप्रमाणात करतात व ते उत्पादन जागतिक स्तरावर विविध देशांना निर्यात करतात. तसेच असे तांत्रिकदृष्ट्या प्रगत देश नाविण्यपुर्ण शोध लावून त्याचा वापर उत्पादन प्रक्रियेमध्ये करतात अशा वस्तूंना अन्य राष्ट्रामधून मोठ्याप्रमाणात मागणी येत असल्याने त्या वस्तूंची निर्यात होत राहते.

**४. जकात धोरण (Tariff Policy) :** सरकारचे जकातविषयक धोरणादेखील विशीष्ट वस्तूच्या उत्पादनाच्या उपलब्धतेवर परिणाम करत असल्याचे दिसून येते.

हे सर्व घटक देशांतर्गत वस्तूच्या उपलब्धेतेवर परीणाम करतात व त्यामधून वस्तू व सेवांची आयात निर्यात होते. म्हणजेच कमी वेतनदर असलेल्या देशातून उच्च वेतनदर असणाऱ्या देशाकडे वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात होत असते हे विधान कसे चुकीचे आहे हे विचार या सिध्दांताव्दारे स्पष्ट करण्याचे महत्त्वपूर्ण काम क्रेविस यांनी केले आहे.

## १.३ सारांश

अंतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये काही बाबतीत साम्य तर काही बाबतीत भेद असल्याचे दिसून येते. चलनामध्ये भिन्नता, व्यापारविषयक धोरणामधील भिन्नता, धोक्यामध्ये भिन्नता, भाषेमध्ये भिन्नता, जकातविषयक धोरणामध्ये भिन्नता, व्यापकता, गरजांमध्ये भिन्नता, मूल्य निश्चिती, उत्पादन घटकांची गतीशीलता, व्यापाराचे आकारमान, समाविष्ट वस्तू, व्यापाराची दिशा, व्यापाराचा खर्च, व्यापारावरील बंधने, कागदपत्राची पूर्तता, व्यापाराचा कालावधी, उत्पादन खर्च व किंमत यामधील तफावत या बाबतीत दोन प्रकारच्या व्यापारामध्ये तफावत दिसून येते. अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये असा भेद किंवा फरक असल्याने या दोन्ही प्रकारच्या व्यापाराच्या स्वतंत्र अभ्यासाची गरज आहे, असे मत काही अर्थतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. त्यामधूनच आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबत स्वतंत्र विचार तसेच सिध्दांत विकसीत झाल्याचे दिसून येते.

## १.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

❑ **अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. निरपेक्ष लाभ तत्त्व ............... यांनी मांडले आहे.

*अ) अॅडम स्मिथ* *क) हेक्श्चर ओहलिन*

*ब) डेव्हीड रिकार्डो* *ड) क्रुगमन.*

२. रिकार्डो यांच्या सिद्धांताला ............... प्रतिमानाची मर्यादा प्राप्त झाली आहे.

*अ) दोन वस्तू* *ब) दोन देश* *क) अनेक वस्तू* *ड) श्रमखर्च.*

३. अॅडम स्मिथ आणि रिकार्डो यांनी .................. उत्पादनाचा घटक विचारात घेतलेला नाही.

*अ) श्रम* *ब) भांडवल* *क) संयोजक* *ड) ब आणि क बरोबर.*

४. आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचा उपलब्धता सिध्दांत ............. यांनी मांडला.

*अ) क्रूगमन* *ब) क्रेविस* *क) लिंडर* *ड) लिऑन्टिफ.*

५. हेक्श्चर-ओहलिन यांनी अॅडम स्मिथ आणि रिकार्डो यांच्यापेक्षा .......... हे वेगळे गृहीत विचारात घेतले आहे.

*अ) दोन देश* *ब) दोन वस्तू* *क) दोन घटक* *ड) यापैकी नाही.*

❑ **ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे काय?

२. राष्ट्राची संपत्ती हा ग्रंथ ॲडम स्मिथ यांनी कधी लिहला?

३. भांडवल प्रधान देश म्हणजे कोणते देश?

४. अर्थतज्ज्ञ हेक्श्चर-ओहलिन यांनी आंतरराष्ट्रीय व्यापार विषयक विचार कधी मांडले?

५. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक लाभ खर्च सिध्दांताची कोणी मांडला?

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❑ **अ)** *१. अ) ॲडम स्मिथ.*

*२. क) अनेक वस्तू.*

*३. ड) ब आणि क बरोबर.*

*४. ब) क्रेविस.*

*५. क) दोन घटक.*

❑ **ब)** *१. एका देशातील व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांशी वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय.*

*२. १७७६*

*३. जेव्हा देशामध्ये श्रमिकांच्या तुलनेत भांडवल मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते तेव्हा त्यास भांडवल प्रधान देश असे म्हणतात.*

*४. १९३३.*

*५. डेव्हिड रिकार्डो.*

## १.६ पारिभाषिक शब्द

१. **निरपेक्ष लाभ :** एखाद्या देशाला दुसऱ्या देशाच्या तुलनेत एखाद्या वस्तुच्या उत्पादनाबाबत अधिक कार्यक्षमता असणे म्हणजे निरपेक्ष लाभ होय. ॲड स्मिथ यांनी निरपेक्ष लाभ तत्त्वानुसार आंतरराष्ट्रीय सिद्धांताची मांडणी केली आहे.

२. **तौलनिक लाभ :** एखाद्या देशात विशिष्ट वस्तुच्या उत्पादनाचा उत्पादनखर्च दुसऱ्या देशातील तशाच वस्तुच्या उत्पादनात तौलनिक लाभ प्राप्त होतो.

३. **व्यापारशर्ती :** एखाद्या देशाच्या निर्यात वस्तुच्या किंमतीचा किंवा नग संख्येचा त्या देशाच्या आयात किंमतीशी किंवा नग संख्येशी असलेला दर.

४. **भांडवल प्रधान देश :** जेव्हा देशामध्ये श्रमिकांच्या तुलनेत भांडवल मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते तेव्हा त्यास भांडवल प्रधान देश असे म्हणतात.

५. **श्रम प्रधान देश :** जेव्हा देशामध्ये भांडवलाच्या तुलनेत श्रमिक मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात तेव्हा त्यास श्रम प्रधान देश असे म्हणतात.

६. **उपलब्धता :** ज्या वस्तू देशामध्ये अगदी सहजपणे उपलब्ध होत नाहीत अशा वस्तूंची आयात करावी लागते तर ज्या वस्तू मोठ्या प्रमाणात सहजपणे उपलब्ध होतात त्यांची निर्यात केली जाते.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

❑ **अ) टिपा लिहा.**

१. टॉसिंग यांचे आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक विचार.

२. लिऑन्टिफचा विरोधाभास.

३. आयर्विन बी. क्रेविस यांचा उपलब्धता सिध्दांत.

४. व्यापार निर्मितीमधील गतिशील घटकांची भूमिका.

५. लिंडर यांचा सिध्दांत.

❑ **ब) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. ॲडम स्मिथ यांचा निरपेक्ष लाभ सिद्धांत स्पष्ट करा.

२. डेव्हिड रिकार्डो यांचा तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत स्पष्ट करा.

३. रिकार्डो यांच्या तुलनात्मक उत्पादन खर्च लाभ सिद्धांताचे टीकात्मक परिक्षण करा.

४. आंतरराष्ट्रीय व्यापाराचा हेक्श्चर-ओहलीन यांचा सिद्धांत स्पष्ट करा.

५. क्रूगमन यांचा आर्थिक भूगोल सिध्दात स्पष्ट करा.

## १.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **Mathur Reeta** : *"Internationl Economics"* (2002), Sublme Publication Publication, Jaipur

२. **डॉ. गंगाधर कायदे-पाटील** : *''आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांत व धोरण''* (२००७), चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक

३. **तोडकर बी. डी.** : *''आंतरराष्ट्रीय संबंध''* (२०१२), डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती.

४. **झामरे जी. एन.** : *''आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र''* (२००९) पिंपळपुरे ॲन्ड कंपनी पब्लिकेशन, नागपूर.

५. **डॉ. एम. एन. शिंदे** आणि **डॉ. अनिल सत्रे** : ''भारतीय अर्थव्यवस्था'' (२०१७), अजित पब्लीकेशन, इस्लामपूर.

६. **बापट भ. ग.** : *''आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांत आणि धोरण''* (१९८२), मराठी अर्थशास्त्र परिषद.


❑❑❑

घटक–२

# आंतरराष्ट्रीय व्यापाराचे लाभ आणि त्याचे मोजमाप

( Gains from International Trade and Their Measurement )

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ व्यापार आणि आर्थिक वृध्दी

२.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ निर्धारित करणारे घटक, व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मापन आणि वितरण

२.२.३ व्यापार शर्ती–संकल्पना, निर्धारित घटक, वापर (Uses) व मर्यादा

२.२.४ अन्योन्य मागणीचा सिद्धांत, व्यापार शर्तीचे निधर्मी बिघाड गृहितक

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणांस पुढील बाबींची कल्पना येईल.

१. व्यापार आणि आर्थिक वृध्दी यासंबंधी सविस्तर माहिती घेता येईल.

२. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ निर्धारित करणारे घटक समजावून घेता येतील.

३. व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मापन आणि वितरण स्पष्ट करता येईल.

४. व्यापार शर्तीची संकल्पना व निर्धारित घटक स्पष्ट करता येतील.

५. व्यापार शर्तीचा वापर (उपयोग) आणि मर्यादा स्पष्ट करता येतील.

६. अन्योन्य (Reciprocal) मागणी सिद्धांत समजून घेता येईल.

७. व्यापार शर्तीच्या धर्मनिरपेक्ष बिघाडाच्या परिकल्पना स्पष्ट करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात आंतरराष्ट्रीय व्यापार अनिवार्य आहे. याद्वारे आपापसातील देवाण-घेवाण व मागणीही वाढू शकते. म्हणून ज्या देशाचा विदेशी व्यापार प्रगतीपथावर आहे, ते देश समृध्द व संपन्न असतात. याउलट ज्या देशाचा विदेशी व्यापार योग्य पध्दतीने चालत नाही, ते देश मागासलेले व गरीब राहतात. म्हणून आर्थिक वृद्धीसाठी आंतरराष्ट्रीय व्यापार आवश्यक आहे. या व्यापारामुळे देशाच्या एकूण उत्पादनातही वाढ होते.

अंतर्गत व्यापारातील लाभ सहज मोडता येतो, परंतु आंतरराष्ट्रीय व्यापारातील लाभ मोजताना बऱ्याच अडचणी येतात. व्यापार शर्तीही आंतरराष्ट्रीय व्यापारात महत्त्वाची भूमिका बजावतात. व्यापार शर्ती म्हणजे आयातीच्या दृष्टीने निर्यातीची सापेक्ष किंमत असते. आयात किंमतीशी निर्यात किंमतीची सापेक्ष किंमत असते. आयात किंमतीशी निर्यात किंमतीचे गुणोत्तर म्हणजे व्यापार शर्ती होय. निर्यात वस्तूंच्या प्रत्येक युनिटमध्ये अर्थव्यवस्था खरेदी करू शकणाऱ्या आयात वस्तूंची संख्या म्हणून याचा अर्थ लावला जाऊ शकतो. आर्थिक विकासामुळे व्यापारशर्ती अनुकूल होतात व अनुकूल व्यापार शर्तीमुळे जलत आर्थिक विकासाची शक्यता वाढते. अनुकूल व्यापार शर्तीमुळे देशाचे उत्पन्न वाढते यामुळे तो देश ह्या उत्पन्नाद्वारे यांत्रिक-तात्रिक ज्ञानाची आयात करून देशाचा आर्थिक विकास वेगाने करू शकतो. उपभोग, तंत्र, घटकांचा पुरवठा, किंमती इत्यादीवरसुद्धा व्यापार शर्तीचा अप्रत्यक्ष प्रभाव पडतो व याचा व्यापार शर्तीवर परिणाम होतो.

## २.२ विषय विवेचन (Subject Matter)

घटक दोन मध्ये आपण आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विविध सिद्धांत अभ्यासणार आहोत. यामध्ये ॲडम स्मिथचे निरपेक्ष खर्च लाभ तत्व, रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत, तसेच हेक्शर ओहलिनचा व्यापाराचा सिद्धांत, लिओन्टीफ विरोधाभास, कुगमनचा आर्थिक गुणोत्तराचा सिद्धांत इत्यादीचा समावेश आहे. घटकाच्या शेवटच्या भागात आपण गतिमान घटकांची भूमिका व पूरक व्यापार सिद्धांताचाही अभ्यास केला आहे.

प्रस्तुत घटकात आतंरराष्ट्रीय व्यापारापासूनचे लाभ आणि त्यांचे मोजमाप याचा सविस्तर अभ्यास करणार आहोत. यामध्ये व्यापार आणि आर्थिक वृद्धी, आंतरराष्ट्रीय व्यापारापासूनच्या लाभावर प्रभाव पाडणारे घटक, व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मोजमाप व वितरण, व्यापारशर्ती, अन्योन्य मागणी सिद्धांत इत्यादींचा समावेश आहे.

## २.२.१ व्यापार आणि आर्थिक वृध्दी (Trade & Economic Growth)

आंतरराष्ट्रीय व्यापार म्हणजे एक देश आणि उर्वरीत जग किंवा दोन देशांमधील वस्तू व सेवांची देवाण-घेवाण करणे होय. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे अनेक अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या सिद्धांतात विवेचन केले आहे. यामध्ये रिकार्डोच्या तुलनात्मक व्यय सिद्धांत, मिल व मार्शल यांचे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे सिद्धांत, आंतरराष्ट्रीय व्यापाराचा वैकल्पिक व्यय सिद्धांत त्याचबरोबर हेक्शर व ओहलिनचा आंतरराष्ट्रीय व्यापार सिद्धांत. याद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ व आर्थिक विकासाची किंवा वृद्धीची स्थिती स्पष्ट केलेली आहे.

कालांतराने देशाची लोकसंख्या वाढते आणि त्याच्या श्रमशक्तीचे आकारमान वाढते. तसेच देश दिर्घकाळात भांडवलाचा साठा वाढवितात. शिवाय नैसर्गिक संसाधनाचा वापर होवून ऱ्हास होवू शकतो किंवा नवीन शोधामुळे संसाधनाचे उपयोजन वाढते. या सर्व बदलांमुळे वेगवान आर्थिक वृध्दी होते आणि तुलनात्मक लाभाचा आकृतीबंध काळानुसार बदलतो. तांत्रिक बदलामुळे प्रति व्यक्ति उत्पन्नात वेगाने वाढ झाली आहे. म्हणून व्यापार हा राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा स्रोत आणि तुलनात्मक लाभाचा निर्णायक घटक आहे.

भूमि, श्रम, भांडवल यासारख्या संसाधनाचा विकास आणि तांत्रिक प्रगतीमुळे देशाच्या उत्पादन संभाव्यतेचे वक्र (सीमा) वरच्या पातळीवर हालविण्यास कारणीभूत ठरतात. वृध्दीचे दोन प्रमुख स्रोत आहेत.

१. संसाधनाच्या पुरवठ्यात वाढ.

२. तांत्रिक प्रगती देशाच्या निर्यात करण्यायोग्य आणि आयात करण्यायोग्य वस्तूंच्या उत्पादनाची वाढ आणि देशाच्या उपभोग आकृतीबंधासह दरडोई उत्पन्नातील वाढ आणि व्यापाराद्वारे वाढते, त्या दरावरील व्यापारावरील वाढीचा परिणाम यावर अवलंबून असते.

१९व्या शतकाच्या दरम्यान संसाधने अपुरी (Poor) असणाऱ्या विकसनशील देशाचे निर्यात क्षेत्र मुख्यत्वे ग्रेट ब्रिटन हे अग्रगण्य क्षेत्र होते, जेथे जगातील आधुनिक औद्योगिक उत्पादन केंद्रित होते. जे या अर्थव्यवस्थांना वेगवान वाढ आणि विकासासाठी चालना देत होते. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे या देशांची आर्थिक वृध्दी झाली. निर्यात वाढल्याने उर्वरित अर्थव्यवस्थेला उत्तेजन मिळाले.

अमेरिकेसह इतर देशासाठी विदेशी व्यापाराने आकार दिला आहे. घटक विपुलता आणि देशांतर्गत व विदेशी भांडवलाच्या गुंतवणूकीसाठी सुसज्ज परिस्थिती निर्माण केली आहे.

रॅग्नर नर्क्स यांच्या मतानुसार, औद्योगिक क्रांतीची उत्पत्ती एका लहान बेटापासून नैसर्गिक संसाधनाच्या मर्यादित श्रेणीवर झाली. जेव्हा संश्लेषी (Synthetic) सामग्री अद्याप अज्ञात होती. अशा परिस्थितीत, अल्प विकसीत भागात कमी आर्थिक आणि वेगवान मागणीसाठी आर्थिक विस्तार केला गेला.

परदेशातील स्थानिक उत्पादन घटक, ज्याच्या विकासाचा भाग व्यापाराद्वारे प्रेरित केला गेला आहे. अशाप्रकारे निर्यात करण्यासाठी मुख्यत्वे फायदेशीर प्राथमिक उत्पादनामध्ये वाढ झाली आहे. या उच्चस्थानी केंद्राकडून कच्चा मालाची आणि खाद्य पदार्थांच्या वाढीची मागणी, केंद्र बाह्य क्षेत्रात हलविण्याकरिता भांडवल आणि श्रम पूर्वीपासून नंतरच्या वाढीच्या प्रक्रियेस वेगवान करते.

प्रा. नर्क्स यांनी असा युक्तिवाद केला आहे की, १९व्या शतकातील तरुण अर्थव्यवस्था म्हणजे अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलियामध्ये समशीतोष्ण हवामान आणि असाधारण घटकांचा अंतर्भाव- प्रचंड प्रमाणात जमीन आणि अल्प प्रमाणात श्रम. त्यामुळे ते जागतिक अर्थव्यवस्थेच्या मध्यमागी कॉफी, गहू आणि इतर मुख्य धान्य पुरवू शकतील. शिवाय १९व्या शतकातील नवीन देश युरोपमधील अलीकडच्या स्थलांतरितांनी मागे टाकले होते, ज्याने आधुनिक अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांना संस्था आणि परराष्ट्राचे आचरण केले. तथापि, काही अर्थशास्त्रज्ञ, विशेषत: क्रॅव्हिस (Kravis) यांनी व्यापार आणि आर्थिक वृध्दी यांच्यातील संबंधांवर वेगळा दृष्टिकोन बाळगला. त्यांच्या मतानुसार १९व्या शतकादरम्यान कॅनडा, अर्जेंटिना आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांची वेगवान आर्थिक वृध्दी प्रामुख्याने फार अनुकूल अंतर्गत परिस्थितीमुळे-जसे नैसर्गिक स्रोतांची विपुल प्रमाणात पुरवठा याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापार फक्त आश्वासक/पूरक (Supportive) भूमिका बजावत होता.

आधुनिक अर्थशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे कि, आजचे विकसनशील देश त्यांच्या वृध्दी आणि विकासासाठी व्यापारावर फारच कमी अवलंबून असतात. हे मागणी आणि पुरवठ्याच्या कमी अनुकूल स्थितीमुळे निर्माण होते. १९व्या शतकातील परिस्थितीपेक्षा आज अन्न आणि कच्चा मालाची मागणी अधिकच हळूहळू वाढत आहे.

## ❑ व्यापाराचे आर्थिक वृध्दीतील योगदान :-

आज आंतरराष्ट्रीय व्यापाराला आर्थिक वाढीचे इंजिन म्हणून कार्य करण्याची अपेक्षा केली जावू शकत नाही. तरीही आजच्या विकसनशील राष्ट्रांच्या आर्थिक वाढीसाठी त्यात बरेच मार्ग आहेत.

प्रा. जी. हॅबेरलर यांच्यामते, आंतरराष्ट्रीय व्यापार आर्थिक विकासावर खालील फायदेशीर प्रभाव पाडूशकतात.

## १. संसाधनांचा पूर्ण वापर :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे देशाच्या निष्क्रिय आणि अल्प कार्यरत संसाधनाचा पूर्ण उपयोग होवू शकतो. पुढील आकृतीत आंतरराष्ट्रीय व्यापार नसताना एक विकसनशील देश I बिंदूत कार्यरत असतो. मात्र आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे त्या संबंधीत देशाचा समतोल I बिंदूवरून E बिंदूवर जाईल, त्यामुळे उत्पादनाची संसाधने कार्यक्षमपणे वापरली जावून उत्पादनात वाढ होईल. त्यामुळे देशातील उत्पादनाचा समतोल उत्पादन शक्यता वक्रावर होईल.




**आकृती २.१ : व्यापाराचा उत्पादनावरील परिणाम**

वरील आकृती २.१ मध्ये आंतरराष्ट्रीय व्यापाराचा उत्पादनावर होणारा परिणाम दर्शविला आहे. OX अक्षावर उपभोग्य वस्तू व OY अक्षावर भांडवली वस्तू उत्पादन दर्शविले आहे. AZ ही रेषा उत्पादनाची उत्पादन शक्यता रेषा आहे. आंतरराष्ट्रीय व्यापार नसताना $OC_0$ एवढ्या उपभोग्य वस्तू आणि $OK_0$ एवढ्या भांडवली वस्तूचे उत्पादन होते. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे उपलब्ध संसाधनाचा पर्याप्त वापर होवून उपभोग्य वस्तूचे उत्पादन $OC_0$ वरून $OC_1$ पर्यंत वाढते तर भांडवली वस्तूंचे उत्पादन $OK_0$ वरून $OK_1$ पर्यंत वाढते. उत्पादनाचा देशाचा समतोल I बिंदूवरून E बिंदूत स्थापन होतो. म्हणजे E बिंदूत उत्पादन शक्यता वक्रावर उत्पादन संसाधनाचा पूर्ण वापर होवून उत्पादन वाढते याचे प्रमुख कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय.

## २. श्रम विभाजन आणि विशेषीकरण :-

संकुचित देशांतर्गत बाजारपेठेसाठी वस्तूंचे उत्पादन झाल्यास श्रम विभागणी व विशेषीकरणास फारसी व्याप्ती असत नाही. जर त्याऐवजी उत्पादन मोठ्या आणि अमर्याद निर्यात बाजारपेठेसाठी होत असेल तर तेथे विशेषीकरणासाठी अधिक प्रमाणात संधी आहे. हे प्रत्यक्षात लहान अर्थव्यवस्था असणाऱ्या तैवान, हाँगकाँग अणि सिंगापूर या देशात लाईट उत्पादन करणाऱ्या उद्योगाबाबत घडले आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे श्रम विभाजन, आणि विशेषीकरणास वाव मिळून उत्पादन वाढ व दर्जा निर्माण होवून आर्थिक वृध्दी गतिमान होते.

## ३. ज्ञान हस्तांतरण (Transmission of Knowledge) :-

आंतरराष्ट्रीय व्यापार नेहमी नवीन कल्पना, नवीन तंत्रज्ञान आणि नवीन व्यवस्थापकीय आणि संस्थात्मक कौशल्यांच्या प्रसारणासाठी वाहन म्हणून कार्ये करतो. ज्ञान हा उत्पादनाचा एकमेव घटक आहे कि त्यास घटत्या उत्पादन फलाचा नियम लागू पडत नाही.

## ४. भांडवल प्रवाह :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे विकसनशील देशांपासून विकसित होणाऱ्या आर्थिक भांडवलाचा प्रवाह सुलभ होतो. विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूकीच्या बाबतीत जेथे विदेशी कंपन्या किंवा बहुराष्ट्रीय कंपन्या त्यांच्या गुंतवणूकीवर व्यवस्थापकीय नियंत्रण ठेवतात. तेथे उत्पादन युनिटस चालविण्यासाठी विदेशी भांडवल कौशल्यपूर्ण कर्मचाऱ्यासह असते.

## ५. देशांतर्गत मागणी उत्तेजीत करणे :-

भारत, ब्राझिल आणि इतर मोठ्या विकसनशील देशांच्या बाबतीत, नवीन उत्पादित वस्तूंच्या आयातीने प्रारंभिक टप्प्यात देशांतर्गत मागणीला उत्तेजन दिले जाते, तेव्हा या वस्तूचे कार्यक्षम देशांतर्गत उत्पादन आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य नसते. औद्योगिकीकरणाच्या प्रारंभीच्या टप्प्यात उत्पादित वस्तूंची मागणी निर्माण करण्यासाठी आणि औद्योगिकीकरणाच्या आणि आर्थिक विकासाच्या नंतरच्या टप्प्यावर आयात पर्यायी वस्तूंच्या देशांतर्गत उत्पादनास उत्तेजन देण्यासाठी उर्वरित जगांशी संपर्क साधल्याने एक प्रभावी घटक म्हणून कार्य केले जाते.

## ६. स्पर्धेला प्रोत्साहन :-

विदेशी स्पर्धा सुरू करण्यास सक्षम होण्यासाठी आणि दीर्घ कालावधीत टिकून राहण्यासाठी आंतरराष्ट्रीय व्यापार अनेकवेळा कार्यक्षमतेसाठी विदेशी देशांतर्गत उत्पादकांद्वारे मक्तेदारी विरोधी शस्त्र

म्णून कार्य करतो. वस्तूंच्या देशांतर्गत उत्पादनात मुख्य किंवा गौण आदाने म्हणून वापरल्या जाणाऱ्या मध्यस्थ (intermediate) आणि अर्थ उत्पादीत उत्पादनांचा खर्च आणि किंमत ठरविण्यात आंतरराष्ट्रीय व्यापार महत्त्वाचा आहे यात शंका नाही.

## २.२.२ आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ निर्धारित करणारे घटक, व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मापन आणि वितरण (Factors affecting Gains from International Trade)

आंतरराष्ट्रीय व्यापारापासून सर्वच देशांना लाभ होतो, परंतु विभिन्न देशांमध्ये या लाभाचे वितरण भिन्न-भिन्न तत्त्वांद्वारे स्पष्ट करण्यात येते. उत्पादन खर्चानुसार लाभाच्या परिणामात परिवर्तन घडून येते व दोन भिन्न देशात एकाच वस्तूच्या उत्पादन खर्चात भिन्नता येते. या भिन्नतेमुळेच व्यापार लाभ होतो. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ पुढील बाबींवर अवलंबून असतात.

### १. खर्च गुणोत्तरात फरक (Differences in Cost Ratios) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारातील लाभाचे दोन व्यापारिक देशांमध्ये तुलनात्मक खर्च गुणोत्तरांमधील फरकांवर अवलंबून असतात. लाभाचा आकार हा दोन देशातील प्रत्येक वस्तूंच्या उत्पादन खर्चावर अवलंबून असतो. तुलनात्मक खर्च गुणोत्तरामध्ये मोठी भिन्नता असल्यास व्यापारापासूनच्या लाभाचा आकार मोठा राहतो. दोन देशातील वस्तूंच्या खर्च गुणोत्तरातील अंतर जसजसे कमी होत जाते. तसतसा व्यापार लाभ कमी-कमी होत जातो. हे अंतर जेव्हा पूर्णपणे नाहीसे होते म्हणजे दोन देशातील खर्च गुणोत्तर समान होतात, तेव्हा व्यापार लाभ नष्ट होतो. लाभाचा आकार हा दोन देशातील प्रत्येक वस्तूच्या उत्पादन खर्चावर अवलंबून असतो. समजा A देशातील कामगारांची कार्यक्षमता वाढल्यास गव्हाच्या उत्पादनाचा खर्च घटतो. त्यामुळे B देशाला व्यापारापासून लाभ होतो. याउलट B देशातील उत्पादनाचा खर्च कमी झाल्यास A देशाला व्यापारापासून लाभ मिळेल. यामुळे जर तुलनात्मक खर्च गुणोत्तरात मोठा फरक असल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ मोठा मिळतो.

### २. अन्योन्य किंवा पारस्पारिक मागणी :-

व्यापार शर्ती या अन्योन्य मागणीवर अवलंबून असतात. जेव्हा दोन्ही देशांची परस्परांच्या वस्तूंकरिता असणारी मागणीची लवचिकता व पुरवठ्याची लवचिक यांच्यात व्यवस्थित सामंजस्य प्रस्थापित होत असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ प्राप्त होतो. उदा. समजा A देशाची Y वस्तूसाठी मागणीची लवचिकता अलवचिक असल्यास व्यापारशर्ती $1X = 1Y$ $(X = Y)$ असणार नाहीत तर व्यापारशर्ती या B देशाला अनुकूल असतील आणि A देशाच्या विरुध्द असतील. B ला लाभ अधिक मिळतील तर A कमी मिळतील. दुसऱ्या बाजूला जर A ची Y वस्तूसाठी मागणी अधिक लवचिक असेल

तर व्यापार शर्ती A ला अनुकूल आणि B च्या विरोधी असतील. A ला आंतरराष्ट्रीय व्यापारापासून अधिक लाभ मिळतील तर B ला कमी लाभ मिळतील. अशा प्रकारे एखादा देश व्यापारातून सर्वाधिक लाभ मिळवितो ज्याची विदेशी वस्तूची मागणी अत्यंत लवचिक आहे आणि इतर देशांची त्यांच्या वस्तूसाठी मागणी अधिक अलवचिक असते.

### ३. वास्तव उत्पन्नात वृध्दी (Increase in Real Income) :-

देशाच्या वास्तव उत्पन्नात वाढ होणे हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सर्वात मोठा लाभ आहे. त्यानुसार शुध्द राष्ट्रीय उत्पन्नात ही वाढ होते. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचा आकार हा देशाच्या पैशातील उत्पन्नाच्या पातळीमुळे निर्धारित होतो. ज्या देशाच्या वस्तूंना इतर देशांकडून स्थिर मागणी असेल तर त्याची उच्च उत्पन्न पातळीवर पैशाची कमाई होईल. जर त्यांच्या निर्यातीची मागणी जास्त असेल तर निर्यात उद्योग विस्तारीत होतील. परिणामी, या उद्योगांमध्ये उत्पन्नाची पातळी वाढेल. श्रमीकातील स्पर्धा ही इतर उद्योगांना सक्तीने निर्यात उद्योगातील पैशातील वेतनाबरोबर वेतन वाढविण्यास भाग पाडेल. म्हणून सर्वसाधारणपणे देशातील पैशातील उत्पन्नाची पातळी वाढते; परंतु देशाने आयात केल्या जाणाऱ्या विदेशी वस्तूंच्या किंमती कमी होतील आणि लोकांच्या पैशातील उत्पन्न उच्च वाढ होईल. त्यामुळे देशातील लोकांना स्वस्त आयात केलेल्या वस्तूंचा उपभोग घेता येईल. दुसऱ्या बाजूला ज्या देशाकडे विदेशी वस्तूंसाठी उच्च मागणी असेल तर पैशातील उत्पन्न कमी राहील. जर विदेशी वस्तूंना उच्च मागणी असेल तर त्यांच्या किंमती उच्च राहतील. त्यामुळे लोक आयात वस्तूंचा उपभोग गमावतील.

### ४. व्यापारशर्ती (Terms of Trade) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारापासूनचे लाभ ठरविणारा सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे व्यापारशर्ती होय. व्यापारशर्ती या एका देशातील वस्तू दुसऱ्या देशातील वस्तूंसाठी ज्या दराने विनिमय होतात किंवा केल्या जातात. त्या दराशी संबंधित आहेत. हे वस्तूविनिमय व्यापार शर्तीशी संबंधित असून जे एस. मिल यांनी याचा वापर आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे निर्धारण आणि वितरणासाठी केला आहे. आधुनिक विश्लेषणातही व्यापार शर्ती आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ निर्धारित करतात. परंतु जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारास सुरुवात होते, तेव्हा व्यापारशर्ती बदलतात आणि त्या देशांतर्गत व्यापारशर्तीपेक्षा भिन्न असतात. हे व्यापारापासून फायदे ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारशर्ती आहेत. सामान्यत: व्यापारशर्ती अनुकूल असतील तर व्यापार परिणामात व लाभात वाढ होते.

### ५. उत्पादक कार्यक्षमता (Productive Efficiency) :-

देशाच्या उत्पादक कार्यक्षमते वाढ झाल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारापासून लाभ मिळतात. हे

देशांतर्गत उत्पादन खर्चात आणि किंमतीत घट करतात. याचा परिणाम म्हणून इतर देश स्वस्त वस्तूंची आयात करून आणि व्यापाराच्या अटी सुधारून लाभ मिळवितात पण देशांतर्गत भागात नुकसान होते. दुसरीकडे, विदेशात उत्पादक कार्यक्षमता वाढल्यास त्यांच्या वस्तू स्वस्त होतील यामुळे या देशांकडून आयात आपण वाढवितो, त्यांच्या व्यापारशर्ती सुधारतील आणि व्यापारापासून लाभ मिळतो.

### ६. निर्यात वस्तूंचे स्वरूप (Nature of Commodities Exported) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे निर्धारण करणारा महत्त्वाचा आणखी एक घटक म्हणजे निर्यात केलया गेलेल्या वस्तूचे स्वरूप होय. एखादा प्रामुख्याने जर प्राथमिक वस्तूंची निर्यात करीत असेल तर त्यांच्यासाठी व्यापारशर्ती प्रतिकूल राहतील. परिणामी व्यापारापासून त्याचा लाभ कमी राहतो. याउलट उत्पादित वस्तू निर्यात करणाऱ्या देशासाठी व्यापार शर्ती अनुकूल राहून त्यांना आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ जादा असतात.

### ७. तांत्रिक प्रगती :-

ज्या देशांजवळ पुरेशा प्रमाणात भांडवल उपलब्ध आहे तसेच तांत्रिक व आर्थिक प्रगती आहे. अशा देशांतील वस्तूंकरिता अधिक मागणी असते. अशा देशांचा विदेशी व्यापार यशस्वी होतो. याउलट जे देश तांत्रिक आर्थिकदृष्ट्या मागासलेले असतात, ज्या देशात श्रमप्रधान तंत्राचा वापर केला जातो. अशा देशांचा विदेशी व्यापार कमी असतो व त्यापासून मिळणारा लाभ पण कमी असतो. कारखानी वस्तूंची निर्यात करणाऱ्या देशांना व्यापारशर्ती अनुकूल असतात व व्यापार जास्त होतो. याउलट प्राथमिक वस्तूंची निर्यात करणाऱ्या देशांना व्यापारशर्ती प्रतिकूल असतात व त्यामुळे व्यापार लाभ कमी मिळतो.

### ८. देशाचा आकार (Size of the Country) :-

व्यापारातील वृध्दी देशाच्या आकारावर अवलंबून असते. एखादा लहान देश जे त्या वस्तूंच्या उत्पादनात विशेषीकरण आहे, त्यामध्ये तुलनात्मकदृष्ट्या लाभ घेतो तो मोठ्या देशाशी विनिमय करतो. स्थिर संधी खर्च आणि भिन्न मागणी आकृतीबंध परिस्थितीनुसार विदेशी बाजारपेठेतील किंमती देशांतर्गत किंमतीपेक्षा भिन्न असतात, लहान देशांसाठी व्यापारातून मिळणारे लाभ अधिक असतील.

### ९. विक्री कौशल्य :-

देशाच्या विक्रीक्षमतेवर सुध्दा लाभाची मात्रा अवलंबून असते. कारण या विक्रीक्षमतेमुळे नवीन बाजारपेठांमध्ये नवीन ग्राहक आकर्षित करता येतात. त्यामुळे मालाची विक्री व लाभ दोन्ही वाढतात.

## १०. उत्पादन कार्यातील कौशल्य :-

कोणताही देश जेव्हा विशिष्ठ उत्पादनाचे विशेषीकरण करतो तेव्हा त्या देशाची उत्पादनातील कार्यक्षमता व कुशलता वाढते. त्यामुळे उत्पादन व्यय कमी होतो. कार्यक्षमतेमुळे या देशाला लाभ मिळतो व त्याचबरोबर व्यापार शर्ती अनुकूल होतात. अशा परिस्थितीत व्यापाराचे परिमाण व लाभाची मात्रा या दोन्हीतही वृध्दी होते.

## ❑ व्यापार लाभाचे मोजमाप (Measurement & Distribution of Gains from Trade) :-

एखाद्या विशिष्ठ कालावधीत कोणत्याही देशाला मिळणाऱ्या व्यापार लाभावर ज्या विशिष्ठ कारकांचा प्रभाव पडतो, त्यांचे विश्लेषण केल्यास व्यापार लाभाचे मोजमाप करता येते. अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मोजमाप करण्यासाठी विविध पध्दती स्विकारल्या आहेत.

जॉकब विनर यांच्या मते, सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी आंतरराष्ट्रीय व्यापारापासूनचे लाभ मोजण्यासाठी तीन पध्दती वापरल्या आहेत. (१) तुलनात्मक खर्चातील फरक (२) राष्ट्रीय उत्पन्न पातळीतील वाढ (३) व्यापार शर्ती. परंतु सनातनवादी स्पष्टपणे निर्दिष्ट केल्याशिवाय या पध्दतीची अंत:क्रिया करतात. यामध्ये रिकार्डोचा दृष्टिकोन व जे. एस. मिलच्या दृष्टिकोनाचा समावेश होतो. हॉसिंगचा दृष्टिकोन ही मोजमापामध्ये महत्वपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मोजमाप करण्यासाठी आधुनिक दृष्टिकोनाची मांडणी करण्यात आली. यामध्ये विनिमय आणि विशेषीकरण या दोन बाबींवर व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मोजमाप करताना पुढील कारकांचा प्रभाव पडतो.

## १. वस्तूंच्या उत्पादन खर्चात घट :-

आयात किंवा निर्यातकेल्या जाणाऱ्या वस्तूंच्या उत्पादन खर्चात देशांतर्गत किंवा परदेशात कुठेही घट झाली तर आंतरराष्ट्रीय व्यापारात लाभ होतो. समजा एखादा देश परदेशातून ज्या वस्तूंची आयात करतो. त्यांचा उत्पादन खर्च काही कारणाने घटला तर त्या आयातीची किंमत कमी झाली तर देश व परदेश यांच्या व्यापार परिणामात व व्यापार लाभात वाढ होते.

## २. वास्तव उत्पन्नात वाढ :-

देशाच्या वास्तव उत्पन्नात वाढ होणे हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सर्वात मोठा लाभ आहे. त्यानुसार निव्वळ राष्ट्रीय उत्पन्नातही वाढ होते. उद्योगाची प्रगती होणे हा उत्पन्नातील वाढीचा आधार आहे. औद्योगिक विकासामुळे रोजगार व उत्पादनात वाढ होते. त्यामुळे मौद्रिक उत्पन्नात भर पडून

राहणीमानाचा दर्जा सुधारतो. वास्तव उत्पन्नातील वाढ हा व्यापार लाभाचे मोजमाप करण्यासाठी महत्त्वाचा घटक मानला जातो. देशाच्या निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न मोठ्या प्रमाण वाढ होत असेल तर व्यापारात सहभागी होणाऱ्या दोन्ही देशांना होणारे व्यापारापासूनचे लाभ वाढतील.

### ३. व्यापारशर्ती :–

आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचा कल दर्शविण्याचे कार्य व्यापारशर्ती करीत असतात. वस्तूगत व्यापारशर्तीदवारे, निर्यातीमुळे देशाला प्राप्त होणाऱ्या किंमती व आयातीकरिता द्याव्या लागणाऱ्या किंमती यांच्यातील संबंध कळून येतो. निर्यात वस्तूंच्या किंमतीत वाढ व आयात वस्तूंच्या किंमतीत घट होते, तेव्हा व्यापारशर्ती सुधारतात.

### ४. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आकारमानात व रचनेत बदल :–

निर्यात होणाऱ्या वस्तूंच्या उत्पादन खर्चात, आयात होणाऱ्या मालाच्या संभाव्य देशांतर्गत खर्चात व या दोन्हीच्या विनिमय गुणोत्तरात कोणताही बदल न झाल्यास, व्यापाराच्या आकारमानातील वाढीमुळे राष्ट्रीय उत्पन्नात व आवडी–निवडीत बदल घडून येतात. परिणामत: व्यापार लाभात वाढ झाल्याचे दिसून येते. निरनिराळ्या आयात वस्तूंपासून तसेच निर्यात होणाऱ्या वस्तूंपासून मिळणारा लाभ हा भिन्न–भिन्न असतो. याउलट आंतरराष्ट्रीय व्यापारात तुलनात्मक खर्चात कमी अंतर असलेल्या वस्तूंचा जास्त प्रमाणात समावेश असेल तर व्यापारातील लाभात घट झालेली निदर्शनास येते.

व्यापार न केल्याने होणाऱ्या हानीचे मोजमाप केल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाची कल्पना करता येते. देशांतर्गत उत्पादन शक्य नसणाऱ्या वस्तूंच्या व्यापारापासून लाभावर होणारा परिणामही विचारात घ्यावा लागतो. अशा वस्तूंचे उत्पादन देशात केल्यास उत्पादन खर्च प्रचंड असतो. म्हणून अशी वस्तू जर विदेशातून आयात केल्यास व्यापाराचा लाभ अधिक राहतो.

## २.२.३ व्यापार शर्ती (Terms of Trade) :-

व्यापार शर्ती म्हणजे आयातीच्या बाबतीत निर्यातीची तुलनात्मक किंमत होय. आयात किंमतीला निर्यात किंमतीचे गुणोत्तर म्हणजे व्यापार शर्ती होय. निर्यात वस्तूंच्या प्रत्येक मात्रेमागे अर्थव्यवस्था खरेदी करू शकणाऱ्या आयात वस्तूंची संख्या म्हणून याचा अर्थ लावला जाऊ शकतो. एखाद्या देशाच्या व्यापाराच्या शर्तींमध्ये सुधारणा केल्यामुळे देशाला कोणत्याही निर्यातीच्या स्तरावर अधिक आयात खरेदी करता येईल. व्यापार शर्ती विनिमय दराने प्रभावीत होवू शकतात, कारण देशाच्या चलनाच्या मूल्यातील वाढ त्याच्या आयातीच्या स्थानिक किंमती कमी करते, परंतु ती निर्यात करणाऱ्या वस्तूंच्या किंमतीवर प्रत्यक्ष परिणाम करू शकत नाही.

व्यापार शर्तीचा अर्थ अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ फ्रँक विल्यम टॉसिंग यांनी सन १९२७ साली आपल्या _International Trade_ या ग्रंथ मांडला. तथापि या संकल्पनेची पूर्वीचीआवृत्ती इंग्रजी अर्थशास्त्रज्ञ रॉबर्ट टोरन्स (Robert Torrens) यांनी १८४४ साली लिहिलेल्या "The Budget : On commercial and Colonial Policy" या ग्रंथात मांडली. तसेच जॉन स्टुअर्स मिल यांच्या "Essay of Nations; and the Distribution of Gains of Commerce among the countries of Commercial World." लेखात यापूर्वीच १९२९-३० मध्ये लिखीत स्वरूपात होते.

## ❑ व्यापार शर्ती संकल्पना :-

व्यापार शर्ती या निर्यात केलेल्या वस्तूंच्या मात्रांसाठी अर्थव्यवस्था किती आयात करू शकते, याचे मोजमाप आहे. उदा. जर एखादी अर्थव्यवस्था फक्त सफरचंद निर्यात करीत असेल आणि फक्त संत्री आयात करीत असेल तर व्यापारी शर्ती केवळ संत्र्यांच्या किंमतीद्वारे विभाजित केलेल्या सफरचंदाच्या किंमतीची आहेत. दुसऱ्या शब्दात सफरचंदाच्या एका मात्रेसाठी किती संत्री मिळविल्या जाऊ शकतात म्हणून व्यापार शर्तीचे मापन करताना निर्यात केलेल्या आणि आयात केलेल्या वस्तूंच्या किंमती निर्देशांकाची आवश्यकता असते आणि दोन्हीची तुलना करते.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत निर्यात केलेल्या वस्तूंच्या किंमतीत वाढ केल्यास व्यापारशर्ती वाढतील तर आयात केलेल्या वस्तूंच्या किंमतीत वाढ होईल. उदा. तेल निर्यात करणाऱ्या देशांमध्ये तेलाच्या किंमती वाढल्या असताना त्यांच्या व्यापार शर्तीमध्ये वाढ दिसून येईल, तर तेल आयात करणाऱ्या देशांच्या निर्यातीत घट होईल. आंतरराष्ट्रीय व्यापारात ज्या मूल्यावर वस्तूंची देवाण-घेवाण होते त्याला 'आंतरराष्ट्रीय विनिमय गुणोत्तर किंवा व्यापारशर्ती संकल्पना असे म्हणतात. हे मूल्य देशात निर्धारित होणाऱ्या बाजार मूल्यापेक्षा भिन्न असते.'

'कोणताही देश ज्या प्रकारच्या वस्तूंची निर्यात करतो त्यांचे मूल्य व ज्या प्रकारच्या वस्तूंची आयात करतो त्यांचे मूल्य या संबंधास व्यापार शर्ती म्हणतात.'

व्यापार अटी किंवा शर्तीचे सूत्र पुढीलप्रमाणे :-

$$\text{व्यापारशर्ती} = \frac{\text{आयातीचे एकूण मूल्य}}{\text{निर्यातीचे एकूण मूल्य}}$$

व्यापार शर्तीचे अनुकूल व्यापार शर्ती व प्रतिकूल व्यापार शर्ती असे वर्गीकरण केले जाते. जेव्हा देश करीत असलेल्या आयातींच्या मोबदल्यात कमी वस्तूंची निर्यात करीत असतो किंवा देश निर्यात करीत असलेल्या वस्तूंच्या मोबदल्यात जास्त वस्तूंची आयात होत असते, तेव्हा त्या देशाला व्यापार अटी

अनुकूल असतात. दुसऱ्या बाजूला जेव्हा देश त्याने केलेल्या आयात मात्रांच्या बदल्यात आता निर्यातीच्या जास्त मात्रा देत असेल तर त्या देशाला व्यापार शर्ती प्रतिकूल होतात. एखाद्या देशाला व्यापार शर्ती अनुकूल आहेत याचा अर्थ ज्याच्याशी व्यापार होत आहे त्या देशाला व्यापार शर्ती प्रतिकूल आहेत. व्यापार शर्तीच्या विविध संकल्पना पुढील प्रमाणे आहेत.

## १. वस्तुगत व्यापार शर्ती (Commodity Terms of Trade = TC) :-

वस्तुगत व्यापार शर्तीस प्रा. टॉसिंग 'निव्वळ वस्तूविनिमय व्यापार शर्ती (Net Barter Terms of Trade) असे म्हणतात. वस्तुगत व्यापार शर्तीची संकल्पना पुढीलप्रमाणे मांडली.

$$T_C = \frac{P_X}{P_M}$$

$T_C$ = वस्तूगत व्यापारशर्ती.

P = किंमत निर्देशांक,

X = निर्यात,

M = आघात.

दोन कालावधीतील व्यापारशर्तीमधील तुलना करण्यासाठी खालील सूत्राचा उपयोग करतात.

$$\frac{PX_1}{PM_1} : \frac{PX_0}{PM_0}$$

आयात किंमत निर्देशांक २४० आहे. निर्यात किंमत निर्देशांक ३०० आहे. मात्र मूळ वर्षाचा किंमत निर्देशांक दोन्हीसाठी १०० मानला आहे.

$$\frac{300}{240} : \frac{100}{100} = 1.2 \ : \ 1$$

वरील सूत्रावरून हे स्पष्ट होते की, व्यापारशर्ती या २०% नी अनुकूल आहेत. आयात किंमतीच्या तुलनेत निर्यात किंमतीचा निर्देशांक २०% अधिक आहे. ही अधिक उपयुक्त संकल्पना आहे. निव्वळ वस्तूविनिमय व्यापार शर्तीचा उपयोग देशातील व्यापार तोलातील अल्पकालीन बदल मापनासाठी होतो. आयातीच्या तुलनेत देशाच्या निर्यातीची खरेदी शक्ती स्पष्ट करण्यासाठी वापर केला जातो. व्यापार लाभातील बदलांची संकल्पना ही वस्तुगत व्यापार शर्तीत होणाऱ्या बदलाकडून येत असली तरी वस्तूंच्या दर्जात व व्यापार रचनेत होणारे बदल, व्यापाराचे आकारमानात होणारे बदल व निर्यात उद्योगाच्या

कार्यक्षमतेत होणारे बदल झाल्यास त्याचा व्यापार लाभावर होणारा महत्त्वपूर्ण परिणाम विचारात घ्यावा लागतो.

## २. उत्पन्न व्यापार शर्ती (Income Terms of Trade = TY) :-

व्यापाराच्या आकारमानात झालेल्या बदलाच्या परिणामाचा विचार वस्तुगत व्यापार शर्तीत होत नाही. ही त्रुटी दूर करण्याकरिता उत्पन्न व्यापार शर्तीची संकल्पना जी. एस. डॉरन्य यांनी मांडली. ती पुढील प्रमाणे :-

$$T_V = \frac{P_X \cdot Q_X}{P_M}$$

TV हे उत्पन्न व्यापार शर्ती आहे, PX हे निर्यातीची किंमत, QX हे निर्यातीच्या मात्रा आणि Pm हे आयातीची किंमत दर्शवित आहे.

हा निर्देशांक देशाच्या आयातीच्या क्षमतेतील बदल दर्शविण्यासाठी वापरला जातो. $P_X \cdot Q_X$ च्या सहाय्याने निर्यातीचे एकूण मूल्य दर्शविले जाते. यास Pm ने भागिले असता Qm म्हणजे आयातीची मात्रा मिळते. देशाच्या उत्पन्न व्यापार शर्तीतील बदल हा पुढील प्रमाणे मोजला जातो. I = TQ = I हे देशाची उत्पन्न व्यापार शर्ती आहे. T हे देशाची निव्वळ वस्तूगत व्यापार शर्ती आणि Q हे देशाची निर्यात आकार निर्देशांक आहे.

TC म्हणजे वस्तूगत व्यापार शर्तीला निर्यातीच्या आकारमानातील बदलाच्या निर्देशांकाने गुणिले असता उत्पन्न व्यापार शर्ती (Ty) मिळतात. निर्यातीच्या प्रत्येक मात्रेच्या मोबदल्यात कमी आयाती मिळत असल्या तरी देशाची आयात क्षमता सुधारलेली आहे याची कल्पना येते. ही कल्पना वस्तुगत व्यापार शर्तीवरून येत नाही.

उत्पन्न व्यापार शर्तीची मर्यादा म्हणजे या शर्तीवरून देशाच्या उत्पन्नात काय बदल झाला याची कल्पना येत नाही. त्यामुळे व्यावहारिक उपयुक्तता कमी राहते, असे असले तरी आयातीची किंमत देश निर्यातीद्वारे देवू शकतो किंवा नाही याची कल्पना येण्याकरिता या अटी उपयुक्त आहेत.

## ३. एक घटक व्यापार शर्ती (Single Factoral Terms of Trade) :-

वस्तूगत व्यापार शर्तीच्या संकल्पनेपेक्षा घटक व्यापार शर्तीची संकल्पना सुधारणात्मक आहे. ही संकल्पना डॉ. मार्शल यांनी त्यांच्या Offer Curve Technique च्या विकासासाठी वापरली. एक घटक व्यापार शर्ती ची मांडणी व्हायनर यांनी वस्तूगत व्यापार शर्तीतील दोष दूर करण्यासाठी केली आहे.

याकरिता त्यांनी निर्यात वस्तूच्या उत्पादन परिव्ययाचा म्हणजेच उत्पादकतेचा निर्देशांक तयार केला. हा निर्देशांक निर्यात वस्तूंच्या उत्पादनाचा सरासरी तांत्रिक गुणक या स्वरूपात तयार करण्यात येतो. वस्तुगत व्यापार शर्तीच्या (TC) निर्देशांकाला या सरासरी, तांत्रिक गुणकाच्या निर्देशांकाच्या व्यस्तांकाने गुणल्यास त्यामुळे मिळणारा फलित निर्देशांक हा व्यापार लाभाची प्रवृत्ती वस्तुगत व्यापार अटीच्या निर्देशांकापेक्षा अधिक चांगल्या पध्दतीने स्पष्ट करू शकतो. पुढील सूत्राच्या सहाय्याने स्पष्ट केले जाते.

$$T_S = \frac{P_X}{P_M} \cdot F_X$$

येथे TS = एक घटक व्यापारशर्ती,

$\frac{P_X}{P_M}$ हे वस्तूगत व्यापारशर्ती आणि,

$F_X$ हे निर्यात उद्योगातील उत्पादकता निर्देशांक आहे.

जर निर्यात उद्योगातील देशाची उत्पादकता वाढली. उदा. २०% ने वाढली सुधारित यंत्रसामग्रीचा वापर किंवा सुधारीत पद्धतीच्या वापराने उत्पादकता वाढली तर उत्पादनाचा खर्च २०% नी कमी होतो. उपलब्ध आदानाच्या साहाय्याने उत्पादनात २०% ने वाढ होते. जर आयातीच्या तुलनेत निर्यातीच्या किंमती २०% ने घटल्या तर देशाला आर्थिकदृष्ट्या नुकसान होत नाही तर फायद्याचे असते, कारण उत्पादन खर्च २०% घटला आहे. एक घटक व्यापार शर्ती या देशाच्या आर्थिक विकासाची वास्तव स्थिती दर्शवितात व ते वस्तुगत व्यापार शर्तीपेक्षा सर्वश्रेष्ठ आहेत.

एक घटक व्यापार शर्तीच्या प्रमुख मर्यादा म्हणजे आयातीच्या संभाव्य स्वदेशी उत्पादन खर्चातील बदलाचा विचार केलेला नाही, हे दूर करून वास्तविक लाभाची कल्पना यावी याकरिता व्हायनर यांनीच वास्तविक खर्च व्यापार शर्तीचा निर्देशांक उपयोगात आणण्याची सूचना केली. एखाद्या देशातील उत्पादक घटकांच्या सेवांचा विदेशी वस्तूंशी कोणत्या दराने विनिमय होतो हे या व्यापार शर्ती द्वारे स्पष्ट होते.

## ४. द्विघटक व्यापार शर्ती (Double Factoral Terms of Trade) :-

जॉकब विनर यांनी एक घटक व्यापार शर्तीतील कमतरता दूर करून द्वि घटक व्यापार शर्तीचा निर्देशांक निर्माण केला. द्विघटक व्यापार शर्ती निर्देशांक हा देशाला निरपेक्ष लाभ किती मिळतो हे दर्शविणाऱ्या निर्देशांकाऐवजी लाभाची आंतरराष्ट्रीय विभागणी कशाप्रकारे होते हे दर्शविणाऱ्या निर्देशांकाला अधिक जवळचा आहे. या संकल्पनेनुसार देशाच्या निर्यातीला केवळ वास्तविक प्रयत्नांनाच नव्हे तर पुरवठादार देशांद्वारे आयात करण्याच्या वास्तविक प्रयत्नांचाही विचार केला जातो. सूत्ररूपाने पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

$$Td = \frac{P_X}{P_M} \cdot \frac{F_X}{F_M}$$

Td हे द्विघटक व्यापार शर्ती आहे;

$\frac{P_X}{P_M}$ हे वस्तूगत व्यापार शर्ती आहे,

$F_X$ हा निर्यात उद्योगांचा उत्पादकता कार्यक्षमता निर्देशांक आहे.

$F_M$ हा पुरवठा दर देशातील आयात उद्योगांचा उत्पादकता कार्यक्षमता निर्देशांक आहे.

एखादा देशाच्या द्विघटक व्यापार शर्ती मोजणे, व्यावहारिकदृष्ट्या शक्य नाही, कारण इतर देशाचे आयात उद्योगाची उत्पादकता कार्यक्षमता निर्देशांक देशांतर्गत निर्यात उद्योगाबरोबर मोजणे आणि तुलना करणे आवश्यक आहे. तसेच विदेशामध्ये आयात करण्यासाठी आवश्यक उत्पादकता घटकांच्या गुणवत्तेपेक्षा दिलेल्या निर्यातीसह आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंची संख्या अधिक महत्त्वाची आहे. जर उद्योग स्थिर उत्पादन फलाच्या नियमानुसार चालत असेल, वाहतूक खर्चाचा समावेशाशिवाय असेल तर निव्वळ विनिमय व्यापार शर्ती आणि द्विघटक व्यापार शर्ती यामध्ये फरक असत नाही. किंडलबर्नरच्या मते, एक घटक व्यापार शर्ती या द्विघटक व्यापारशर्तीपेक्षा अधिक उपयुक्त आहे.

## ५. स्थूल वस्तुविनिमय व्यापार शर्ती (Gross Barter Terms of Trade) :-

निव्वळ वस्तुविनिमय व्यापार अटीमधील दोष दूर करण्याकरिता टॉसिंग यांनी स्थूल वस्तुविनिमय व्यापार शर्तीची संकल्पना मांडली.

स्थूल वस्तुविमिनय व्यापार शर्ती या वस्तूंच्या किंमती ऐवजी वस्तूंच्या परिमाणाशी असतो. यामध्ये वास्तव निर्यात परिमाण किंवा मात्रा आणि वास्तव आयात परिमाण लक्षात घेण्यात येतो. निर्यातयोग्य वस्तूशी आयातयोग्य वस्तूचे उच्च गुणोत्तर हे अधिक अनुकूल स्थूल वस्तुविनिमय व्यापारशर्तीचे निर्देशांक आहे. पुढील सूत्राच्या साहाय्याने ही संकल्पना अधिक स्पष्ट करता येईल.

$$Tg = \frac{Q_M}{Q_X}$$

येथे Tg = स्थूल वस्तूविनिमय व्यापार शर्ती, $Q_M$ = आयातीची मात्रा आणि $Q_X$ = निर्यातीची मात्रा.

या शर्तीद्वारे आयातीच्या एकूण भौतिक मात्राचा निर्यातीच्या एकूण मात्रांशी संबंध असतो. जेव्हा

देशाच्या आयातीच्या एकूण भौतिक मात्रांमध्ये वाढ होते, परंतु निर्यातीच्या एकूण भौतिक मात्रा स्थिर असतात. तेव्हा त्या देशाच्या व्यापार शर्तीत सुधारणा झाली आहे असे समजतात. याउलट घडल्यास व्यापार शर्ती प्रतिकूल होतात.

## ६. वास्तव खर्च व्यापार शर्ती (Real Cost Terms of Trade) :-

घटक व्यापार शर्तीच्या संकल्पनेद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे वास्तव लाभ मोजणे कठिण झाल्यावर विनर यांनी 'वास्तव खर्च व्यापार शर्ती' ही संकल्पना वापरली. निर्यात म्हणजे उपयोगितेचे नुकसान आहे कारण निर्यात वस्तूंच्या उत्पादनासाठी वापरलेल्या संसाधनाच्या सहाय्याने अंतर्गत उपभोगाच्या वस्तूचे उत्पादन करता येते. निर्यातीमुळे उपयोगितेचे नुकसान आणि आयातीमुळे उपयोगिता लाभ यांच्यातील तुलनेद्वारे आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मोजमाप होवू शकते. वास्तव खर्च व्यापार शर्तीची संकल्पना ही कल्याणकारी संकल्पना आहे. निर्यातीसाठी वापरल्या जाणाऱ्या प्रति युनिट उत्पादन संसाधनांच्या वापराच्या प्रमाणात एक घटक व्यापार शर्तीचा गुणाकार केल्यास वास्तव घटक व्यापार शर्ती असे म्हणतात. समीकरणाद्वारे वास्तव खर्च व्यापार शर्ती पुढील प्रमाणे :-

$$Tr = \frac{P_X}{P_M} \cdot F_X \cdot R_X$$

येथे Tr = वास्तव खर्च व्यापार शर्ती, $\frac{P_X}{P_M}$ = वस्तुगत व्यापार शर्ती, $F_X$ = निर्यात उद्योगांचा उत्पादकता कार्यक्षमता निर्देशांक तर निर्यात क्षेत्रात वापरल्या जाणाऱ्या प्रति युनिट उत्पादक संसाधनाच्या उपयोगिताचा निर्देशांक आहे. परंतु या संकल्पनेत आयातीच्या उत्पादनात समावेश असणारा वास्तव खर्च विचारात घेतला जात नाही. हा या संकल्पनेत महत्त्वाचा दोष आहे.

## ७. उपयोगिता व्यापार शर्ती (Concept of Utility Terms of Trade) :-

जॅकब विनर यांनी वरील संकल्पनेतील दोष दूर करण्यासाठी उपयोगिता व्यापार शर्तीची संकल्पना मांडली. वास्तव खर्च व्यापार शर्तीला आयातीच्या उपयोगिता निर्देशांकाद्वारे गुणले असता उपयोगिता व्यापार शर्ती मिळतात. याची तुलना निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूच्या उत्पादनासाठी वापरलेल्या साधनसामग्रीशी केली जाते. या व्यापार शर्ती गणितीय सूत्राने पुढीलप्रमाणे मांडली जाते.

$$Tu = \frac{P_X}{P_M} \cdot F_X \cdot R_X \cdot U_M$$

येथे Tu = उपयोगिता व्यापार शर्ती,

$\frac{P_X}{P_M}$ = वस्तुगत व्यापार शर्ती,

$F_X$ = निर्यात उद्योगांतील उत्पादकता कार्यक्षमता निर्देशांक.

$R_X$ = निर्यात क्षेत्रातील प्रत्येक युनिट उत्पादक परिमाणासाठी वापरल्या जाणाऱ्या निरूपयोगीता अउपयोगितेचा (disutility) निर्देशांक.

$U_M$ = आयातयोग्य संसाधनाचा निर्देशांक जो वस्तूंच्या तुलनेत घरगुती वापरासाठी उत्पादित केली जाऊ शकते. जी सध्या उत्पादनाच्या संसाधनामध्ये वापरली जात आहे.

परंतु ही संकल्पनाही वास्तव जीवनात सत्य नाही. उपयोगिता आणि निरूपयोगिता या व्यापार शर्ती मापनासाठी सक्षम नाहीत.

व्यापार शर्ती विविध संकल्पना संक्षिप्त रूपाने मेयरच्या मते, व्यापार शर्तींच्या विविध संकल्पना पुढील प्रमाणे आहेत.

(A) वस्तूंमधील विनिमयाच्या दरानुसार,

- (i) निव्वळ वस्तूविनिमय व्यापार शर्ती.
- (ii) स्थूल वस्तूविनिमय व्यापार शर्ती.

(B) उत्पादन घटकांमधील विनिमयानुसार,

- (i) एक घटक व्यापार शर्ती.
- (ii) द्विघटक व्यापार शर्ती.

(C) उपयोगिता स्वरूपात आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभानुसार,

- (i) वास्तव खर्च व्यापार शर्ती.
- (ii) उपयोगिता व्यापार शर्ती.

## ❑ व्यापार शर्तीवर प्रभाव टाकणारे घटक (Factors affecting Terms of Trade) :-

देशाच्या व्यापार शर्ती अनेक घटकाद्वारे प्रभावित होतात ते घटक पुढीलप्रमाणे :-

### १. अन्योन्य मागणी (Reciprocal Demand) :-

एखाद्या देशाच्या व्यापारशर्ती अन्योन्य किंवा पारस्परिक मागणीवर अवलंबून असतात. इतर

देशांच्या उत्पादनासाठी प्रत्येक देशाच्या मागणीचा मजबूतपणा (Strength) आणि लवचिकता महत्वाची असते. समजा, जर्मनी आणि इंग्लंड हे दोन देश आहेत जे अनुक्रमे लिनेन आणि कापड उत्पादन करतात, जर जर्मनीची इंग्लंडच्या कापडासाठीची मागणी अलवचिक असेल तर कपड्यांच्या किंमती लिनेनच्या किंमतीपेक्षा अधिक वाढतील. त्यामुळे वस्तुगत व्यापारशर्ती जर्मनीच्या विरोधी बदलतील तर इंग्लंडच्या बाजूने राहतील. दुसऱ्या बाजूला जर्मनीच्या लिनेनसाठी इंग्लंडची मागणी अलवचिक (तीव्र) असेल तर कापडाच्या किंमतीपेक्षा लिनेनच्या किंमती अधिक वाढतील. वस्तूगत व्यापारशर्ती जर्मनीला अनुकूल राहतील तर इंग्लंडच्या विरोधी असतील.

## २. घटक देणगी बदल (Changes in Factor Endowments) :-

देशातील उत्पादन घटकांच्या वापरातील बदल हा त्यांच्या व्यापार शर्तीवर परिणाम करतात. घटकांच्या अंमलबजावणीतील बदल निर्यात वाढवू किंवा कमी करू शकतात. अभिरूची किंवा चव मध्ये बदल न झाल्यास त्यामुळे व्यापार शर्तीत बदल होतात. वरील उदाहरणामध्ये इंग्लंड जर्मनीबरोबर जुन्या व्यापार शर्तीनुसार व्यापार करू शकणार नाही कारण कापड उत्पादनासाठी लागणारे घटक अधिक उपलब्ध नसतील आणि अभिरूचीत बदल झालेला नसेल.

## ३. तंत्रज्ञानात बदल (Changes in Technology) :-

तांत्रिक बदल देशाच्या व्यापार शर्तीवर प्रभाव पाडतात. तंत्रज्ञानातील बदलामुळे उत्पादनात वृद्धी होते व उत्पादन खर्चातील घटीमुळे व्यापार शर्तीत सुधारणा घडून येते. त्याचा परिणाम म्हणून इतर देशातून आयात केलेल्या वस्तूच्या बदल्यात देशाला कमी निर्यात वस्तू द्याव्या लागतील. व्यापार शर्तीत सुधारणा होईल.

## ४. अभिरूचीतील बदल (Changes in Tastes) :-

देशातील लोकांच्या अभिरूचीमध्ये बदल झाल्यास इतर देशांच्या व्यापार शर्तीवर प्रभाव पडतो. अभिरूचीतील बदलामुळे मागणीत बदल होतो. आयातीसाठीच्या मागणीत घट झाल्यास देशाच्या व्यापार शर्ती बिघडतात. याउलट जर निर्यातीसाठीच्या मागणीत घट झाली तरीही व्यापारशर्ती बिघडतात. समजा इंग्लंडची अभिरूची जर्मनीच्या लिनेन वरून स्वत:च्या कापडावर स्थलांतरित होते. त्यावेळी इंग्लंडच्या व्यापार शर्तीत सुधारणा होते. याविरोधी इंग्लंडची जर्मनीच्या लिनेनची अभिरूची बदलली तर त्याच्या मागणीत वाढ होईल आणि त्याचा परिणाम म्हणून इंग्लंडच्या व्यापार शर्ती बिघडतील. अशा परिस्थितीत इंग्लंड, जर्मनीला कपड्यांची निर्यात कमी करेल आणि त्यांची जर्मनीच्या लिनेनसाठीची मागणीसुध्दा घटेल. अशाप्रकारे इंग्लंडच्या व्यापार शर्ती सुधारतील.

## ५. आर्थिक वृध्दी (Economic Growth) :-

आर्थिक वृध्दी हा एक महत्त्वाचा घटक आहे, ज्यामुळे व्यापार शर्तीवर परिणाम होतो. विशिष्ठ कालावधीत देशाच्या उत्पादनात किंवा उत्पन्नात वाढ होणे यास आर्थिक वृध्दी म्हणतात. देशाच्या अभिरूची आणि तंत्रज्ञान स्थिर असल्यास देशाच्या आणि उत्पादन क्षमतेत वाढ झाल्यास व्यापार शर्तीवर अनुकूल किंवा प्रतिकूल प्रभाव पडतो. आर्थिक वृध्दीमुळे देशाच्या उत्पादन क्षमतेत वाढ होते.

## ६. आयात मालावरील जकात (Tariff) :-

आयात जकात लादणाऱ्या देशाच्या व्यापार शर्तीत सुधारणा होते. परंतु जकातीचा परिणाम हा आकारणीची पध्दती आणि प्रस्ताव वक्राची (Offer Curve) लवचिकता यावर अवलंबून असतो. जकातीमुळे वाढणारे उत्पन्न सरकार बाळगू शकते किंवा पुनर्वितरीत करू शकते. मागणीच्या लवचिकतेनुसार परवानगी असलेल्या आयातीची मागणी वाढेल. तसेच सीमांत उपयोग प्रवृत्तीही वाढेल. त्यामुळे व्यापार शर्तीतील सुधारणा किंवा बिघाड या दोन घटकांवर अवलंबून असतात. व्यापक प्रमाणात आयात मालावरील जकाती व्यापार शर्तीत सुधारणा घडवितात, कारण यामुळे देशाच्या आयात मागणीत घट होते. यामुळे दिलेल्या निर्यात मात्रेत आयातीच्या अधिक मात्रा प्राप्त करता येतील.

## ७. अवमूल्यन (Devaluation) :-

अवमूल्यन म्हणजे विदेशी चलनाच्या तुलनेत देशांतर्गत चलनाचे मूल्य कमी करणे. अवमूल्यनामुळे आयात किंमतीच्या तुलनेत निर्यात किंमती कमी झाल्यामुळे, देशांतर्गत चलनाचे अवमूल्यन झाल्यानंतर व्यापार शर्ती आणखी बिघडतात. प्रत्यक्षात अर्थतज्ञांच्यामध्ये अवमूल्यनाचे व्यापार शर्तीवर होणाऱ्या परिणामांबद्दल विवाद आहेत. एफ. डी. ग्रॅहम आणि इतर अनेक शास्त्रज्ञांनी असे मत मांडले आहे की, अवमूल्यन व्यापार अटीना अबाधित ठेवेल. कारण देशाचे आंतरराष्ट्रीय किंमतीवर फार अल्प नियंत्रण असते. याउलट जॉन रॉबिन्सेनसह नवसनातनवादी व सिध्दांतकार यांच्यामते, बरेच देश काही वस्तूच्या निर्यातीबाबत विशेषीकृत असतात. त्याची विदेशी मागणी अलवचिक असते. त्याचवेळी त्यांनी अशा वस्तूंची आयात केलेली असते. त्याचा पुरवठा तुलनेने लवचिक असतो. परिणामी, अवमूल्यन व्यापार शर्तीत बिघाड निर्माण करते.

विकसनशील देशाच्या बाबतीत हे विशेषत: सत्य आहे. तथापि, देशाला क्रेताधिकार (Monopson) शक्ती मिळत असेल तर विविध वस्तूंच्या निर्यातीबरोबर आयात वस्तूमध्ये विशेषीकृत वस्तूंचा वापर करतील. अवमूल्यन आणि व्यापार शर्तीनंतरही कमी किंमतीत आयात करण्याची शक्यता आहे, यामुळे परिणामी व्यापार शर्तीत सुधारणा होईल. निर्यात किंमती घटल्या आणि आयात किंमती वाढल्यास अवमूल्यन यशस्वी व प्रभावी होवू शकते. याचा अर्थ असा आहे की, यशस्वी अवमूल्यन वस्तूगत व्यापार

शर्तींना प्रतिकूल बनविण्याची शक्यता असते. व्यापारातील स्थूल व्यापार शर्ती देखील यशस्वी अवमूल्यन झाल्यास प्रतिकूल शिल्लकीचा होता. वास्तवात व्यापार शर्ती प्रतिकूल बनतील किंवा अनुकूल बनतील हे अवमूल्यन करणाऱ्या देशाच्या आयात आणि निर्यातीच्या मागणी पुरवठ्याच्या लवचिकतेने निर्धारित होते.

निर्यात आणि आयातीच्या मागणीची लवचिकतेपेक्षा निर्यात आणि आयातीच्या पुरवठ्याच्या लवचिकता अधिक असल्यास मागणी लवचिकता सहकार्यक्षमताचे उत्पादन हे पुरवठा लवचिकता सहकार्य क्षमतेअधिक राहते. ($Dx \cdot DM < SX \cdot SM$) अशावेळी अवमूल्यनानंतर व्यापार शर्तींमध्ये घट होईल. येथे Dx आणि DM हे अनुक्रमे निर्यात आणि आयातीच्या मागणीचे लवचिकता सहगुणक (Co-efficients) आहेत. SX आणि SM हे अनुक्रमे निर्यात आणि आयातीच्या पुरवठ्याचे लवचिकता सहगुणक आहेत.

## ८. व्यवहारतोल स्थिती (Balance of Payments Position) :-

जर देशाला व्यापाराच्या आणि व्यवहाराच्या समतोलाने तूट कमी झाली असेल तर आयात मर्यादित करण्यासाठी अंतर्गत किंमत घट, अवमूल्यन आयात आणि विनिमय नियंत्रण सारख्या निर्यात वाढविण्याच्या उपायांचा अवलंब करावा लागतो. व्यापाराच्या अटी आणखी खराब होतील. याउलट विनिमय प्रशंसा आणि किंमत घट धोरणाद्वारे व्यापार आणि व्यवहार वाढण्याचा निपटारा केला जाऊ शकतो. परिणामी व्यापार शर्ती सुधारल्या जाऊ शकतात.

## ९. आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह :-

परदेशातून भांडवलाचा वाढलेला प्रवाह म्हणजे कर्जदार देशाच्या उत्पादनांची मोठी मागणी आणि आयात केलेल्या वस्तूंच्या किंमतीमध्ये वाढ. निर्यातीच्या किंमतींच्या तुलनेत आयातीच्या किंमतीमध्ये वाढ केल्यामुळे व्यापाराच्या निव्वळ नफ्यात घट होते. कर्ज घेणारे देश जेव्हा कर्जाची परतफेड करतात तेव्हा भांडवल देशाबाहेर जाते.

विदेशी कर्जाची परतफेड करण्यासाठी आवश्यक परकीय चलन धारण करण्यासाठी, कमी किंमतीत घरगुती उत्पादनाची विक्री करावी लागते. आयात किंमतीच्या तुलनेत निर्यातीतील किंमती कमी झाल्यामुळे पुन्हा निव्वळ वस्तूगत व्यापार शर्तीत बिघाड होतो.

## १०. आयात पर्याय (Import Substitutes) :-

जर देशांतर्गत आयात वस्तूंच्या जवळील घट्ट पर्याय पुरेसे असतील तर परदेशी उत्पादनाच्या परस्परसंमतीची किंवा अन्योन्य (Reciprocal) मागणी कमकुवत होईल आणि व्यापार शर्ती देशासाठी

अनुकूल बनण्याची शक्यता असते. याउलट, जर देशात आयात वस्तूंचे जवळचे पर्याय उपलब्ध नसतील तर परदेशी उत्पादनाची अन्योन्य मागणी ही तुलनेने जास्त असू शकते. परिणामी, व्यापारशर्ती देशासाठी कदाचित प्रतिकूल असू शकतात. किंमती हालचाली, व्यापार चक्रे, हस्तांतरण समस्या आणि राजकीय परिस्थिती यासारख्या इतर बाबींचा काही किरकोळ प्रभाव व्यापार शर्तीवर होतो.

### ११. व्यापार चक्रांचा प्रभाव :-

देश निर्यात करतो त्या विदेशी राष्ट्रामध्ये भाववाढ जास्त असते तो विदेश जास्त आयात करतो. वस्तूंकरिता विदेशी मागणी वाढल्यामुळे व्यापार शर्ती या स्वदेशाला अनुकूल होतील. याउलट विदेशात मंदी असेल तर स्वदेशी वस्तूंकरिता तेथे मागणी कमी राहील व निर्यात करणाऱ्या स्वदेशाला व्यापार शर्ती प्रतिकूल होतील.

### १२. एकपक्षीय स्थानांतरणे (Unilateral Transfers) :-

जागतिक व्यापारात सहभागी होणाऱ्या देशांकडून होणाऱ्या एकपक्षीय हस्तांतरणाचा प्रभाव व्यापार शर्तीवर पडत असतो. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांच्यामते, अर्थव्यवस्थेत नेहमी पूर्ण रोजगार असल्यामुळे एक पक्षीय स्थानांतरणाचा त्या देशाच्या व्यापार शर्तीवर प्रतिकूल परिणाम होतो. परंतु अर्थव्यवस्थेत अपूर्ण रोजगार असेल तर रोजगारात वाढ करून एकपक्षीय हस्तांतरण करता येते. त्यामुळे एकपक्षीय हस्तांतरणाचा व्यापार शर्तीवर अनुकूल प्रभाव पडू शकतो.

### १३. राजकीय प्रभाव :-

आंतरराष्ट्रीय व्यापारात सहभागी होणाऱ्या राष्ट्रांमध्ये मैत्रीचे, सौहार्दपूर्ण व सहकार्याचे संबंध असतील, त्यांच्यातील व्यापार शर्ती अनुकूल राहतील, जर देशांचे आपापसातील संबंध तणावाचे व संघर्षमय असतील तर व्यापारात अडथळे निर्माण होवून व्यापार शर्ती प्रतिकूल राहतात.

## ❑ व्यापार शर्तीचा उपयोग/वापर (Uses of Terms of Trade) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे लाभ मोजण्यासाठी व्यापार शर्तीचा उपयोग होतो. देशाच्या आर्थिक विकासातील आंतरराष्ट्रीय व्यापाराचे योगदान व्यापार शर्तीमुळे समजते. व्यापार शर्ती एखाद्या देशाच्या बाजूने असतील तर त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारातून मिळणारे लाभ वाढतील आणि त्यामुळे उत्पन्नाची पातळी वाढते. हे अशा देशामध्ये उलट असेल जेथे व्यापारशर्ती प्रतिकूल राहतात. एखाद्या देशात कृषी क्रांती झाली असेल तर आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे कृषी वस्तूंना बाजारपेठ मिळते. याचा परिणाम म्हणजे देशी वस्तूंना यापुढे मागणी येणार नाही किंवा त्यांची मागणी मोठ्या प्रमाणावर कमी होईल. उत्पादकांना त्रास होईल आणि त्यांचे उत्पन्न कमी होईल.

देशाच्या व्यापारातील बदलामुळे त्यांच्या व्यवहारतोलावर आणि आर्थिक वृध्दीवर महत्त्वपूर्ण प्रभाव असू शकतात.

### ❑ व्यापार शर्तीच्या मर्यादा (Limitations of Terms of Trade) :-

व्यापार शर्तीचा वापर सामाजिक कल्याण किंवा पॅरेटो आर्थिक कल्याणाला, समानार्थी म्हणून केला जाऊ नये, व्यापार शर्तीच्या मोजणीवरून आपणांस देशाच्या निर्यातीद्वारे आकारमान समजत नाही, फक्त दोन देशातील तुलनात्मक बदल आपणांस दिसून येतात. देशाच्या सामाजिक उपयोगितेत कसा बदल हातो हे समजून घेण्यासाठी, व्यापाराच्या प्रमाणातील बदल, उत्पादन क्षमतेतील बदल आणि संसाधनाच्या वितरणातील बदल आणि भांडवली प्रवाहातील बदल विचारात घेणे आवश्यक आहे. देशाच्या निर्यातीची किंमत त्याच्या चलनाच्या मूल्यावर मोठा प्रभाव टाकू शकते. ज्यामुळे त्या देशाच्या व्याजदराने मोठ्या प्रमाणावर प्रभावित होवू शकते. जर एखाद्या विशिष्ठ देशाच्या चलनाची किंमत वाढीच्या व्याजदराने वाढली तर व्यापार शर्ती सुधारण्याची अपेक्षा करता येते. तथापि, अन्य देशाद्वारे मिळालेल्या निर्यातीच्या किंमतीमध्ये वाढ झाल्यामुळे देशासाठी निरंतर सुधारित मानक असणे आवश्यक नाही, परिणामी निर्यात कमी होईल. याचा परिणाम म्हणून देशांतर्गत निर्यातदार उच्च किंमतीचा आनंद घेत असले तरीही आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत त्यांची वस्तू पिकण्यासाठी झगडत आहेत. जगात २०० पेक्षा जास्त राष्ट्रांमध्ये शेकडो, लाखो उत्पादने व्यापारात समाविष्ठ आहेत, त्यामुळे व्यापाराच्या निकषाचे नियम अतिशय जटिल होऊ शकतात. अशा प्रकारे त्रुटींची शक्यता अधिक राहते.

## २.२.४ अन्योन्य मागणीचा सिद्धांत (Theory of Reciprocal Demand) व्यापार शर्तीचे निधर्मी बिघाड गृहितक (Hypothesis of Secular deterioration of Terms of Trade)

### ❑ अन्योन्य मागणीचा सिद्धांत (Theory of Reciprocal Demand) :-

दोन्ही देशांमधील आंतरराष्ट्रीय विनिमय दर निश्चितपणे निर्धारित करण्याचे रिकार्डोवादी विचार अयशस्वी झाले. पुरवठ्याच्या बाजूवर भर देवून मागणीकडे पूर्णतः दुर्लक्ष केले आहे. जे. एस. मिल यांनी रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च सिध्दांतामधील उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

त्यांच्या मते, दोन देशांमध्ये वस्तूंचे व्यवहार किती प्रमाणात केले जातात ते इतर देशाच्या मागणीच्या मजबूतीवर आणि लवचिकतेवर निर्णायकपणे अवलंबून असते. अन्योन्य मागणीनुसार, मिलच्या मते, विविध आयातीच्या मात्रांच्या बदल्यात एखादा देश विविध निर्यातीच्या मात्रा विविध व्यापार शर्तीला किती प्रमाणात प्रस्ताव ठेवतो. दुसऱ्या शब्दात, अन्योन्य मागणी म्हणजे एखाद्या देशात दुसऱ्या देशाच्या उत्पादनाची मागणीची तीव्रता होय.

ब्रिटीश अर्थशास्त्रज्ञ जॉन स्टुअर्ट मिल यांनी सर्वप्रथम डेव्हिड रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च सिध्दांताचा पुनर्विचार आपल्या _Some Unsettled Questions_ या ग्रथांत केला आहे. वस्तूची मागणी आणि पुरवठ्याचय आधारे त्यांनी रिकार्डोच्या तुलनात्मक खर्च सिध्दांताचा स्पष्टपणे विस्तार करून अन्योन्य मागणीचा सिध्दांत मांडला.

## ❑ सिध्दांताची मांडणी :-

जे. एस. मिल यांनी व्यवसायाच्या समतोल अटींचे वास्तविक निर्धारण स्पष्ट करण्यासाठी अन्योन्य मागणी किंवा आंतरराष्ट्रीय मूल्याचा नियम स्पष्ट केला. त्यांच्यामते, अन्योन्य मागणीच्या समिकरणाने समतोल व्यापार शर्ती निर्धारित होतात. अन्योन्य मागणी म्हणजे दोन देशांमध्ये व्यापाराच्या दृष्टीने एकमेकांच्या उत्पादनासाठी असणारी सापेक्ष मजबूत आणि लवचिक मागणी होय. जेथे प्रत्येक देशाची आयात आणि निर्यात मूल्य समतोल असेल त्या पातळीला विनिमयाचे स्थिर प्रमाण किंवा गुणोत्तर निर्धारित होते. मिलच्या स्वत:च्या शब्दात, 'वस्तूंचे व्यापार किती वास्तविक प्रमाणात केले जाईल ते इतर देशाच्या उत्पादनाची मजबूती व मागणीची लवचिकता यावर अवलंबून असते. प्रत्येक देशाच्या निर्यातीचे मूल्य त्याच्या आयातीसाठी देणे द्यायला पुरेसे असते त्यावेळी गुणोत्तर स्थिर राहिल.

## ❑ सिध्दांताची गृहीतके :-

जे. एस. मिल यांचा अन्योन्य मागणीचा सिध्दांत खालील गृहीतकांवर आधारित आहे.

१. अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार परिस्थिती असते.

२. बाजारात पूर्ण स्पर्धा अस्तित्वात असते.

३. विनामूल्या विदेशी व्यापाराचे अस्तित्व.

४. उत्पादन घटकाची मुक्त गतिशीलता असते.

५. तुलनात्मक खर्च सिध्दांताची उपयुक्तता आहे.

६. दोन-दोन, दोन वस्तू प्रतिमान गृहितक आहे.

७. स्थिर उत्पादन फलानुसार उत्पादन होते.

८. मागणीचे स्वरूप दोन देशांमध्ये सारखेच आहे.

९. वाहतूक खर्च अस्तित्वात नाही.

१०. प्रत्येक देशाची निर्यात तिच्या आयातीसाठी पुरेशी आहे.

वरील गृहीतकांच्या आधारावर जे. एस. मिल यांचा अन्योन्य मागणी सिध्दांत पुढील उदाहरणाद्वारे स्पष्ट करता येईल.

**तक्ता क्र. ३.१**

| देश | श्रमव्यय दिवसात | उत्पादन दोन वस्तूंचे | व्यापारापूर्वीचे उत्पादन खर्च प्रमाण |
|---|---|---|---|
| इंग्लंड | १० दिवसाचे श्रम | १० वार लोकरी कापड<br>किंवा<br>१५ वार ताग कापड | लोकर : ताग<br>(१० : १५)<br>१ : १५ |
| जर्मनी | १० दिवसाचे श्रम | १० वार लोकरी कापड<br>किंवा<br>२० वार ताग कापड | लोकर : ताग<br>१० : २०<br>१ : २ |

वरील तक्त्यामध्ये वस्तूंच्या उत्पादनासाठी लोकर व ताग उत्पादन खर्चाचे गुणोत्तर अनुक्रमे इंग्लंड व जर्मनीसाठी १ : १.५ आणि १ : २ असे आहे. या दोन गुणोत्तराच्या दरम्यान गुणोत्तर कशी व कुठे निर्धारित होईल. यासाठी मिल च्या मते, 'कोणत्याही देशाची त्याच्या स्वत:च्या वस्तूच्या बदल्यात दुसऱ्या देशातील वस्तूची मागणी काय आहे' या आधारावर हे गुणोत्तर निर्धारित होते. यास मिलने 'अन्योन्य मागणी' म्हटले आहे. दुसऱ्या शब्दात दोन देशांमधील विनिमय दराचे निर्धारण हे कोणत्याही देशाच्या निर्यात मालाचे परिमाण त्याने आयात केलेल्या मालाचे मूल्य देण्यास पुरेसे होईल अशाप्रकारे होते.

## ❑ मागणी आणि पुरवठा अटींमध्ये बदल :-

मिल यांचा अन्योन्य मागणीचा सिध्दांत हा एक सर्व परिचित सत्य आहे. हे एक शक्ती आणि त्याची कार्यपध्दती दर्शविते जे आंतरराष्ट्रीय समतोल निर्माण करते. मिलने व्यापाराच्या अटींवर पुरवठा आणि मागणीच्या परिस्थितीतील बदलांच्या परिणामाचे विश्लेषण केले आहे.

### ☼ पुरवठा अटींमध्ये बदल :-

तंत्रज्ञानासाठीचा खर्च कमी होवून पुरवठ्यात बदल होतो, त्यामुळे व्यापार शर्तीत बदल घडून येतो. इंग्लंडच्या कापड (लोकर) उद्योगातील सुधारणा त्या उद्योगातील उत्पादन क्षमता वाढविते. जर्मनीतील ताग कापड लोकरी कपड्यांना स्वस्त करते आणि अशा प्रकारे जर्मनीच्या बाजूने व्यापाराच्या अटी अनुकूल बनविते.

## ☼ मागणी परिस्थितीत बदल :-

वस्तूगत व्यापार शर्तीतील बदल हे फक्त निर्यात करणाऱ्या देशातील उत्पादन वाढीवर अवलंबून नसून आयात करणाऱ्या देशाच्या निर्यातीच्या तुलनेत आयात वस्तूच्या मागणीच्या लवचिकतेवर अवलंबून असते.

(i) जर जर्मनीच्या ताग कापडाच्या दृष्टीने इंग्लंडच्या लोकरी कापडाच्या मागणीची लवचिकता अधिक असेल तर ताग कापडाच्या संदर्भात लोकरी कापड किंमतीच्या कमी घटल्यामुळे वस्तुगत व्यापार शर्ती जर्मनीला अनुकूल राहतील.

(ii) जर ताग कापडाच्या संदर्भात जर्मनीची लोकर कापड मागणी एकक लवचिक असेल तर वस्तूगत व्यापार शर्ती जर्मनीच्या बाजूने अनुकूल असलीत कारण ताग कापडाच्या तुलनेत लोकरी कापडाच्या किंमती समान घटली आहे.

(iii) जर ताग कापडाच्या संदर्भात लोकरी कापडाची जर्मनीची मागणी कमी लवचिक असेल तर वस्तुगत व्यापार शर्ती जर्मनीच्या बाजूने बदलतील कारण ताग कापडाच्या तुलनेत लोकरी कापडातील घट कमी असते.

## ❑ मिलच्या अन्योय मागणी सिध्दांतावर टीका :-

जे. एस. मिल यांच्या अन्योन्य मागणीच्या सिध्दांतावर खालील कारणामुळे टीका करण्यात आली आहे.

१) सिध्दांत पूर्ण स्पर्धा आणि पूर्ण रोजगार यासारख्या अवास्तव घटकावर आधारित आहे.

२) हा सिद्धांत दोन देश दोन वस्तू या प्रतिमानावर आधारित आहे, परंतु प्रत्यक्षात व्यापार हा दोन देश व दोन वस्तू यावर मर्यादित नसतो.

३) मिल यांनी मागणीच्या लवचिकतेवर लक्ष केंद्रित केले आहे आणि अशा प्रकारे पुरवठ्याच्या लवचिकतेकडे दुर्लक्ष केले आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्यामते, व्यापार अटी सामान्यत: (अ) निर्यातीची मागणीची लवचिकता, (ब) आयात मागणीची लवचिकता, (क) पुरवठा निर्यातीची लवचिकता, (ड) पुरवठा आयातीची लवचिकता.

४) ग्रॅहम यांनी मिलच्या सिध्दांतावरील अन्योन्य मागणीच्या पैलूवर टीका केली आहे. व्यापाराच्या अटी निर्धारित करण्याच्या तुलनेत किंमतीच्या परिस्थितीशी जुळवून घेण्याने अन्योन्य मागणीची भूमिका वाढविली आहे.

५) जेकब विनर यांच्या मते, मिल यांचा अन्योन्य मागणीचा सिध्दांत अपूर्ण आणि अपर्याप्त किंवा अपुरा आहे.

६) शॅडवेल यांनी या सिध्दांतावर टीका केली आहे. त्यांच्या मते, सिध्दांतामध्ये विनिमयाचे प्रमाण निश्चित केले गेले आहे, जेथे आयात आणि निर्यात मूल्य केवळ त्रुटी म्हणून समतोलात आहे. हा सिध्दांत व्यापार अटीच्या निर्धारणावर कोणताही प्रकाश टाकत नाही.

तथापि, बस्टेबल मिलच्या सिद्धांतावर झालेल्या टिकांशी सहमत नाहीत, कारण या सिध्दांताने केवळ समतोलपणाचा उल्लेख केला नाही तर समतोल आणण्यासाठी कार्य करणाऱ्या शक्तींवर चर्चा देखील केली आहे.

## ❑ व्यापार शर्तीचे निधर्मी बिघाड गृहितक (Hypothesis of Secular deterioration of Terms of Trade)

मागासलेल्या देशाच्या व्यापाराच्या अटींमध्ये निधर्मी बिघाड केल्यामुळे कमी किंमतीत प्राथमिक उत्पादनाची निर्यात असली तरी विकसनशील देशांतील तांत्रिक प्रगतीचा फायदा प्रगत देशांमधील ग्राहकांना देण्यात आला आहे.

अर्थशास्त्रात प्रेबिश्च-सिंगर परिकल्पना किंवा यालाच प्रेबिश्च-सिंगर प्रबंध म्हणतात त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, दिर्घकालावधीत प्राथमिक वस्तूची किंमत उत्पादक किंवा औद्योगिक वस्तूंच्या किंमतीच्या तुलनेत घटते, ज्यामुळे प्राथमिक उत्पादन आधारित बचतीमुळे व्यापारशर्ती बिघडतात. सन २०१३ च्या अलीकडील संख्याशास्त्रीय अभ्यासाने या कल्पनेला समर्थन किंवा दुजोरा दिला आहे. १९४० च्या दशकाच्या उत्तरार्धात राउल प्रेबिश्च आणि हान्स सिंगर यांनी ही कल्पना विकसित केली. तेव्हापासून ते अवलंबित्व सिध्दांताचे प्रमुख स्तंभ आणि आयात प्रतिस्थापन औद्योगिकीकरण यासारख्या धोरणासारखे कार्य करते.

## ❑ सिध्दाताचे/परिकल्पनेचे स्पष्टीकरण :-

या अपेक्षित घटनेसाठी एक सामान्य स्पष्टीकरण आहे की, उत्पादित वस्तूंमध्ये प्राथमिक उत्पादनापेक्षा विशेषत: खाद्यान्नापेक्षा उत्पादित वस्तूंची उत्पन्न मागणी लवचिकता जास्त असते. म्हणून उत्पन्न वाढल्यास उत्पादित वस्तूंची मागणी प्राथमिक उत्पादनाच्या मागणीपेक्षा अधिक वेगाने वाढते.

याचबरोबर प्राथमिक उत्पादनाच्या मागणीची किंमत लवचिकता कमी असते. त्याच्या किंमतीतील घटीमुळे महसूलात वाढ होण्याऐवजी घट घडून येते.

या सिध्दांताचा अर्थ असाआहे की, जागतिक पेठांची संरचना जागतिक व्यवस्थेतील सततच्या असमानतेला जबाबदार आहे. हे आंतरराष्ट्रीय क्रमाने (Order) वालरस्टाईनच्या नवमार्क्सवादी स्पष्टीकरणावर एक मनोरंजक वळण प्रदान करते जे महत्त्वाचे (Core) आणि परिधीय (Periphery) दरम्यान

ऊर्जासंबंधातील त्रुटींमध्ये आर्थिक आणि राजकीय असमानतेचे मुख्य कारण आहे. परिणामी १९६० आणि १९७० च्या दशकात नवमार्क्सवादी विकासवादी अर्थशास्त्रज्ञांबरोबर या संकल्पनेने उच च दर्जाची लोकप्रियता प्राप्त केली आणि विकासाकरिता साधन म्हणून वस्तू वायद्याचे सौदे विनिमयाची भूमिका वाढविण्याची औचित्य प्रदान केली.

सिंगर आणि प्रेबिश्च यांनी दीर्घकालीन ऐतिहासिक आकडेवारीमध्ये सापेक्ष किंमतीवरील समान सांख्यिकीय नमुना पाहिला परंतु असा नियमितपणा अनेक भिन्न स्पष्टीकरण आणि धोरणात्मक स्थितीशी सुसंगत आहे. नंतरच्या कारकिर्दीत प्रेबिश्चने असा युक्तिवाद केला की, प्राथमिक उत्पादकांच्या व्यापारातील कमी होणाऱ्या अटींमुळे, विकसनशील देशांनी त्यांच्या अर्थव्यवस्थेमध्ये विविधता वाढविण्याचा आणि उत्पादनाच्या विकासाद्वारे प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीवर अवलंबून राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

गेल्या ३० वर्षात या संकल्पनेतील काही महत्त्व कमी झाले आहे, कारण सध्या उत्पादनांच्या निर्यातीमुळे आफ्रिकेबरोबर बहुतेक विकसनशील देशांमध्ये प्राथमिक वस्तूंच्या निर्यातीला मागे टाकले आहे. या कारणास्तव, अलीकडील संशोधन प्राथमिक उत्पादने आणि उत्पादित वस्तूंच्या सापेक्ष किंमतीवर आणि विकसनशील देशांद्वारे उत्पादित साधने उत्पादनाच्या किंमती आणि प्रगत अर्थव्यवस्थेद्वारे उत्पादित जटिल उत्पादनांच्या किंमतीवर अधिक लक्ष केंद्रित करते.

सन १९९८ मध्ये सिंगर यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी जे पहिले संशोधन (Pioneered) केले होते ते मुख्य प्रवाहात समाविष्ठ झाले आहे.

## ❑ टीका (Criticisms) :-

प्रेबिश्च-सिंगर यांच्या व्यापार शर्तीचे निधर्मी बिघाड गृहितकावर पुढीलप्रमाणे टीका केली जाते. सन २००० च्या दशकातील वस्तूंच्या तेजी दरम्यान बहुतेक विकसनशील देशांच्या व्यापारातील अटी सुधारल्या. तर पूर्वेकडील आशिया (जे मुख्यत: उत्पादित वस्तू निर्यात करते) व्यापार बिघडलेल्या व्यापाराच्या दृष्टीने दिसतात, त्यामुळे प्रेबिश्च-सिंगरचे गृहितक लागू पडत नाही.

टीकाकारांच्या मते, उत्पादित वस्तूंच्या किंमतींची वेळोवेळी तुलना करणे शक्य नाही, कारण त्या वेगाने बदलतात. प्रेबिश्च-सिंगरचा किंमत संबंध तांत्रिक बदलाकडे लक्ष देत नाही. महत्त्वाची बाब म्हणजे वस्तूंची किंमत नव्हे तर वस्तूंद्वारे प्रदान केलेली सेवा महत्त्वपूर्ण असते. उदा. सन १८०० मध्ये अमेरिकन कर्मचारी मेणबत्ती खरेदी करू शकला होता. ज्यामुळे सहा तास काम करण्यासाठी १ तासाचा प्रकाश दिला गेला, परंतु सन १९९७ साली अमेरिकेतील कामगार कामाच्या अर्ध्या सेकंदाच्या प्रकाशात एक दिवसाचा प्रकाश खरेदी करू शकला. थोडक्यात उत्तर अमेरिकेने सुधारलेल्या एडिसनचा शोध प्रचंड प्रमाणात किंमती कमी करण्यात यशस्वी झाला.

संगणकाच्या किंमतीतील घसरण इतकी वेगवान आहे की, संगणकाच्या क्षमतेमध्ये प्रचंड वाढ झाल्यामुळे नवीन शब्द शोधणे आवश्यक आहे. प्रथम त्यांना बाईटस्, योटाबाईट्स इत्यादी मोजण्यात आल्या. पन्नास वर्षापूर्वी कापणी यंत्र जेवढी कापणी करत होते, त्याच्या कितीतरी पट प्रतिहेक्टर कापणीचा वेग वाढला आहे. हे उदाहरण दर्शविण्यास पुरेसे आहेत की जर आपण तांत्रिक बदलांद्वारे आयात-निर्यात किंमत संबंध सुधारित केले तर आपण प्रेबिश्च-सिंगरच्या ग्रहितकाविरुध्द निष्कर्ष काढू शकतो.

म्हणूनच असा युक्तिवाद केला जातो की, वस्तू निर्यात करणाऱ्या परिघीय (Peripheral) देशांनी केंद्रीय शक्तीसह व्यापारातून मोठ्या प्रमाणावर व्यापार केला आहे, कारण उत्पादनामध्ये समाविष्ठ केलेली नवनवीन तंत्रज्ञान आणि त्यांची प्रचंड वाढविलेली उत्पादन क्षमता. खरं तर जेव्हा आपण मुक्त व्यापार सुरू करता तेव्हा श्रीमंत आणि गरीब देशांमध्ये प्रति व्यक्ति स्थूल देशांतर्गत उत्पादनामधील (GDP) अंतर कमी करण्याची उदाहरणे सहज शोधू शकतो.

## २.३ सारांश (Summary)

दोन किंवा दोनपेक्षा अधिक देशांमध्ये वस्तू आणि सेवांची होणारी आयात-निर्यात यास आंतरराष्ट्रीय व्यापार असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे विवेचन अनेक अर्थशास्त्रज्ञांनी केले आहे. यामध्ये रिकार्डो, मिल्स, मार्शल, हेक्शर व ओहलिन यांचा समावेश आहे. भूमि, श्रम, भांडवल यासारख्या संसाधनाचा विकास आणि तांत्रिक प्रगतीमुळे देशाच्या उत्पादन संभाव्यतेचे वक्र वरच्या पातळीवर जातात. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे निर्यात वाढून उर्वरित अर्थव्यवस्थेला उत्तेजन मिळते, आर्थिक वृध्दी घडून येते. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की, आजचे विकसनशील देश त्यांच्या वृध्दी आणि विकासासाठी व्यापारावर फारच कमी अवलंबून असतात. हे मागणी आणि पुरवठ्याच्या अल्प अनुकूल स्थितीमुळे निर्माण होते.

प्रा. जी. हॅबेरलर यांच्या मते, आंतरराष्ट्रीय व्यापार आर्थिक विकासावर अनेक बाबतीत प्रभाव पाडू शकतात. संसाधनाचा पूर्ण वापर, श्रम विभाजन आणि विशेषीकरण, ज्ञान हस्तांतरण, भांडवल प्रवाह, स्पर्धेला प्रोत्साहन व देशांतर्गत मागणी वाढविणे इत्यादी घटकांचा यामध्ये समावेश होतो. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभावर प्रभाव पाडणारे घटक म्हणजे खर्च गुणोत्तरात फरक, अन्योन्य किंवा पारस्पारिक मागणी, वास्तव उत्पन्नात वृध्दी, व्यापार शर्ती, उत्पादक कार्यक्षमता, निर्यातीचे स्वरूप, तांत्रिक प्रगती, देशाचा आकार, विक्री कौशल्य, उत्पादन कार्यातील कौशल्य इत्यादी होत. सामान्यत: आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मोजमाप करताना विविध घटकांचा प्रभाव पडतो. यामध्ये वस्तूच्या उत्पादन खर्चात घट, वास्तव उत्पन्नात वाढ, व्यापार शर्ती त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या आकारमानात व रचनेत बदल इत्यादी घटकांचा समावेश होतो.

व्यापार शर्ती म्हणजे आयातीच्या बाबतीत निर्यातीची तुलनात्मक किंमत होय. व्यापार शर्तीचे वस्तूगत व्यापार शर्ती, उत्पन्न व्यापार शर्ती, स्थूल वस्तुविनिमय व्यापारशर्ती, वास्तव खर्च व्यापार शर्ती व उपयोगिता व्यापारशर्ती असे प्रकार पडतात. देशाच्या व्यापारशर्ती अनेक घटकांद्वारे प्रभावित होतात. यामध्ये अन्योन्य मागणी, घटक देणगी बदल, तंत्रज्ञानातील बदल, अभिरूचीतील बदल, आर्थिक वृध्दी, आयात मालावरील जकात, अवमूल्यन, व्यवहारतोल स्थिती आणि आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह इत्यादी घटकांचा समावेश होतो.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. **अवमूल्यन** (Devaluation) : जेव्हा देशातील चलनाचे मूल्य परदेशी चलनाच्या तुलनेत घटते तेव्हा त्यास अवमूल्यन म्हणतात. देशाच्या व्यवहार शेषात जेव्हा असंतुलन निर्माण होते तेव्हा देशाची आयात कमी करून निर्यात वाढविण्यासाठी अवमूल्यनाचा निर्णय घेतला जातो.

२. **मागणीची लवचिकता** : किंमतीत होणाऱ्या बदलामुळे मागणीत जो बदल होतो त्या बदलाच्या प्रमाणास मागणीची लवचिकता म्हणतात.

३. **विदेशी विनिमय** (Foreign Exchange) : एका चलनाच्या मोबदल्यात दुसरे चलन देणे किंवा घेणे म्हणजे विदेशी विनिमय होय.

४. **लाभ** (Gain) : कोणत्याही विनिमयातून जो वास्तविक अथवा पैशाच्या स्वरूपात नफा मिळतो त्यास लाभ म्हणतात.

५. **परिकल्पना** (Hypothesis) : मानवी प्रवृत्तीचा अभ्यास करून जे सिध्दांत मांडलेजातात, त्या सिध्दांताना परिकल्पना म्हणतात. उदा. निरपेक्ष उत्पन्न, परिकल्पना, सापेक्ष उत्पन्न परिकल्पना, स्थायी उत्पन्न परिकल्पना, व्यापार शर्तीचे निधर्मी बिघाड परिकल्पना इत्यादी.

६. **प्रस्ताव वक्र** (Offer Curve) : ही संकल्पना आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्रात उपयोगात आणली जाते. आयातीच्या विशिष्ठ नगासाठी निर्यातीचे जेवढे नग देण्यास देश तयार असतो याचा सहसंबंध दर्शविणाऱ्या वक्रास प्रस्ताव वक्र म्हणतात.

## २.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

❑ **अ) रिकाम्या जागी अचूक उत्तर लिहा.**

१. ............ व्यापारातील लाभ सहज मोजता येतो.

*(अ) केन्स* *(ब) रिकार्डो* *(क) जॉकब विनर* *(ड) जे. एस. मिल.*

२. ............... यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराचा तुलनात्मक खर्च लाभ सिद्धांत मांडला.

*(अ) रिकार्डो (ब) स्मिथ (क) केन्स (ड) मार्शल.*

३. ............... या अन्योन्य मागणीवर अवलंबून असतात.

*(अ) वस्तू (ब) व्यापारशर्ती (क) व्यापार (ड) चलन.*

४. देशाच्या ............. वाढ होणे हा आंतरराष्ट्रीय व्यापाराचा सर्वात मोठा लाभ आहे.

*(अ) दरडोई उत्पन्न (ब) लोकसंख्या (क) वास्तव उत्पन्न (ड) वरील सर्व.*

५. द्विघटक व्यापार शर्तीची मांडणी ................ यांनी केली.

*(अ) केन्स (ब) रिकार्डो (क) जॉकब विनर (ड) जे. एस. मिल.*

❑ **ब) एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

१. व्यापार शर्ती म्हणजे काय?

२. व्यापार शर्तीच्या दोन संकल्पना सांगा?

३. देशाच्या व्यापारशर्तीवर प्रभाव पाडणारे दोन घटक सांगा?

४. अन्योन्य मागणीचा सिद्धांत कोणी मांडला?

५. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणारे दोन लाभ सांगा.

## २.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❑ **अ)** *१. (ब) रिकार्डो.*

*२. (अ) रिकार्डो.*

*३. (ब) व्यापारशर्ती.*

*४. (क) वास्तव उत्पन्न.*

*५. (क) जॉकब विनर.*

❑ **ब)** *१. व्यापारशर्ती म्हणजे आयातीच्या बाबतीत निर्यातीची तुलनात्मक किंमत होय.*

*२. वस्तुगत व्यापारशर्ती, उत्पन्न व्यापारशर्ती.*

*३. अन्योन्य मागणी व तंत्रज्ञानातील बदल.*

*४. अन्योन्य मागणीचा सिद्धांत जे. एस. मिल यांनी मांडला.*

*५. संसाधनाचा पूर्ण वापर व श्रमविभाजन व विशेषीकरण.*

## २.७ सरावासाठी प्रश्न

❑ **अ) टिपा लिहा.**

१. व्यापार आणि आर्थिक वृद्धी.

२. व्यापार शर्तींची संकल्पना.

३. व्यापार शर्तींच्या मर्यादा.

४. व्यापार शर्तींचा वापर.

५. वस्तुगत व्यापार शर्ती.

❑ **ब) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१. आंतरराष्ट्रीय व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे निर्धारक घटक सांगा.

२. व्यापारापासून मिळणाऱ्या लाभाचे मापन आणि वितरण स्पष्ट करा.

३. अन्योन्य मागणीचा सिद्धांत स्पष्ट करा.

४. व्यापार शर्तींचे निधर्मी बिघाड गृहितक स्पष्ट करा.

५. व्यापार शर्ती म्हणजे काय? त्याचे निर्धारक घटक सांगा.

## २.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **Hajela, T. N.** (2009) : *"Money, Banking and International Trade"*, Ane Books Pvt. Ltd., New Delhi.

२. **Bhagwati Jagdish** (Ed.) (1981) : *"International Trade"*, Selected Readings, Cambridge University Press, Massachusetts.

३. **Brahmananda, P. R.** (1982) : *"The IMF Loan and India_s Economic Future"*, Himalaya Publishing House, Bombay.

४. **Dwivedi, D. N.** (2013) : *"International Economics : Theory and Policy"*, Vikas Publishing House.

५. **Bhagwati Jagdish** (2007) : *"In Defense of Globalization"*, Oxford University Press.

६. **Robert C. Feenstra** and **Taylor Alan M.** (2011) : *"Internatinal MacroEconomics"*, Worth Publishers, (Google Book).

७. **Zamre G. N.** (2006) : *"International Trade and Finance (Marathi)"*, Pimpalpure and Company Publishers, Nagpur.

❑❑❑

घटक–३

# व्यापारातील हस्तक्षेपाचे सिध्दांत

## ( Theory of Interventions in Trade )

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ मुक्त व्यापार आणि संरक्षण धोरण – मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन –मुक्त व्यापार धोरणाविरूध्द मुद्दे – सरंक्षण धोरण – संरक्षण धोरणाचे समर्थन – संरक्षण धोरण विरुध्द मांडले जाणारे मुद्दे

३.२.२ व्यापारामधील अडथळे – प्रशूल्क किंवा जकात अडथळे – प्रशूल्क किंवा जकातीचे प्रकार प्रशूल्क किंवा जकातीचे परिणाम – पर्याप्त जकाती – प्रभावी संरक्षण दर

३.२.३ जकातेत्तर अडथळे – कोटा – विदेशी चलन नियंत्रण – मुल्यभेद किंवा डंपिग – राज्यव्यापार – निर्यात अनुदान – वस्तू करार – आंतरराष्ट्रीय कार्टेल

३.२.४ सॅम्यूअल्सन प्रमेय

३.३ सारांश

३.४ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्नाची उत्तरे

३.६ पारिभाषिक शब्द

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.०. उद्दिष्ट्ये

सदर प्रकरणाच्या अभ्यासानंतर आपणाला पुढील बाबींची अधिक कल्पना येण्यास मदत होते.

१. आंतरराष्ट्रीय व्यापारातील मुक्त व्यापार धोरण, त्याचे समर्थन तसेच त्याच्या विरोधी मुद्दे, सरंक्षण धोरण, त्याचे समर्थन तसेच त्याच्या विरोधी मुद्दे यांचे स्पष्टीकरण प्राप्त होण्यास मदत होते.

२. आंतरराष्ट्रीय व्यापारामधील अडथळे, जकात अडथळे, जकातीचे प्रकार, जकातीचे परिणाम, पर्याप्त जकाती, प्रभावी संरक्षण दर या संकल्पना स्पष्ट होण्यास मदत होते.

३. आंतरराष्ट्रीय व्यापारामधील जकातेत्तर अडथळे म्हणजे काय ते स्पष्ट होण्यास मदत हाते. कोटा, विदेशी चलन नियंत्रण, मुल्यभेद किंवा डंपिग, राज्यव्यापार, निर्यात अनुदान, वस्तू करार, आंतरराष्ट्रीय कार्टेल यासारख्या संकल्पना अधिक स्पष्ट होण्यास मदत होते.

४. सॅम्यूअल्सन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे प्रमेय स्पष्ट होते.

## ३.१ प्रास्ताविक

आधुनिक काळखंडात व्यापार हे आर्थिक व्यवहार व विकासाचे प्रभावी माध्यम मानले जाते. विशिष्ट कालखंडामध्ये व्यक्ती आणि संस्थांनी नफाप्राप्तीच्या हेतूने वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे व्यापार होय. व्यापाराचे अंतर्गत व्यापार आणि आंतरराष्ट्रीय व्यापार असे मुख्य प्रकार केले जातात. देशाच्या सीमेच्या आत, वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे अंतर्गत व्यापार होय. तर एका देशातील व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांशी वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय. अशा या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासाबाबत अनेक विचार विकसित झालेले आहेत. त्यांच्या अभ्यासाबरोबरच व्यापारामध्ये निर्माण होणाऱ्या अडथळ्याचा तसेच हस्तक्षेपांचाा अभ्यास अत्यंत महत्वपूर्ण ठरतो. सदर प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये कोणकोणते अडथळे निर्माण होतात किंवा निर्माण केले जातात व त्याचे आंतरराष्ट्रीय व्यापाराबरोबरच देशाच्या विकासावर काय प्रतिकूल प्रीणाम उदभवतात याचा अभ्यास आपण सदर प्रकरणामध्ये करणार आहोत.

## ३.२.१ मुक्त व्यापार आणि संरक्षण धोरण – मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन – मुक्त व्यापार धोरणाविरूध्द मुद्दे – सरंक्षण धोरण – संरक्षण धोरणाचे समर्थन – संरक्षण धोरण विरुध्द मांडले जाणारे मुद्दे

❑ **मुक्त व्यापार आणि संरक्षण धोरण** (Free Trade and Protective Trade) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे अविकसित देशांच्या आर्थिक विकासाला चालना मिळते, असे मत अनेक अर्थशास्त्रज्ञांनी व्यक्त केले आहे. त्यामध्ये रॅग्नर नर्क्स्, हॅबरलर वगैरेंचा समावेश आहे. नैसर्गिक

साधन संपत्तीचा पर्याप्त वापर, श्रमविभागणीचे फायदे, कमी किंमतीत वस्तूंची उपलब्धता, भाववाढ नियंत्रण, शेती वस्तू व कच्च्यामालाच्या मागणीत वाढ, बाजारपेठाचा विस्तार, नवीन कौशल्य व तंत्रज्ञानाची आयात, विदेशी भांडवल प्राप्ती, औद्योगिक विकास, आयात-निर्यातीमध्ये वाढ, उत्पादन वाढ, राजकीय संबंध सुधारतात यासारखे अनेक फायदे आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये सहभागी झालेल्या देशांना प्राप्त होतात व त्यामधून आर्थिक विकासाला चालना मिळते. म्हणूनच आंतरराष्ट्रीय व्यापार हे अविकसित देशांच्या आर्थिक वाढीचे इंजिन असे म्हटले जाते. जागतिक स्तरावर खुले व्यापारी धोरण व संरक्षणाचे धोरण अशी दोन प्रकारची धोरणे असतात. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणामध्ये देशी उदयोगांना सरंक्षण देण्यासाठी जी आयातीवर जकात, कोटा यासारखी बंधने लादली जातात, तेव्हा त्यास सरंक्षणाचे धोरण असे म्हणतात. तर आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणामध्ये देशी उदयोगांना सरंक्षण देण्यासाठी जी आयातीवर जकात, कोटा यासारखी बंधने लादली जातात, तेव्हा त्यास सरंक्षणाचे धोरण असे म्हणतात.

खुल्या व्यापारी धोरणामध्ये व्यापारावर कोणत्याही प्रकारची बंधने नसतात. जकाती आयात व निर्यात कर नसतात. व्यापार मुक्त असतो. याउलट संरक्षण व्यापारावर अनेक बंधने असतात. जकात कर, आयात कर, निर्यात कर अनेक बंधने लादलेले असतात. व्यापार मुक्त अथवा खुला नसतो. तर विविध राष्ट्रांनी आपल्या उद्योगधंद्यांची वाढ व्हावी, विकास घडून यावा, उत्पादन व रोजगारात वाढ घडून यावी म्हणून परदेशी जकाती व आयात निर्यात कर लादलेले असतात. त्यामुळे परकीय वस्तू स्वदेशी वस्तूंच्या तुलनेत महाग होतात. परिणामी परकीय वस्तूंची मागणी कमी होऊन स्वदेशी वस्तूंची मागणी वाढते, त्याच्या किंमती वाढतात, नफा वाढतो, गुंतवणूक, उत्पन्न व रोजगार वाढतो व स्वदेशी उद्योंगांचा विकास होतो. म्हणून विकसनशील व अविकसित देश संरक्षणाच्या धोरणाचा अवलंब करतात.

## अ) मुक्त व्यापार किंवा खुला व्यापार (Free Trade) :-

१८ व्या शतकामध्ये अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ, रिकार्डो, मील यासारख्या अर्थतज्ञांनी मुक्त किंवा खुल्या व्यापार धोरणाचा पुरस्कार केला. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या ज्या धोरणामध्ये देशी उत्पादन व परदेशी उत्पादन असा भेदभाव न करता त्यास निर्यातीसाठी कोणतीही सवलत दिली जात नसेल, तसेच आयातीवर बंधने लादली जात नसतील तर त्यास मुक्त व्यापाराचे धोरण असे म्हणतात.

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञानी खुल्या व्यापाराबाबतचे विचारांची मांडणी करताना ज्या काही विचारांची मांडणी केली आहे त्यामध्ये पुढील विचारांचा समावेश होतो.

१) सर्व देश विकासाच्या समान अवस्थेत असतात.

२) सर्व सिध्दांत सर्व देशांना समान लागू पडतात.

३) सर्व देशांनी एकाच धोरणाचा स्विकार करावा.

४) मुक्त व्यापाराचा स्विकार सर्व राष्ट्रांनी करावा.

५) सरकारचे धोरण हस्तक्षेप विरहीत असावे.

सनातनवादी अर्थतज्ञांनी जगातील सर्वच देश विकासाच्या एका समान अवस्थेत पोहचलेले आहे त्यामुळे सर्वांनी खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार करावा असे मत व्यक्त केले होते. त्यांच्या मते जगातील सर्व देशांची संस्कृती, परंपरा विकासाची अवस्था समान असल्याने एक सिद्धांत सर्वांना लागू पडत असतो. व्यापार विषयक धोरणामध्ये भिन्नता नसावी तसेच सरकारने अनावश्यक हस्तक्षेपाचे धोरण बाजूला ठेवून खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारल्यास सर्वच राष्ट्रांचा आर्थिक विकास घडून येण्यास मदत होईल असे मत व्यक्त केले.

## ❑ मुक्त व्यापार धोरणाचे समर्थन :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात तसेच निर्यातीवर कोणतीही बंधने लादली जात नसतील तर त्यास मुक्त व्यापाराचे धोरण असे म्हणतात. असे हे मुक्त व्यापार धोरण का फायदेशीर ठरते ते मुक्त व्यापार धोरणाच्या समर्थनार्थ मांडल्या जाणाऱ्या पुढील मुद्यांवरून अधिक स्पष्ट होते.

### १. नैसर्गिक लाभ :-

आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे मुक्त व्यापार धोरण स्विकारल्यास व्यापारामध्ये सहभागी होणाऱ्या सर्वच देशांना मोठ्या प्रमाणात नैसर्गिक लाभ प्राप्त होतात. विशीष्ट वस्तूंच्या उत्पादनावर अधिक भर दिल्याने देशात उपलब्ध साधनसामग्रीचा पर्याप्त वापर होऊन नैसर्गिक लाभ प्राप्त होण्यास मदत होते. मुक्त व्यापार धोरण जसे दोन्ही देशांना फायदेशीर असते तसेच त्यावर बंधने लादल्यास व्यापाराचे लाभ नाहीसे होतात असे मत केन्स यांनी व्यक्त केले.

### २. विदेशी व्यापाराचा विस्तार :-

आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी सहभागी राष्ट्रांनी मुक्त व्यापार धोरण स्विकारल्यास वस्तू व सेवांचे मोठ्याप्रमाणात उत्पादन होते. तसेच अल्प उत्पादन खर्च व उच्च दर्जाच्या वस्तू उत्पादनाचे प्रयत्न उत्पादक करीत असल्याने अशा वस्तू जागतिक स्तरावर अनेक देशांमध्ये विकल्या जातात व त्यामधून विदेशी व्यापाराचा विस्तार घडून येण्यास मदत होते.

### ३. पुर्ण रोजगार :-

आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी मुक्त व्यापार धोरणाचा स्विकारल्यास उपलब्ध नैसर्गिक साधन सामग्रीचा पर्याप्त वापर करून मोठ्या प्रमाणात वस्तू व सेवांचे उत्पादन करण्याचा प्रयत्न सहभागी राष्ट्रे करतात.

उत्पादन वाढीच्या या प्रयत्नामध्ये उपलब्ध असलेले भांडवल, कामगार, संयोजक आणि जमिन यांचा उत्पादन प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेतले जात असल्याने अर्थव्यवस्थेत पुर्ण रोजगाराची अवस्था निर्माण होण्यास मदत होते.

### ४. स्पर्धा शक्तीमध्ये वाढ :-

मुक्त व्यापार धोरण स्विकारल्यास अल्प उत्पादन खर्च व उच्च दर्जाच्या वस्तू उत्पादन मोठ्या प्रमाणात घेण्याचे प्रयत्न उतपादक करीत असतात. त्यामधून चांगल्या दर्जाच्या वस्तू अल्प किंमतीला जागतिक बाजारपेठेत उपलब्ध होत असल्याने जागतिक बाजारपेठेत स्पर्धाशक्ती वाढण्यास मदत होते.

### ५. मक्तेदारी नियंत्रण :-

मुक्त व्यापार धोरणांतर्गत उत्पादक, व्यापारी यांना सरकारकडून कोणत्याही सवलती दिल्या जात नाहीत तसेच तसेच कोणतीही बंधने देखील लादली जात नाहित. परीणामी अनेक उत्पादक उत्पादनाच्या प्रक्रियेत सहभागी होत असतात. परिणामी मक्तेदारीचे आपोआप नियंत्रण केले जाते.

### ६. शेती तसेच औद्यागिक विकासाला चालना :-

मुक्त व्यापार धोरणाचा स्विकार केलेले देश निर्यात वाढीसाठी उपलब्ध नैसर्गिक साधन संपत्तीचा मोठ्याप्रमाणात वापर करतात, त्यामधून शेतीतील कच्च्या मालावर प्रक्रीया करून औद्यागिक पक्का माल उत्पादीत करणे व त्याची निर्यात करणे या प्रक्रियेमध्ये शेती तसेच औद्योगीक विकास देखील गतीमान होण्यास मदत होते.

## ❑ मुक्त व्यापार धोरणाविरूध्द मुद्दे :-

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या मुक्त व्यापार धोरणाच्या समर्थनाबरोबरच त्यावर काही आक्षेपही घेतले जातात ते पुढील मुद्यांवरून अधिक स्पष्ट होतात.

### १. आंतराष्ट्रीय एकाधिकार :-

विशिष्ट स्वरूपाच्या वस्तूंचे उत्पादन करणारे उत्पादक आंतरराष्ट्रीय स्तरावर संगनमत झाल्यास त्यामधून मक्तेदारीची अवस्था निर्माण होवून ग्राहकांचे शोषण वाढण्याची शक्यता निर्माण होते.

### २. आंतराष्ट्रीय व्यापारातील स्पर्धा :-

आंतरराष्ट्रीय व्यापारातील स्पर्धेमध्ये देशी उद्योग टिकाव धरू न शकल्यास देशी उद्योगांचा ऱ्हास होवून अर्थव्यवस्था आर्थिक संकटामध्ये सापडण्याची शक्यता असते.

### ३. व्यापार चक्राचा प्रभाव :-

मुक्त व्यापाराच्या धोरणाचा स्विकार केल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारात होणाऱ्या आयात निर्यातीवर सरकारचा फारसे नियंत्रण रहात नसल्याने मोठ्या प्रमाणात बंधन विरहीत आयात निर्यात होत राहते. तसेच जर एखाद्या देशात तेजी मंदीचे चक्र निर्माण झाले तर ते अगदी सहज अन्य अर्थव्यवस्थांमध्ये प्रवेश करते. त्यामधून जागतिक अर्थव्यवस्था संकटात सापडू शकते.

### ४. अनिष्ट वस्तूंची आयात :-

मुक्त व्याराच्या धोरणामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारातील आयात निर्यातीवर सरकारचा नियंत्रण नसल्याने अनेक प्रसंगी देशामध्ये आमली पदार्थ तसेच अन्य स्वरूपाच्या अनिष्ट स्वरूपाच्या वस्तूंची आयात होण्याची व त्यामधून राष्ट्रविघातक घटना घडण्याची श्चयता असते.

### ५. दुर्मिळ साधनसंपत्तीचा दुरूपयोग :-

मुक्त आंतरराष्ट्रीय व्यापाराचे जास्तीत जास्त लाभ प्राप्त करून घेण्यासाठी उत्पादक मोठ्या प्रमाणात वस्तू व सेवांचे उत्पादन करतो व त्यामधून अर्थव्यवस्थेत उपलब्ध असलेल्या दुर्मिळ अशा नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होवून अर्थव्यस्थेत शाश्वत विकासाकडे दुर्लक्ष होवून ती पुढील कालखंडात संकटात सापडू शकते.

### ६. बालोद्योगांचा ऱ्हास :-

अल्प विकसित देशांमध्ये नव्याने स्थापन झालेल्या बालोद्योगांना मोठ्या उद्योगांशी स्पर्धा करत येणे शक्य नसल्याने ते मुक्त व्यापाराचे स्पर्धेमध्ये नाहिसे होतील व त्यामधून अशा अर्थव्यवस्थांचे विकसीत अर्थव्यवस्थांवरील अवलंबित्व वाढत जावू शकते.

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये मुक्त व्यापाराचे धोरण स्विकारल्यास वरील स्वरूपाच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता असते.

## ब) सरंक्षण धोरण (Protective Trade) :-

संरक्षणविषयक व्यापारी धोरण प्रथम अमेरिकेत अलंक्झांडर हॅमिल्टन यांनी १७९१ मध्ये मांडले. त्याने अमेरिकेत १७५०-१८०४ या काळात संरक्षण धोरणाचा पुरस्कार केला. त्यानंतर जर्मन अर्थशास्त्रज्ञ फ्रेडरिक लिस्टने देखील १७८९-१८४६ या काळात जर्मनीतील उद्योगधंद्याच्या विकासासाठी या धोरणाचा पुरस्कार केला. हेन्री चार्लस् केरी या अमेरिकन विचारवंताचे देखील संरक्षण धोरणाचा पुरस्कार केला.

प्रसिध्द जर्मन, अर्थशास्त्रज्ञ फ्रेडरिक लिस्ट यांनी जर्मनीमधील नव्याने स्थापन झालेल्या बालउदयोगसाठी सर्वप्रथम सरंक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार केला. आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणामध्ये देशी उदयोगांना सरंक्षण देण्यासाठी जी आयातीवर जकात, कोटा यासारखी बंधने लादली जातात, तेव्हा त्यास सरंक्षणाचे धोरण असे म्हणतात. सनातनवादी विचारामध्ये असणारे दोषच राष्ट्रवादी विचारसरणीच्या उदयाला कारणीभूत ठरलेले आहेत. **सनातनवादी विचारवंतानी जगातील सर्वच देशांनी विकासाचा एक विशिष्ट टप्पा गाठलेला आहे.** सर्व देश विकासाच्या समान अवस्थेला पोहचलेले आहेत. त्यामूळे त्यांनी खुल्या अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्यास त्यामधून सर्वच देशांना फायदा प्राप्त होईल. हेच विचार सनातनवादी विचारावरील टीकेस कारणीभूत ठरले व त्यामधून जागतिक स्तरावर संरक्षणवादी विचारांचा विकास घडून आला. **प्रचलित सनातवादी विचारांमधील प्रमुख दोष दाखवित, त्या विचारांना विरोध दर्शविणारे संरक्षणवादी विचारसरणीचे समर्थन करणारे लिखान सर्वप्रथम फ्रेडरिक लिस्ट यांनी केले म्हणूनच त्यांनी संरक्षणवादी विचारांचे प्रणेते असे म्हटले जाते.** लिस्ट यांनी सनातनवादी विचारांवर पुढील टीका केलेल्या आहेत.

१) सर्व देश समान विकासावस्थेत नसतात.

२) राष्ट्रवादी संकल्पनेकडे दुर्लक्ष.

३) एकच सिध्दांत सर्व देशांना समान लागू पडत नाहीत.

४) एकच धोरण सर्व देशांना योग्य नाही.

५) संपत्तीच्या निर्मितीकडे दुर्लक्ष.

६) व्यक्तिहीत व व्यक्ति स्वातंत्र्याला अवास्तव महत्त्व.

७) खुल्या व्यापाराला अधिक महत्त्व.

८) निर्हस्तक्षेपाचे धोरण अयोग्य.

९) जगात सर्वत्र शांतता नसते.

१०) विविध देशातील हितसंबंध समान असत नाहीत.

११) सनातनी विचारांमध्ये गतीशीलतेकडे दुर्लक्ष.

वरील स्वरुपाच्या विविध टीका करुन लिस्ट यांनी सनातनवादी विचारांमधील दोष किंवा कमकुवतपणा स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या टीका करुन लिस्ट यांनी राष्ट्रवाद, विकासाचे टप्पे व संरक्षणाचे धोरण याबाबतचे स्वत:चे तत्वज्ञान मांडण्याचा प्रयत्न केला व ते आज जगप्रसिध्द झालेले आहे.

अर्थशास्त्रज्ञ फ्रेडरिक लिस्ट आर्थिक विकासाच्या चौथ्या अवस्थेतील देशांनी आपल्या अर्थव्यवस्थेतील नव्याने सुरु झालेल्या बाल्यावस्थेतील उद्योगांच्या विकासावर विकसीत राष्ट्रांमधून होणाऱ्या आयातीमुळे विपरीत परिणाम होणार नाही या दृष्टीने आयात व्यापारावर जकात तसेच कोटा यासारख्या व्यापारविषयक

बंधनांचा वापर करुन अशा उद्योगांचे रक्षण करण्याबाबतचे जे धोरण सुचविलेले आहे त्यास संरक्षणाचे धोरण असे म्हणतात.

हॅरी जी. जॉन्सन यांनी संरक्षण धोरणाची व्याख्या पुढील प्रमाणे दिली आहे, स्वदेशी उपभोक्ते व उत्पादकांना आपल्या बाजारातील वस्तूंच्या सापेक्ष किंमत व जागतिक बाजारपेठेतील या वस्तूंच्या सापेक्ष किंमतींमध्ये तफावत निर्माण करणाऱ्या धोरणास संरक्षणाचे धोरण असे म्हणतात.

## ❑ संरक्षण धोरणाची उद्दिष्टे :-

१) स्वदेशी उद्योगांना परकीय स्वस्त वस्तूंच्या आयातीपासून संरक्षण देणे.

२) स्वदेशी वस्तू व परदेशी वस्तूंच्या किंमतीमधील तफावत दूर करण्यासाठी परदेशी वस्तूंवर आयात कर लादणे.

३) स्वदेशी उद्योगांना अनुदाने देणे, त्यामुळे त्यांचा उत्पन्न खर्च कमी ठेवता येतो व परदेशी मालाशी स्पर्धा करता येते.

४) विदेशी विनिमय दराशी तोंड देण्यासाठी निर्यात अनुदाने देणे.

५) परकीय उद्योगांशी स्पर्धा देण्यासाठी परकीय वस्तूच्या व्यापारावर वेगवेगळी बंधने लादणे.

## ❑ विकास अवस्था व व्यापाराचे धोरण :-

फ्रेडरिक लिस्ट यांनी प्रत्येक देशाची अवस्था भिन्न स्वरुपाची आहे, परिणामी कोणत्या देशाने संरक्षणाचे धोरण स्विकारावे व कोणत्या देशाने मुक्त व्यापाराचे धोरण स्विकारावे हे त्या-त्या देशाच्या विकास अवस्थेवर अवलंबून आहे. इंग्लंड हा विकासाच्या सर्वोच्च स्तरावर असल्याने मी जर इंग्लंडचा नागरीक असतो तर मी देखील मुक्त व्यापाराचा पुरस्कार केला असता परंतु आज जर्मनी विकासाच्या सर्वोच्च अवस्थेमध्ये पोहचण्यासाठी मी जर्मनीसाठी संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार करेन असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

| | **विकास अवस्था** | **आवश्यक धोरण** |
|---|---|---|
| १ | शिकारी/रानटी अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |
| २ | पशुपालन/गुराखी अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |
| ३ | शेती विकास अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |
| ४ | शेती-उद्योग विकासाची अवस्था | संरक्षणाचे धोरण |
| ५ | शेती-उद्योग व्यापार विकासाची अवस्था | खुल्या व्यापाराचे धोरण |

वरील विविध विकासाच्या अवस्थेमध्ये आज जगातील देशांची विभागणी झालेली आहे. जे देश विकास साध्य करण्यास सक्षम आहेत व शेती उद्योग विकासाच्या अवस्थेत आहेत फक्त त्यांनाच संरक्षण धोरणाची आवश्यकता आहे. विकासाची क्षमता नसणाऱ्या व सर्वोच्च विकास साध्य केलेल्या देशांना संरक्षणाच्या धोरणाची आवश्यकता नाही असे मत लिस्ट यांनी व्यक्त केले. म्हणजे लिस्ट यांचे नाव संरक्षणाच्या धोरणाशी जरी जोडले गेले असले तरी ते फक्त संरक्षणाच्या धोरणाचे समर्थक व खुल्या व्यापाराचे विरोधक आहेत असे कधीच नव्हते त्यांनी खुल्या व्यापाराचे धोरण कोणत्या अवस्थेमध्ये उपयुक्त ठरते याचे ही स्पष्टीकरण दिलेले आहे. त्यामूळे त्यांचे विचार सर्वांगीण व श्रेष्ठ स्वरुपाचे मानले जातात.

## ☼ लिस्टच्या संरक्षण धोरणाचे वैशिष्ट्ये :-

लिस्ट यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराबाबतचे संरक्षणाचे धोरण स्पष्ट केलेले आहे त्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये पुढील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. **बाल्यावस्थेतील उदयोगांच्या विकासासाठी संरक्षण :** ज्या अर्थव्यवस्था शेती-उद्योग विकासाच्या अवस्थेमध्ये आहेत त्यांनीच देशी उद्येगाच्या संरक्षणाच्या दृष्टीने संरक्षणाचे धोरण स्विकारावे. म्हणजेच जर्मनीसारख्या देशांनी सर्वोच्च विकासाचा टप्पा साध्य करण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या उद्योगांचा विकास साध्य करता यावा यासाठी संरक्षणाचे धोरण स्विकारावे हे वैशिष्ट्य मानले जाते.

२. **रानटी अवस्थेतील अर्थव्यवस्थांना संरक्षणाची गरज नाही :** या अवस्थेमधील देश अतीमागास अवस्थेमध्ये असतात त्यांना संरक्षणाची गरज नसते त्यांनी खुल्या व्यापार धोरणाचा स्विकार केल्यास त्यांचा विकास गतीमान होण्यास मदत होते.

३. **गुराखी अवस्थेमध्ये देखील खुला व्यापार :** लिस्ट यांनी गुराखी अवस्थेमध्ये असणाऱ्या देशांना देखील खुल्या व्यापाराचे धोरण योग्य असते. त्यांना संरक्षणाची आवश्यकता नसते ते खुल्या व्यापार धोरणाच्या साहाय्याने विकासाची पुढची अवस्था साध्य करु शकतात.

४. **शेती विकास अवस्थेमध्ये संरक्षणाची आवश्यकता नाही :** लिस्ट यांच्या मते शेती विकास अवस्थेमधील देशांनी मुक्त व्यापाराचा स्विकार करावा शेती उत्पादन, कच्चा माल याची निर्यात करुन औद्योगीक उत्पादनाची, आयात करुन विकासाचा पुढील टप्पा साध्य करण्याचे प्रयत्न करावेत. म्हणजेच त्यांना संरक्षणाची आवश्यकता नाही.

५. **समशीतोष्ण कटिबंधातील देशांना संरक्षण :** ज्या देशाची सर्वोच्च विकास साध्य करण्याची क्षमता आहे. अशा देशांनीच संरक्षणाच्या धोरणाचा स्विकार करावा असे तत्वज्ञान लिस्ट यांनी मांडले अशी क्षमता समशीतोष्ण कटिबंधातील देशांची असते त्यांनी संरक्षणाचे धोरण स्विकारावे.

६. **उष्णकटिबंधातील देशांसाठी खुल्या व्यापाराचे धोरण :** उष्णकटिबंधातील देशांची सर्वोच्च विकास साध्य करण्याची क्षमता नसते म्हणूनच त्यांनी संरक्षणाच्या धोरणा ऐवजी मुक्त किंवा खुल्या व्यापाराचे धोरण स्विकारावे व आपल्या विकासाचा पुढील टप्पा साध्य करण्याचा प्रयत्न करावा.

७. **क्षमता असणाऱ्या देशानांच संरक्षण :** ज्या राष्ट्राची आर्थिक विकासाची क्षमता आहे अशाच देशांनी संरक्षणाचे धोरण स्विकारावे व ज्या देशांचा विकास साध्य करण्याची क्षमता नाही त्यानी विकासासाठी व्यापाराच्या धोरणाला प्राधान्य द्यावे.

८. **औद्योगीक शिक्षण हे संरक्षण धोरणाचे उद्दिष्ट :** अर्थव्यवस्थेला सर्वोच्च विकासाच्या अवस्थेमध्ये रुपांतरीत करण्यामध्ये औद्योगीक शिक्षणाचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असे असते. म्हणूनच अर्थव्यवस्थेमध्ये औद्योगीक शिक्षणाचा विस्तार करणे हे संरक्षणाच्या धोरणाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असते.

९. **भांडवलाची कमतरता असणाऱ्या राष्ट्रांसाठी मुक्त व्यापार :** ज्या राष्ट्रांमध्ये भांडवलाची कमतरता असते अशी राष्ट्रे विकासाच्या मागासलेल्या अवस्थेमध्ये असतात त्यांनी आपला विकास साध्य करण्यासाठी खुल्या व्यापार धोरणाचा स्विकार करावा.

१०. **मुक्त व्यापाराचे संरक्षण करणारा संरक्षण वाद :** लिस्ट यांनी संरक्षणवादाचे समर्थन करताना कधीही मुक्त व्यापाराचा किंवा खुल्या व्यापाराचा विरोध केला नाही. उलट त्यांनी विकासाच्या कोणत्या अवस्थेमध्ये मुक्त व्यापाराचे धोरण योग्य असते याचे स्पष्टीकरण दिले आहे. म्हणजेच लिस्ट यांचा संरक्षणवाद हा मुक्त व्यापाराचा समर्थक होता.

११. **सर्व उद्योगांना संरक्षणाची आवश्यकता नाही :** अर्थव्यवस्थेतील सर्वच उद्योगांना संरक्षण देण्याची आवश्यकता नसून जे उद्योग नव्याने स्थापन झालेले आहेत अशा बाल्यावस्थेमधील उद्योगांना संरक्षणाची आवश्यकता आहे.

१२. **कच्च्या मालाच्या बाबत मुक्त व्यापार :** जी राष्ट्रे कच्चा मालाबाबत इतर राष्ट्रांवर अवलंबून असतात त्यांनी संरक्षणाचे धोरण स्विकारल्यास कच्च्या मालाची आयात महाग होवून वस्तू उत्पादन खर्च वाढतो निर्यात घटते म्हणून त्यांनी मुक्त व्यापार स्विकारावा.

१३. **यंत्रसामग्रीच्या बाबत मुक्त व्यापार :** जे देश यंत्र सामग्रीच्या बाबतीत अन्य देशांवर अवलंबून आहेत संरक्षणाचे धोरण स्विकारल्यास त्याचा देशाच्या औद्योगिक विकासावर विपरीत परिणाम होतो, विकासाचा वेग मंदावतो तो देश सर्वोच्च विकास अवस्था साध्य करु शकत नाही. म्हणून अशा देशांनी मुक्त व्यापाराचे धोरण स्विकारावे असे मत व्यक्त केले.

वरील स्वरुपाचे अनेक विचार फ्रेडरिक लिस्ट यांनी व्यक्त केले आहेत. लिस्टने जरी राष्ट्रवादाचे समर्थन केले असले तरी तो विश्ववादाचा विरोधक कधीच नव्हता, राष्ट्र विकसीत अवस्थेत पोहचल्यानंतर त्याने विश्ववाद स्विकारावा असे सांगितले. लिस्टने व्यापारबाबतचे संरक्षणवादाचे धोरण मांडले, त्याचे समर्थन केले असले तरी त्याने मुक्त किंवा खुल्या व्यापाराचा विराध कधीच केला नव्हता. कोणत्या अवस्थेत खुला व्यापार योग्य ठरतो याचे स्पष्टीकरण दिलेले आहे. म्हणजेच लिस्ट यांचे विचार एकांगी स्वरुपाचे नव्हते. त्यांनी सर्व बाजूंचा अभ्यास करुन विचार स्पष्ट केलेले होते म्हणूनच ते अधिक उपयुक्त ठरले.

## ❑ संरक्षण धोरणाचे समर्थन :-

आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणामध्ये देशी उद्योगांना सरंक्षण देण्यासाठी जी आयातीवर जकात, कोटा यासारखी बंधने लादली जातात, तेव्हा त्यास सरंक्षणाचे धोरण असे म्हणतात. असे हे संरक्षणाचे धोरण फायदेशीर ठरते ते संरक्षण धोरणाच्या समर्थनार्थ मांडल्या जाणाऱ्या पुढील मुद्यांवरून अधिक स्पष्ट होते.

१. **श्रमविभागणीत वाढ :** हॅमिल्टनच्या मते देशात संरक्षण धोरणाचा स्वीकार केल्यामुळे देशांतर्गत श्रमविभागणीला चालना मिळते. श्रमविभागणी वाढ झाल्यामुळे तिचे फायदे स्वदेशी उद्योगांना मिळून ते कार्यक्षम व स्पर्धात्मक होतात. त्यामुळे स्वदेशी उद्योगांची वाढ होते

२. **औद्योगिकदृष्ट्या विकसित देशातील कामगारांना संरक्षण :** विकसित देशातील कामगारांना चांगले वेतन मिळते. त्यामुळे त्यांचे उत्पन्न व राहणीमान उच्च दर्जाचे असते. संरक्षण धोरणाचा अंगिकार केल्यामुळे अविकसित देशातील स्वस्त कामगारांची होणारी त्यांची स्पर्धा टाळता येते.

३. **स्वदेशी बाजारपेठांचा विकास :** काही अर्थशास्त्रज्ञांच्या मते संरक्षण विषयक व्यापारी धोरणामुळे स्वदेशी बाजारपेठांचा विकास होतो. संरक्षण धोरणामुळे शेती उत्पादनाच्या बाजारपेठांचा विकास होतो. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होते. त्यांच्याकडून कारखानदारी वस्तूंच्या मागणीत वाढ होते. त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठांचा विस्तार होऊन त्यांचा विकास घडून येतो.

४. **पैसा स्वदेशातच राहतो :** संरक्षणाच्या व्यापारी धोरणामुळे आयातीवर बंधने येऊन ती कमी होते. त्यामुळे स्वदेशी वस्तूंची मागणी वाढते. लोकांनी खर्च केलेला पैसा स्वदेशातच राहतो. आयात वस्तूवर खर्च केल्यास आयातीच्या रुपाने आपल्या देशातील पैसा परदेशात जाऊन देश गरीब होतो. संरक्षणाच्या धोरणामुळे स्वदेशातील पैसा परदेशी जाणे थांबते.

५. **उत्पादन खर्चात समानता :** संरक्षण धोरणामुळे स्वदेशी व परदेशी वस्तूंच्या उत्पादन खर्चात समानता प्रस्थापित करता येते. परदेशी आयात वस्तूंवर आयात कर बसवून त्यांच्या किंमती वाढविल्या जातात. अविकसित देशातील धंदे मागासलेले असल्यामुळे त्यांचा उत्पादन खर्च जास्त असतो. तर विकसित देशातील उद्योगांचा उत्पादन खर्च कमी असतो. त्यामुळे त्यांच्या किंमती कमी असतात. संरक्षण धोरणात जकात कर बसवून त्यांचा उत्पादन खर्च वाढवून अविकसित देशातील वस्तूंच्या उत्पादन खर्चात समानता येते.

६. **पूर्ण रोजगार :** संरक्षण धोरणामुळे देशातील बेरोजगारी कमी करुन पूर्णरोजगारी स्थिती प्रस्थापित करता येते. कारण संरक्षण विषयक जकातीमुळे आयात वस्तूंची मागणी कमी राहते. स्वदेशी वस्तूंची मागणी वाढते, किंमत, नफा, गुंतवणूक, उत्पादन व रोजगार वाढतो.

७. **परदेशी जकातीना उत्तर :** संरक्षण धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंताच्या मते परदेशी मालावर जकाती बसवून आपल्या देशातील वस्तूंवर ज्या देशांनी जकाती लादलेल्या असतात, त्याना जशास तसे उत्तर देता येते. ज्या देशाने आपल्या वस्तूंवर जास्त जकाती आकारलेल्या असतात, त्या देशातील वस्तूंवर आपल्याला जास्त जकाती आकारुन आपल्या उद्योगांना संरक्षण देता येते.

८. **सार्वभौमत्व अबाधित राहते :** संरक्षणाच्या व्यापारी धोरणामुळे देश बहुराष्ट्रीय कंपन्याच्या विळख्यात सापडत नाही. त्यामुळे अविकसित देशांचे स्वतंत्र्य व सार्वभौमत्व अबाधित राहण्यास मदत होते.

९. **देशी उद्योगांना संरक्षण :** संरक्षणाच्या व्यापारी धोरणामुळे स्वदेशातील नवीन लघु व कुटीरउद्योगांना संरक्षण मिळते. उदा. भारतातील खादी व ग्रामउद्योग, भारतीय हातमाग व्यवसाय वगैरे परदेशी यंत्र उद्योगांवर जकाती लादून स्वदेशी ग्रामीण उद्योगांचा विकास घडवून आणता येतो. तसेच स्वदेशी उद्योगांचा सर्वांगिण विकास करता येतो.

१०. **बाजारातील असमतोल दूर करता येतो :** मुक्त व्यापारामुळे विशिष्ट परिस्थिती आवश्यक असते. स्वदेशी बाजार व विदेशी बाजारातील सीमांत पर्यायता दर अथवा सीमांत बदलाचा दर समान असावा लागतो. अन्यथा बाजारात असमतोल निर्माण होतात. स्वदेशी व विदेशी बाजारातील वस्तूंच्या किंमती समान राहत नाहीत. स्वदेशी बाजारात असमतोल निर्माण होतात. हे असमतोल दूर करण्यासाठी परदेशी वस्तूंवर आयात कर बसवून स्वदेशी उद्योगांना संरक्षण द्यावे लागते. जकाती व स्वदेशी उद्योगांना अनुदाने देऊन स्वदेशी व विदेशी बाजारातील सीमांत पर्यायता दर किंवा सीमांत बदलाच्या दरात समानता प्रस्थापित करुन स्वदेशी बाजारातील विकृती दूर करता येतात.

११. **अवपुंजन :** संरक्षण धोरण हा अवपुंजनावरील एक उपाय आहे. अवपुंजन म्हणजे वस्तू स्वदेशी बाजारापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारात कमी किंमतीला विकणे होय. परदेशी बाजारपेठा काबीज करण्यासाठी विकसित देशातील उद्योजक अवपुंजनाचा मार्ग अवलंबितात. उत्पादन खर्चासापेक्षा कमी किंमतीला वस्तूची विक्री करतात. त्यामुळे परदेशी वस्तू स्वस्त व स्वदेशी वस्तू महाग होऊन त्याचा स्वदेशी उद्योगावर प्रतिकूल परिणाम होतो. परदेशी उद्योजकांच्या अवपुंजनाला प्रत्यूतर म्हणून अविकसित देशांनी संरक्षण धोरणाचा स्वीकार करुन परदेशी वस्तूंवर जकाती आकाराव्यात. स्वदेशी उद्योगांना अनुदाने द्यावीत. त्यामुळे स्वदेशी वस्तू व परदेशी वस्तू महाग होऊन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्वदेशी उद्योग टिकतात. म्हणून संरक्षणाच्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार केला जातो.

१२. **आर्थिक मंदीचे उच्चाटन :** संरक्षण धोरणात आकारल्या जाणाऱ्या आयात करामुळे आर्थिक मंदीचे उच्चाटन होऊन अर्थव्यवस्थेच्या पुनरुजीवनास मदत होते. आयात करामुळे परदेशी वस्तूंची स्वदेशात कमी आयात होते. त्यामुळे स्वदेशातील वस्तूंचा पुरवठा कमी होतो. स्वदेशी वस्तूंची विक्री वाढून देशातील आर्थिक मंदीचे उच्चाटन होते.

## ❑ संरक्षण धोरण विरुध्द मांडले जाणारे मुद्दे :-

१. **श्रमविभागणी व विशेषीकरणास प्रतिकूल परिणाम :** संरक्षणाच्या व्यापारी धोरणामुळे आंतरराष्ट्रीय श्रमविभागणी व विशेषीकरणावर प्रतिकूल परिणाम होतो. आंतरराष्ट्रीय श्रमविभागणीसाठी व्यापार मुक्त असावा लागतो. वस्तू, श्रमिक, भांडवल मुक्तपणे एका देशातून दुसऱ्या देशात गेले पाहिजे. त्यांच्यावर कोणताही प्रकारची बंधने असता कामा नयेत तरच आंतरराष्ट्रीय श्रमविभागणीचे व विशेषीकरणाचे फायदे अविकसित देशाना मिळतात. स्वस्तात वस्तू उपलब्ध होतात. संरक्षण धोरणामुळे हे फायदे मिळत नाहीत.

२. **स्वस्त व स्वदेशात उत्पादित न होणाऱ्या वस्तू मिळत नाहीत :** वेगवेगळ्या देशातील नैसर्गिक व सामाजिक परिस्थिती वेगळी असते. त्यामुळे काही देशात निसर्गत:च काही वस्तूंच्या उत्पादनात विशेषीकरण झालेले असते. त्यामुळे कमी उत्पादन खर्चात वस्तू तयार होतात. या वस्तू कमी किंमतीला विकल्या जातात. संरक्षण धोरणामुळे अशा स्वस्तात उत्पादित होणाऱ्या वस्तूंच्या आयातीवर बंधने लादली जातात. म्हणून या विदेशी वस्तू अविकसित देशात येत नाहीत. परिणामी लोकांना स्वस्त व कमी किंमतीत वस्तू मिळत नाहीत.

३. **उत्पादनाचा दर्जा सुधारत नाही :** संरक्षण धोरणामुळे जागतिक उद्योगात स्पर्धा निर्माण होत नाही. त्यामुळे अविकसित देशातील वस्तूंच्या दर्जात सुधारणा होत नाही. तसेच संरक्षणाच्या

धोरणामुळे उच्च दर्जाचे आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान अविकसित देशांना मिळत नाही. परिणामी उत्पादनाच्या दर्जा सुधारत नाही. हा अनुभव सन १९९१ पूर्वी भारतात आला.

४. **मक्तेदारी :** संरक्षण धोरणामुळे देशात विशिष्ट उद्योगांची मक्तेदारी निर्माण होते. संरक्षण धोरणात बाजारात पूर्णस्पर्धा नसल्यामुळे स्थानिक उद्योगांची मक्तेदारी निर्माण होते त्यामुळे ग्राहकांची पिळवणूक होते.

५. **आर्थिक विकासाला मारक :** संरक्षण धोरणामुळे अविकसित देशात परदेशातून भांडवली वस्तू, यंत्रे, आधुनिक तंत्रज्ञान, कच्चामाल भांडवल वगैरेंची आयात होत नाही. या घटकांच्या आयातीवर बंधने येतात. त्यामुळे अविकसित देशांचा जलद आर्थिक विकास घडून येत नाही.

६. **पूर्णरोजगारी निर्माण होत नाही :** संरक्षण धोरणामुळे पूर्णरोजगारी निर्माण होते हे चुकीचे प्रतिपादन आहे. कारण आयात मालावर जकाती बसविल्यास देशाची आयात कमी होते. आयात कमी झाल्यास निर्यात देखील घटते. कारण कोणत्याही देशात आयात ही निर्यातीच्या मोबदल्यात केली जाते. त्यामुळे आयातीचे प्रमाण व निर्यातीचे प्रमाण समान असते. म्हणून जेवढी आयात कमी होते तेवढी निर्यात देखील कमी होते. निर्यात कमी झाल्यामुळे निर्यात उद्योगातील उत्पादन घटकात बेकारी निर्माण होते. म्हणून संरक्षण धोरणामुळे पूर्णरोजगारी निर्माण होत नाही.

## ३.२.२ व्यापारामधील अडथळे (Barriers to Trade) : प्रशूल्क किंवा जकात अडथळे – प्रशूल्क किंवा जकातीचे प्रकार – प्रशूल्क किंवा जकातीचे परिणाम – पर्याप्त जकाती – प्रभावी संरक्षण दर

आंतराष्ट्रीय व्यापारमध्ये नैसर्गिक अडथळे, मनूष्यनिर्मित अडथळे, व्यापारावरील अडथळे, जकात अडथळे, जकातेत्तर अडथळे असे अनेक अडथळे निर्माण होत असतात. त्यामध्ये प्रमुख अडथळे म्हणून जकात अडथळे, जकातेत्तर अडथळे यांचा विचार केला जातो.

## अ) प्रशूल्क किंवा जकात अडथळे (Tariff Barriers) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारमध्ये वस्तू व सेवांची देवाण-घेवाण आयात-निर्यात होत असताना, त्यावर जो कर आकारला जातो त्यास जकात असे म्हटले जाते.

### ❑ प्रशूल्क किंवा जकातीचे प्रकार (Types of Tariffs) :-

१. **निर्यात जकाती** (Export Tariffs) : आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये एखाद्या देशातून दुसऱ्या

देशामध्ये वस्तू व सेवांची निर्यात करीत असताना त्यावर जो कर आकारला जातो त्यास निर्यात जकात असे म्हटले जातात.

२. **आयात जकाती** (Import Tariffs) : आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये एखाद्या देशातून दुसऱ्या देशामध्ये वस्तू व सेवांची आयात करीत असताना त्यावर जो कर आकारला जातो त्यास आयात जकात असे म्हटले जाते.

३. **मूल्यानुसार जकाती** (Ad valorem Tariffs) : जेव्हा आयात-निर्यात व्यापारातील वस्तू किंवा सेवांचे मूल्य किंवा किंमत विचारात घेऊन त्यावर कर आकारले जातात त्यास मूल्यानुसार जकात असे म्हणतात. उदा. १०० क्विंटल गव्हाची निर्यात करीत असताना त्याचे मूल्य १०००० रुपये असेल, तर किती टन गहू याचा विचार न करता १०००० रुपयावर कर आकारल्यास त्याला मूल्यानुसार जकात असे म्हणतात.

४. **विशिष्ट जकाती** (Specific Tariffs) : जेव्हा आयात-निर्यात व्यापारातील वस्तू किंवा सेवांचे मूल्य विचारात न घेता त्यांचे परिमाण किंवा एककाच्या आधारे कर आकारणी केली जाते, तेव्हा त्यास विशिष्ट जकाती असे म्हणतात. उदा.१०० क्विंटल गव्हाची निर्यात करीत असताना त्याचे मूल्य १०,००० रुपये असेल, तर किती क्विंटल गहू आहे याचा विचार करुन १०,००० रुपये मूल्याचा विचार न करता १०० क्विंटल परिमाणावर कर आकारल्यास त्याला विशिष्ट जकाती असे म्हणतात.

५. **संयुक्त जकाती** (Compound Tariffs) : जेव्हा आयात-निर्यात व्यापारातील वस्तू किंवा सेवांचे मूल्य तसेच त्यांचे परिमाण या दोहोंच्या आधारावर कर आकारणी केली जाते, त्यास संयुक्त जकात असे म्हणतात. उदा.१०० क्विंटल गव्हाची निर्यात करीत असताना त्याचे मूल्य १०,००० रुपये असेल तर गव्हाचे परिमाण व मूल्य दोहोचा विचार करून कर आकारणी केली जाते, तेव्हा त्यास संयुक्त जकात असे म्हणतात.

६. **सरंक्षक जकाती** (Protective - Tariffs) : देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर कर आकारला जातो तेव्हा त्यास सरंक्षक जकाती असे म्हणतात. याचा उद्देश देशी उद्योगांना संरक्षण देणे हा असतो.

७. **महसुली जकाती** (Revenue Tariffs) : जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवावर कर आकारण्याचा उद्देश उत्पन्न प्राप्ती हा असतो तेव्हा त्यास महसुली जकाती असे म्हणतात.

## ❑ प्रशूल्क किंवा जकातीचे परिणाम (Effects of Tariff) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये जेव्हा आयात आणि निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू व सेवांवर जेव्हा प्रशूल्क आकारणी केली जाते तेव्हा त्याचे विविध परिणाम संभवतात. प्रसिध्द अर्थतज्ञ किंडलबर्जर यांनी प्रशूल्काचे पुढील सात परिणाम स्पष्ट केले आहेत.

१. **संरक्षण परिणाम :** देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर कर आकारला जातो तेव्हा त्यास सरंक्षक जकाती असे म्हणतात. देशी उद्योगांना संरक्षण देण्यासांठी जेव्हा एखादा देश मोठ्या प्रमाणात आयात प्रशूल्काची आकरणी करतो तेव्हा त्या पटीत आयात होणाऱ्या वस्तू व सेवांच्या किंमती वाढत जाऊन आयात वस्तूंची मागणी कमी होते. देशांतर्गत वस्तू व सेवांची मागणी वाढून देशी उद्योगांना परकीय वस्तू सेवांच्या आयातीपासून संरक्षण प्राप्त होण्यास मदत होते. अशा स्वरूपाच्या परिणामास संरक्षण परिणाम असे म्हणतात.

२. **किंमत परिणाम :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर आकारल्या जाणाऱ्या प्रशूल्कानूसार त्यांच्या किंमतींमध्ये चढ-उतार होत असतात. आयात निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर जेव्हा अधिकच्या दराने प्रशुल्क आकारणी केल्यास त्यांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढतात याउलट प्रशुल्काचे दर कमी केल्यास त्या वस्तूंच्या किंमती कमी होण्यास मदत होते.

३. **उपभोग परिणाम :** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर आकारल्या जाणाऱ्या प्रशूल्कानूसार त्यांच्या किंमतींमध्ये चढ-उतार होतात व त्यामधून सदर वस्तू व सेवांचा उपभोग सुध्दा कमी जास्त होत असल्याचे दिसून येते. आयात निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर जेव्हा अधिकच्या दराने प्रशुल्क आकारल्यास त्यांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढून त्यांची मागणी व आयात कमी होते व उपभोग सुध्दा कमी होतो. याउलट प्रशुल्काचे दर कमी केल्यास त्या वस्तूंच्या किंमती कमी झाल्याने त्यांची आयात व उपभोग वाढण्यास मदत होते.

४. **उत्पन्न परिणाम :** जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवावर कर आकारण्याचा उद्देश उत्पन्न प्राप्ती हा असतो तेव्हा त्यास महसुली जकाती असे म्हणतात. आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर आकारल्या जाणाऱ्या प्रशूल्कानूसार सरकारला कमी अधिक प्रमाणात उत्पन्न प्राप्त होत असते. सरकार जेव्हा अधिकच्या दराने प्रशुल्क आकारते तेव्हा सरकारला मोठ्या प्रमाणात उत्पन्न प्राप्त होते. असे

असले तरी काही परिस्थितीमध्ये वाढीव प्रशूल्कामूळे आयात पुर्णत: कमी होऊन उत्पन्न घटू सुध्दा शकते.

५. **व्यापारशर्तीवर परिणाम :** व्यापारशर्तीनाच मूल्य तुल्यता दर (Terms of Trade) असेही म्हणतात. निर्यात वस्तू व आयात वस्तू यांच्यामधील देवाण-घेवाण ज्या दराने केली जाते त्यास व्यापाशर्ती किंवा मूल्यतुल्यता दर असे म्हणतात. जेव्हा एखाद्या देशाचा निर्यातीचा किंमत निर्देशांक हा आयातीच्या किंमत निर्देशांकापेक्षा जास्त असतो तेव्हा त्यास अनुकूल व्यापारशर्ती असे म्हणतात. जेव्हा एखाद्या देशाचा निर्यातीचा किंमत निर्देशांक हा आयातीच्या किंमत निर्देशांकापेक्षा कमी असतो, तेव्हा त्यास प्रतिकूल व्यापारशर्ती असे म्हणतात. आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयात-निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर अधिक प्रमाणात प्रशूल्क आकारणी केल्यास त्यांच्या किंमती वाढून मागणी व आयात कमी होते व त्यामधून आयात किंमत निर्देशांक निर्यातीपेक्षा कमी राहतो व व्यापारशर्ती आयातदार देशांना अनुकूल होण्यास मदत होते.

६. **रोजगारावर परिणाम :** देशी उद्योगांना संरक्षण देण्यासांठी जेव्हा एखादा देश मोठ्या प्रमाणात आयात प्रशूल्काची आकरणी करतो तेव्हा त्यापटीत आयात होणाऱ्या वस्तू व सेवांच्या किंमती वाढत जाऊन मागणी व आयात कमी होते. देशांतर्गत वस्तू व सेवांची मागणी वाढून देशी उद्योगांचा विकास होतो व रोजगार सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढत जाते.

७. **व्यवहार तोलावर परिणाम :** एखाद्या देशाने विशिष्ट कालखंडामध्ये जगातील सर्व देशांच्याबरोबर केलेल्या सर्व आर्थिक व्यवहारांच्या जमा खर्चास व्यवहारतोल असे म्हणतात. यालाच देवघेवीचा तोल असे देखील म्हणतात. आयात निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तू किंवा सेवांवर जेव्हा अधिकच्या दराने प्रशुल्क आकारणी केल्यास त्यांच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढाल्याने त्यांची आयात कमी होत जाऊन व्यवहारतोलातील असमतोल कमी होण्यास मदत होते.

## ब) पर्याप्त जकाती (Optimum Tariff ) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारमध्ये सहभागी देश जेव्हा वस्तू व सेवांची देवाण-घेवाण आयात-निर्यात होणाऱ्या वस्तू व सेवांवर कर आकारणी करतात तेव्हा त्यास जकाती असे म्हटले जाते. देशी उद्योगांना संरक्षण देणे, महसूल प्राप्ती, व्यापारशर्ती सुधारणे, देशी उद्योगांचा विकास, रोजगार वृध्दी तसेच व्यवहारतोलातील असमतोल कमी करणे यासारखे उद्देश समोर ठेवून जकातीची आकारणी केली जाते. सर्वसाधारणपणे जकाती आकारणी केल्यानंतर व्यापारशर्ती अनुकूल होऊन देशाला फायदा प्राप्त होईल अशी अपेक्षा असते. परंतू त्यासाठी जकात आकारणीचा दर विशीष्ट मर्यादेमध्ये असावा लागतो. जकात

दर जर मर्यादेपेक्षा अधिक असेल तर जकात आकारणी करणाऱ्या देशाला लाभ न होता नुकसान होऊ शकते व त्यामधून व्यापारशर्ती, व्यापारतोल तसेच व्यवहारतोल यामध्येही समस्या निर्माण होतात व अर्थव्यवस्था संकटामध्ये सापडू शकते. म्हणूनच जकात आकारणीचा आदर्श दर काय असावा याचा विचार करूनच जकात आकारणी करावी लागते.

## ❑ पर्याप्त जकातीची व्याख्या :-

जकातीच्या ज्या दरापासून देशाला फायदे प्राप्त होतात किंवा देशाच्या कल्याणामध्ये वाढ घडून येते अशा दराला पर्याप्त जकात दर असे म्हणतात.

किंडलबर्जर यांचे सुत्र : अर्थतज्ञ किंडलबर्जर यांनी पर्याप्त जकात मापनासाठी पुढील सुत्र मांडले आहे.

$$t = \frac{1}{e - 1}$$

सदर सुत्रामध्ये :

t = जकातदर

e = विरूध्द देशाच्या प्रस्ताव वक्राचा लवचिकता विंदू

देशाचा प्रस्ताव वक्र सरळ रेषेला छेदत असेल तर जकाती पर्याप्त असतात.

**प्रभावी संरक्षण दर** (Effective Rate of Protection /Tariff) **:** देशी उत्पादकांना मिळणाऱ्या प्रत्यक्ष संरक्षणाची कल्पना नाममात्र (Nominal) जकातीच्या दरावरून येत नसल्याने प्रभावी संरक्षणाचा दर विचारात घ्यावा लागतो. देशाच्या प्रशुल्क अनुसूचीत उल्लेख केलेल्या दराला नाममात्र जकात दर असे म्हणतात.

**प्रभावी संरक्षण दर :** मुक्त व्यापार परिस्थितीतील देशाच्या वर्धित मूल्यात होणाऱ्या वाढीची टक्केवारी म्हणजे प्रभावी संरक्षण दर होय.

देशी बाजारपेठेत वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी मध्यस्थ वस्तूंची (Intermediate goods) आयात करताना त्यावर आकारलेल्या जकातीचा परिणाम म्हणून देशी वर्धित मूल्याच्या टक्केवारीत होणार वाढ म्हणजे प्रभावी संरक्षणाचा दर होय. उत्पादकांना आपल्या देशातील श्रमीकांच्या बरोबर अनेक मध्यस्थ वस्तू आयात कराव्या लागतात. उदाहरणार्थ, कारच्या उत्पादनासाठी पोलादाची आयात करावी लागते. यामध्ये पोलाद ही मध्यस्थ वस्तू आहे. अशा स्वरूपाच्या अनेक मध्यस्थ वस्तू आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वापरल्या जातात. अशा मध्यस्थ वस्तूंच्या आयातीवर जकात आकारल्यास अंतिम वस्तूच्या किंमतींमध्ये किती टक्के वाढतात त्यावरून प्रभावी संरक्षण दराची कल्पाना येण्यास मदत होत.

समजा 'य' या वस्तूची देशी 'म' = बाजारपेठेतील किंमत रू.५०० आहे व ती उत्पादित करण्यासाठी रू.४०० च्या मध्यस्थ वस्तू आयात कराव्या लागतात. म्हणजेच देशात या वस्तू संदर्भात वर्धित मुल्य (रू.५०० - रू.४००) = रू. १०० आहे. सरकारने देशी उद्योगांना संरक्षण देण्यासाठी आयात होणाऱ्या मध्यस्थ वस्तूंवर २०% जकात आकारणी केल्यास 'य' वस्तूची बाजारातील किंमत देखील वाढेल व ती (पूर्वीची किंमत रू.५०० + जकात रू. १००) रू. ६०० होईल. या उदाहरणामध्ये २०% आयात जकात वाढीचा परिणाम म्हणून वर्धित मुल्यामध्ये १००% टक्के वाढ (प्रशुल्कासह किंमत रू. ६०० आयात वस्तूंचे मुल्य रू.४०० = रू.२००) होत असल्याने य वस्तूंच्या उत्पादकांना १००% प्रभावी सरंक्षण दर मिळतो.

### ❑ प्रभावी संरक्षण दरावर परिणाम करणारे घटक :-

१. अंतिम वस्तूवरील नामित प्रशुल्क दर.

२. आयात केलेल्या निविष्टिवरील नामित प्रशुल्क दर.

३. जकाती अभावी अंतिम वस्तूच्या एकूण मूल्यातील वस्तूंच्या मूल्यातील प्रमाण.

## ३.२.३ जकातेत्तर अडथळे - कोटा - विदेशी चलन नियंत्रण - मुल्यभेद किंवा डंपिग - राज्य व्यापार - निर्यात अनुदान - वस्तू करार - आंतरराष्ट्रीय कार्टेल

### ❑ जकातेत्तर अडथळे (Non- Tariffs Barriers) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तू व सेवांची आयात निर्यात करीत असताना त्यावर जकाती शिवाय जी अन्य बंधने लादली जातात त्यांना जकातेत्तर अडथळे असे म्हणतात.

### १. कोटा (Quota) :-

आंतरराष्ट्रीय धोरणामध्ये सरंक्षणाच्या धोरणाचा भाग म्हणून जकाती बरोबर कोटा पध्दतीचा वापर केला जातो. कोटा हे एक जकातेत्तर सरंक्षणाचे साधन आहे. 'आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तूं किंवा सेवांच्या आयात-निर्यातीचे प्रमाण नगसंख्येमध्ये, पैशामध्ये किंवा एककामध्ये नियंत्रित ठेवण्यासाठी जी परिमाणात्मक बंधने लादली जातात त्यास कोटा असे म्हणतात.' उदा. सन २००१ मध्ये भारत फक्त १०००० कोटी रुपयाच्या अन्नधान्याची आयात करावी, फक्त १००० यंत्रे निर्यात करावीत अशा स्वरुपात बंधने लादली जातात, तेव्हा त्यास कोटा असे म्हणतात. कोट्याचे आयात कोटा आणि निर्यात कोटा असे दोन मुख्य प्रकार केले जातात.

## ☼ आयात कोट्याचे प्रकार :–

**अ) आयात जकात कोटा :** या पध्दतीत एखाद्या वस्तूची एका विशिष्ट मर्यादेपर्यंत आयात करताना त्यावर जकात आकारली जात नाही अथवा ती अगदी नाममात्र आकारली जाते. परंतु त्यापेक्षा जास्त परिमाण आयात केल्यास अतिरिक्त परिमाणावर वाढीव दराने जकात आकारणी केली जाते. आयात जकात आणि आयात कोटा या दोन्हीचे गुण या प्रकारामध्ये दिसून येतात.

**ब) एकमार्गी आयात कोटा :** या पद्धतीत एका विशिष्ट कालावधीसाठी वस्तुंच्या आयातीची महत्तम मर्यादा ही देशातील सरकार निश्चित करत असते. यामध्ये सरकारने अन्य कोणत्याही देशाशी वाटाघाटी केलेल्या नसतात. या पद्धतीत सामान्यत: जवळच्या राष्ट्रातून अधिक आयात करण्याची प्रवृत्ती जास्त दिसून येते. अल्पविकसीत व अल्प निर्यातदार देशांना ही पद्धती हानीकारक ठरते.

**क) द्विमार्गी आयात कोटा :** जेव्हा आयातदार व निर्यातदार देशांध्ये वाटाघाटीद्वारे कोटा निश्चित केला जातो तेव्हा द्विमार्गी आयात कोटा असे म्हणतात. या पध्दतीमध्ये प्रत्येक देशाने दुसऱ्या देशामधून वस्तू किती प्रमाणात आयात करावयाची याचे प्रमाण निश्चित केले जात असल्याने यापद्धतीला द्विमार्गी आयात कोटा असे म्हणतात.

**ड) मिश्र आयात कोटा :** या पद्धतीत देशात उत्पादीत होणाऱ्या वस्तूमध्ये देशातील कच्च्या मालाचे आणि विदेशातील कच्च्या मालाचे प्रमाण किती असावे हे सरकार निश्चित करते आणि त्याला अनुसरूनच विशिष्ट प्रमाणातच कच्च्या मालाच्या आयातीस परवानगी दिली जाते. याचा मुख्य उद्देश स्वदेशातील कच्च्या मालाचा अधिक वापर व्हावा हा असतो.

**इ) आयात परवाना पद्धती :** या पद्धतीत परदेशातून वस्तू किती प्रमाणात आयात करावयाची हे निश्चित करून ज्यांना परदेशातून वस्तू आयात करावयाची आहे त्यांना सरकारकडून आयात परवाना मिळवावा लागतो. परवाना धारकांशिवाय इतरांना त्या वस्तूची आयात करता येत नाही. या पद्धतीमुळे सरकारला आयात केल्या जाणाऱ्या वस्तूचे योग्य प्रकारे नियोजन करता येते.

## २. विदेशी चलन नियंत्रण (Exchange Control) :-

‘काही राष्ट्रे आपल्या व्यवहारतोलातील असमतोल कमी करण्यासाठी आयात कमी व्हावी म्हणून विदेशी चलनाचे नियंत्रण करतात. त्यामधून परकीय चलनाची उपलब्धता मोठ्या प्रमाणात होत नसल्याने आयात कमी होऊन व्यापारतोल व व्यवहारतोलातील असमतोल कमी होण्यास मदत होत. याच उद्देशाने भारतामध्ये १९७३ मध्ये ‘फेरा’ (Foreign Exchange Regulation Act – FERA) कायदा करण्यात आलेला होता.’

### ३. मुल्यभेद किंवा डंपिग (Price Discrimination / Dumping) :-

एखादा देश जेंव्हा आपले उत्पादन स्वदेशातील किंवा देशांतर्गत किंमतीपेक्षा कमी किंमतीला अन्य देशांच्या बाजारपेठेमध्ये विकतो, तेव्हा त्यास डंपिग किंवा अवपुंजन असे म्हणतात. समजा अमेरिका एखादे यंत्र आपल्या देशामध्ये ५०० डॉलरला व भारतामध्ये ४५० डॉलरला विकण्याचे धोरण स्विकारत असेल तर त्यास डंपिग किंवा अवपुंजन असे म्हणतात. देशी उद्योगांचा विकास, रोजगार निर्मिती, परकिय चलन प्राप्ती, अतिरिक्त उत्पादनाची विक्री, व्यापारतोलाची प्रतिकुलता कमी करण्यासाठी डंपिगच्या धोरणाचा स्विकार केला जातो. धोरण देखील जकातेत्तर अडथळ्याचा भाग मानला जातो.

### ४. राज्यव्यापार (State Trading) :-

जेव्हा आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये विशिष्ट वस्तूच्या आयाती निर्यातीबाबत सर्व अधिकार सरकार स्वत: कडे राखून ठेवते तेव्हा त्यास राज्य व्यापार असे म्हणतात. यामध्ये खाजगी व्यापाऱ्यांना वस्तू व सेवांची आयात निर्यात करता येत नसल्याने यास व्यापारातील जकातेत्तर अडथळा असे मानले जाते.

### ५. निर्यात अनुदान (Export Subsidy) :-

'विकसित राष्ट्रांमध्ये निर्यातीसाठी मोठ्या प्रमाणात अनुदान दिले जाते, त्यावस्तू जागतिक बाजारपेठेमध्ये कमी किंमतीला विकणे शक्य होते. अविकसित राष्ट्रांमधील उत्पादन त्यांच्याशी स्पर्धा करु शकत नाही.'

### ६. वस्तू करार (Commodity Agreements) :-

आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये जेव्हा देशांमध्ये विशिष्ट वस्तू व सेवांच्या व्यापाराबाबत करार होतात तेव्हा त्याचा समावेश वस्तू करारामध्ये होतो. यामध्ये देखील मुक्त व्यापार धोरणानुसार व्यापार होत नसल्याने त्यास जकातेत्तर अडथळे मानले जाते. आंतरराष्ट्रीय कोको करार याचे उत्तम उदाहरण आहे.

### ७. आंतरराष्ट्रीय कार्टेल (International Cartels) :-

वस्तू उत्पादकांनी किंमत निश्चीत करणे, पुरवठा मर्यादीत करणे यासारख्या उद्देशाने स्थापन केलेला गट म्हणजे कार्टेल होय. कार्टेल ही सामान्यत: विक्री किंमतीवर नियंत्रण ठेवत असतात. परंतु काही खरेदी केलेल्या वस्तूंच्या किंमती कमी करण्यासाठी व्यवस्थापित केले जातात.

जागतिक व्यापार संघटनेच्या करारामध्ये विकसित तसेच विकसनशील आणि अविकसित राष्ट्रांनी जकात कमी करण्याचे धोरण स्वीकारल्याने, सध्या जकातेत्तर मार्गाच्या सहाय्याने आंतरराष्ट्रीय व्यापार निमंत्रणामध्ये ठेवण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत.

## ३.२.४ सॅम्युअल्सन प्रमेय (Samuelson Theorem) :-

जकात आकारल्याने अर्थव्यवस्थेच्या सर्वसाधारण समतोलावर तसेच अन्य घटकांवर काय परीणाम संभवतात याबाबत स्टॉल्पर - सॅम्युअल्सन यांनी जे विचार मांडले त्यांना स्टॉप्लर - सॅम्युअल्सन प्रमेय असे म्हटले जाते. वस्तूची किंमत वाढली असता त्या वस्तूच्या उत्पादनात अधिक प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांची किंमत वाढते तर अन्य वस्तूंच्या किंमती कमी होत जाते हे विचार स्टॉल्पर - सॅम्युअल्सन प्रमेय म्हणून प्रसिध्द आहेत.

**दोन उत्पादनाचे घटक, दोन वस्तूंचा समावेश असलेल्या प्रतिमानाप्रमाणे एका वस्तूच्या किंमती वाढल्यास त्या वस्तूच्या उत्पादनात अधिक प्रमाणात वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकाची किंमत वाढते त्या उत्पादन घटकाचे वास्तव उत्पन्न वाढते. तसेच त्या वस्तू उत्पादनामध्ये अल्प प्रमाणात वापरलेल्या उत्पादन घटकांची किंमत कमी होत जाते व त्या उत्पादन घटकाचे वास्तव उत्पन्न कमी होते.**

### ❑ आकृतीसह स्पष्टीकरण :-

आकृती क्र. ३.१




आकृतीमध्ये दर्शविल्याप्रमाणे क्ष आणि य वस्तूंचे किंमत गुणोत्तर = १ होईल याप्रमाणे त्यांचे नग विचारात घेतले आहेत. 'कल' ही 'सम' परिव्यय रेषा असून 'य$_१$य$_१$' आणि 'क्ष$_१$क्ष$_१$' हे समउत्पादन वक्र समपरिव्यय रेषेला अनुक्रमे 'र' आणि 'न' बिंदूमध्ये स्पर्श करतात. 'कल' हा वक्र श्रमाची मजूरी/

भांडवलाचे व्याज यामधील गुणोत्तर दर्शविते. या उदाहरणार्थ य ही वस्तू भांडवलप्रधान तर 'क्ष' ही वस्तू श्रमप्रधान आहे.

समजा 'य' वस्तूची किंमत वाढते व 'य' वस्तूचा सरासरी उत्पादन खर्च 'य'च्या सरासरी खर्चापेक्षा जास्त होतो. परिणामी नवीन समतोल र$^{१}$ आणि न$^{१}$ या बिंदूमध्ये प्रस्थापित होतो. त्यामधून मजुरी/व्याज गुणोत्तर कमी होवून दोन्ही उद्योगामध्ये भांडवल/श्रम गुणोत्तर कमी होते. त्यामधून श्रम आणि भांडवलाच्या सीमांत उत्पादकतेचे गुणोत्तर ही कमी होते. जर 'क्ष' ही श्रमप्रधान वस्तू आयात केली जात असेल व त्यावर जकात आकारणी केल्यास 'क्ष' वस्तूची आयात महाग होवून या उत्पादनात वापरल्या जाणाऱ्या उत्पादन घटकांच्या किंमती वाढत जातात व त्यांचे वास्तव उत्पन्नदेखील वाढत जाते. श्रमिक महाग झाल्याने अशा अवस्थेत दोन्ही उद्योगामध्ये भांडवल प्रधान तंत्राचा वापर वाढत जाईल. भांडवलाची वापर वाढल्याने त्याची सीमांत उत्पादकता कमी होते तर श्रमीकांची सीमांत उत्पादकता वाढत जाते.

थोडक्यात श्रमप्रधान वस्तूवर जकात आकारणी केल्याने त्यांची किंमत वाढते व त्यामधून मजूरीचे दरही वाढत गेल्याने भांडवलप्रधान उत्पादन तंत्राचा वापर वाढत जातो तर श्रमप्रधान तंत्र कमी केले जाते. उत्पादन तंत्र भांडवल प्रधान झाल्याने श्रमाची सीमांत उत्पादकता वाढते तर भांडवलाची सीमांत उत्पादकता कमी होते.

## ३.३ सारांश

एका देशातील व्यक्ती आणि संस्थांनी, नफाप्राप्ती किंवा गरजांच्या पूर्ततेच्या हेतूने दुसऱ्या देशातील व्यक्ती आणि संस्थांशी वस्तू व सेवांची केलेली देवाण-घेवाण (खरेदी-विक्री) म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापार होय. अशा या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या अभ्यासाबाबत अनेक विचार विकसित झालेले आहेत. त्यांच्या अभ्यासाबरोबरच व्यापारामध्ये निर्माण होणाऱ्या अडथळ्याचा तसेच हस्तक्षेपांचा अभ्यास अत्यंत महत्वपूर्ण ठरतो. सदर प्रकरणामध्ये आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये कोणकोणते अडथळे निर्माण होतात किंवा निर्माण केले जातात व त्याचे आंतरराष्ट्रीय व्यापाराबरोबरच देशाच्या विकासावर काय प्रतिकूल परिणाम उदभवतात याची चर्चा आपण सदर प्रकरणामध्ये केली आहे.

## ३.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

❑ **अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. १८ व्या शतकामध्ये अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ, रिकार्डो, मील यासारख्या अर्थतज्ज्ञांनी .............. व्यापार धोरणाचा पुरस्कार केला.

*अ) संरक्षण* *ब) खुल्या* *क) बंदिस्त* *ड) यापैकी नाही.*

२. .................. हे अविकसित देशांच्या आर्थिक वाढीचे इंजिन आहे.

*अ) आंतरराष्ट्रीय व्यापार* *क) अवमुल्यन*
*ब) अंतर्गत व्यापार* *ड) विनिमय दर.*

३. संरक्षण विषयक व्यापारी धोरण प्रथम अमेरिकेत अलेक्झांडर हॅमिल्टन यांनी ................ मध्ये मांडले.

*अ) १७८१* *ब) १७८६* *क) १७९१* *ड) १७९६.*

४. विकासाची क्षमता नसणाऱ्या व सर्वोच्च विकास साध्य केलेल्या देशांना संरक्षणाच्या धोरणाची आवश्यकता नाही असे मत ............... यांनी व्यक्त केले.

*अ) ॲडम स्मिथ* *ब) रिकार्डो* *क) फ्रेडरिक लिस्ट* *ड) मार्शल.*

५. देशात संरक्षण धोरणाचा स्वीकार केल्यामुळे देशांतर्गत श्रमविभागणीला चालना मिळते असे मत .............. यांनी व्यक्त केले.

*अ) ॲडम स्मिथ* *ब) जे. बी. से* *क) फ्रेडरिक लिस्ट* *ड) हॅमिल्टन.*

❑ **ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अवपुंजन म्हणजे काय?

२. पर्याप्त जकात दर म्हणजे काय?

३. निर्यात जकात म्हणजे काय?

४. पर्याप्त जकातीच्या मापनाचे सुत्र कोणी मांडले?

५. कोटा म्हणजे काय?

## ३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

❑ **अ) खालीलपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

*१. ब) खुल्या.*

*२. अ) आंतरराष्ट्रीय व्यापार.*

*३. क) १७९१.*

*४. क) फ्रेडरिक लिस्ट.*

*५. ड) हॅमिल्टन.*

- **ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

  १. *एखादी वस्तू स्वदेशी बाजारापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारात कमी किंमतीला विकणे म्हणजे अवपुंजन होय.*

  २. *जकातीच्या ज्या दरापासून देशाला फायदे प्राप्त होतात किंवा देशाच्या कल्याणामध्ये वाढ घडून येते अशा दराला पर्याप्त जकात दर असे म्हणतात.*

  ३. *आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये एखाद्या देशातून दुसऱ्या देशामध्ये वस्तू व सेवांची निर्यात करीत असताना त्यावर जो कर आकारला जातो त्यास निर्यात जकात असे म्हटले जातात.*

  ४. *अर्थतज्ञ किंडलबर्जर.*

  ५. *आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तूं किंवा सेवांच्या आयात-निर्यातीचे प्रमाण नगसंख्येमध्ये, पैशामध्ये किंवा एककामध्ये नियंत्रित ठेवण्यासाठी जी परिमाणात्मक बंधने लादली जातात त्यास कोटा असे म्हणतात.'*

## ३.६ पारिभाषिक शब्द

१. **मुक्त व्यापार धोरण :** आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या ज्या धोरणामध्ये देशी उत्पादन व परदेशी उत्पादन असा भेदभाव न करता त्यास निर्यातीसाठी कोणतीही सवलत दिली जात नसेल, तसेच आयातीवर बंधने लादली जात नसतील तर त्यास मुक्त व्यापाराचे धोरण असे म्हणतात.

२. **संरक्षणाचे धोरण :** स्वदेशी उपभोक्ते व उत्पादकांना आपल्या बाजारातील वस्तूंच्या सापेक्ष किंमत व जागतिक बाजारपेठेतील या वस्तूंच्या सापेक्ष किंमतींमध्ये तफावत निर्माण करणाऱ्या धोरणास संरक्षणाचे धोरण असे म्हणतात.

३. **अवपुंजन :** अवपुंजन म्हणजे वस्तू स्वदेशी बाजारापेक्षा आंतरराष्ट्रीय बाजारात कमी किंमतीला विकणे होय.

४. **जकाती :** आंतरराष्ट्रीय व्यापारमध्ये वस्तू व सेवांची देवाण-घेवाण आयात-निर्यात होत असताना, त्यावर जो कर आकारला जातो त्यास जकाती असे म्हटले जाते.

५. **विशिष्ट जकाती :** जेव्हा आयात-निर्यात व्यापारातील वस्तू किंवा सेवांचे मूल्य विचारात न घेता त्यांचे परिमाण किंवा एककाच्या आधारे कर आकारणी केली जाते, तेव्हा त्यास विशिष्ट जकाती असे म्हणतात.

६. **प्रभावी संरक्षण दर :** मुक्त व्यापार परिस्थितीतील देशाच्या वर्धित मूल्यात होणाऱ्या वाढीची टक्केवारी म्हणजे प्रभावी संरक्षण दर होय.

७. **कोटा :** 'आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये वस्तूं किंवा सेवांच्या आयात-निर्यातीचे प्रमाण नगसंख्येमध्ये, पैशामध्ये किंवा एककामध्ये नियंत्रित ठेवण्यासाठी जी परिमाणात्मक बंधने लादली जातात त्यास कोटा असे म्हणतात.'

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

- ❑ **अ) टिपा लिहा.**

  १. मुल्यभेद किंवा डंपिग.

  २. पर्याप्त जकाती.

  ३. संरक्षण धोरणाच्या विरुध्द मुद्दे.

  ४. विदेशी चलन नियंत्रण.

  ५. जकातीचे परिणाम.

- ❑ **ब) दिर्घोत्तरी प्रश्न.**

  १. जकात म्हणजे काय? आयात जकातीचे परिणाम स्पष्ट करा.

  २. कोटा म्हणजे काय? आयात कोटा पद्धतीचे परिणाम विशद करा.

  ३. संरक्षित व्यापार म्हणजे काय? संरक्षित व्यापाराला अनुकूल मुक्तिवादाची चर्चा करा.

  ४. आंतरराष्ट्रीय व्यापारातील जकातेत्तर अडथळे सविस्तर स्पष्ट करा.

  ५. सॅम्यूअल्सन यांचे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे प्रमेय स्पष्ट करा.

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. **Mathur Reeta :** *"Internationl Economics"* (2002), Sublme Publication Publication, Jaipur

२. **डॉ. गंगाधर कायदे-पाटील :** *''आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांत व धोरण''* (२००७) चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक.

३. **तोडकर बी. डी. :** *“आंतरराष्ट्रीय संबंध”* (२०१२), डायमंड पब्लिकेशन, पुणे, प्रथमावृत्ती.

४. **झामरे जी. एन. :** *“आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र”* (२००९), पिंपळपुरे अॅन्ड कंपनी पब्लिकेशन, नागपूर.

५. **डॉ. एम. एन. शिंदे** आणि **डॉ. अनिल सत्रे :** *“भारतीय अर्थव्यवस्था”* (२०१७), अजित पब्लिकेशन, इस्लामपूर

६. **बापट भ. ग. :** *“आंतरराष्ट्रीय व्यापार सिध्दांत आणि धोरण”* (१९८२), मराठी अर्थशास्त्र परिषद.

❑❑❑

घटक–४

# एकीकरण सिद्धांत

## ( Theory of Balance of Payments and Economics Integration )

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ व्यवहारतोल : अर्थ, संरचना, घटक–व्यवहारतोलातील समतोल आणि असमतोल
- ४.२.२ व्यवहारतोल समायोजन यंत्रणा
  - ४.२.२.१ विनिमय दरातील बदलाद्वारे व्यवहारतोल समायोजन, लवचिकता दृष्टिकोन, मार्शल–लर्नर अटी, J वक्र परिणाम, शोषण दृष्टिकोन
  - ४.२.२.२ धोरण बदलाद्वारे व्यवहारतोल समायोजन : पारंपरिक दृष्टिकोन, मुद्रावादी दृष्टिकोन, संरचनावादी दृष्टिकोन–विदेशी व्यापार गुणक–परिणामासह व परिणामाशिवाय.
- ४.२.३ आर्थिक एकीकरण/सहकार्य : अर्थ, फॉर्मस् (Forms) व लाभ, जकात संघाचा सिद्धांत, प्रादेशिक संघ, सार्क, आशियान, युरोपिय संघ (EU)
- ४.२.४ बहुपक्षीयवाद आणि जागतिक व्यापार संघटना– आंतरराष्ट्रीय नाणेनिधी–अटी उपवाक्य (Conditionality Clause of IME)

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न

४.६ स्वयं–अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास पुढील बाबींची कल्पना येईल.

१. व्यवहारतोलाचा अर्थ, संरचना, घटक तसेच समतोल आणि असमतोल व्यवहारतोल समजून येईल.

२. व्यवहारतोल समायोजन यंत्रणा स्पष्ट करता येईल.

३. आर्थिक एकीकरणाचा अर्थ, स्वरूप (forms) व लाभ स्पष्ट करता येतील.

४. जकात संघ सिद्धांत, प्रादेशिक संघ, सार्क, आशियान, युरोपियन संघ इत्यादी समजून घेता येईल.

५. बहुपक्षीयवाद व जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अटी आदी बाबी स्पष्ट करता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

व्यवहारतोलास आंतरराष्ट्रीय व्यवहारतोल असेही म्हणतात, यास संक्षिप्त रूपाने BOP असे संबोधले जाते. देशाचा व्यवहारतोल म्हणजे देशातील रहिवाशी आणि उर्वरित जगामधील विशिष्ठ कालावधी दरम्यान सर्व आर्थिक व्यवहारांची नोंद आहे. हे व्यवहार व्यक्ती, कंपन्या आणि सरकार करतात. अशा प्रकारे देय शिल्लक देशातील सर्व बाह्य दृश्यमान आणि दृश्यमान व्यवहार समाविष्ठ असतात. काही कारणांमुळे विशेषत: आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थापन क्षेत्रात अभ्यास करणे हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे.

प्रथम, देयकाची शिल्लक देशाच्या चलनाच्या मागणी आणि पुरवठ्याविषयी तपशीलवार माहिती प्रदान करते. उदा. भारत आपल्या निर्यातीपेक्षा जास्त आयात करीत असेल तर याचा अर्थ असा आहे की, देशांतर्गत बाजारपेठेत भारतीय रुपया पुरविल्या जाणाऱ्या विदेशी विनिमय बाजारात मागणी केलेल्या प्रमाणात जास्त असेल. अशाप्रकारे कोणी अनुमान काढू शकतो की, इतर चलनाच्या तुलनेत भारतीय रूपयाचा दबाव असेल. दुसरीकडे जर भारताने आपल्या आयातीपेक्षा अधिक निर्यात केली तर भारताच्या रुपयाचे कौतुक होईल. दुसरे म्हणजे देशाची व्यवहारतोल आकडेवारी उर्वरित जगासाठी व्यवसाय भागीदार म्हणून त्यांच्या संभाव्यतेचे संकेत देवू शकतो. जर एखादा देश मोठ्या प्रमाणात व्यवहारतोलाच्या अडचणीत अडथळा आणत असेल तर ते कदाचित बाह्य जगाकडून आयात वाढविण्यात सक्षम होवू शकणार नाही. त्याऐवजी, देयकांच्या परिस्थितीतील संतुलन सुधारण्यासाठी देशाला आयातीवर निर्बंध घालण्यासाठी आणि भांडवलाचा ओघ वाहताना परावृत्त करण्यासाठी उपाययोजना करण्याचा मोह होवू शकतो. दुसरीकडे शिल्लक व्यवहारतोल असलेला देश आयात वाढविण्याची, विदेशी उद्योजकांना विपणनाची संधी देण्याची आणि परकीय चलन निर्बंध घालण्याची शक्यता कमी असेल.

आंतरराष्ट्रीय आर्थिक स्पर्धेत देशाच्या कामगिरीचे मूल्यांकन करण्यासाठी व्यवहारतोल आकडेवारीचा वापर केला जाऊ शकतो. समजा एखादा देश दरवर्षी तूट घालत आहे. ही व्यापार आकडेवारी देशातील देशांतर्गत उद्योगांमध्ये आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मकतेचा अभाव असल्याचे संकेत देऊ शकेल.

## ४.२ विषय विवेचन (Subject Matter)

घटक तीनमध्ये आपण आंतरराष्ट्रीय व्यापाराचे विविध सिध्दांत अभ्यासले आहेत. प्रारंभी आपण मुक्त व्यापार व संरक्षित व्यापाराचे समर्थन व विरोधी मुद्दे अभ्यासले आहेत. तसेच व्यापारातील अडथळ्यांमध्ये जकात, अर्थ, प्रकार व पर्याप्त जकात याचे विवेचन पाहिले आहे. जकातेतर अडथळ्यांमध्ये कोटा, विनिमय नियंत्रण, मूल्यभेद, अवपुंजन, राज्य व्यापार, अंशदान, वस्तू करार, आंतरराष्ट्रीय व्यापार संघ, संरक्षणाची राजकीय अर्थव्यवस्था आदी बाबींचा अभ्यास केला आहे. याशिवाय घटकाच्या शेवटच्या भागात सामान्य संतुलनांतर्गत जकातीचे परिणाम व सम्युलसनचे प्रमेय अभ्यासलेले आहे.

प्रस्तुत घटकात व्यवहारतोल समतोलाचे सिध्दांत व आर्थिक एकत्रीकरण अभ्यासणार आहोत. व्यवहारतोल अर्थ, संरचना व घटक, व्यवहारातील समतोल व असमतोल, व्यवहारतोल, समायोजन यंत्रणा, याचे दोन भागातील वर्गीकरण आपण अभ्यासणार आहोत. त्याचबरोबर घटकाच्या शेवटच्या भागात आर्थिक एकीकरण किंवा सहकार्य, अर्थ, स्वरूप व फायदे, जकातसंघाचा सिध्दांत विभागीय संघ अभ्यासणार आहोत. बहुपक्षीयवाद आणि जागतिक व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अटी व उपवाक्य ही अभ्यासणार आहोत.

### ४.२.१ व्यवहारतोल अर्थ :-

देशातील रहिवाशांनी केलेल्या सर्व आंतरराष्ट्रीय व्यापार आणि आर्थिक व्यवहारांची नोंद म्हणजे व्यवहारतोल होय. व्यवहारतोलात तीन घटक असतात. ते (१) चालू खाते, (२) वित्तीय खाते, (३) भांडवल खाते आहेत. चालू खाते आंतरराष्ट्रीय व्यापार गुंतवणूकीवरील निव्वळ उत्पन्न आणि दंड देयके मोजतो. वित्तीय खाते मालमत्तांच्या आंतरराष्ट्रीय मालकीच्या बदलांचे वर्णन करते. भांडवली खात्यात इतर कोणत्याही आर्थिक व्यवहारांचा समावेश होता, ज्यामुळे देशाच्या आर्थिक उत्पादनावर परिणाम होत नाही.

### ❑ व्यवहारतोल म्हणजे काय?

देशाच्या व्यवहाराचा तोल आपल्या आयातीसाठी देय देण्यासाठी पुरेसे बचत करतो की नाही ते सांगते. हे देखील दिसून येते की, देश आपल्या विकासासाठी पैसे देण्याइतपत आर्थिक उत्पादन तयार करतो की नाही. व्यवहारतोल हा वार्षिक किंवा तिमाही अहवाल असतो.

देश निर्यातीपेक्षा जास्त वस्तू, सेवा आणि भांडवल आयात करतो, तेव्हा व्यवहारतोल तुटीचा राहतो. अशावेळी आयातीसाठी इतर देशांकडून कर्ज घेणे आवश्यक आहे.

दीर्घ कालावधीत, देश जगातील आर्थिक उत्पादनाचा उत्पादक नव्हे तर निव्वळ ग्राहक बनतो. भविष्यातील वाढीमध्ये गुंतवणूक करण्याऐवजी खर्चाची भरपाई करण्यासाठी कर्जात जावे लागेल.

## ❑ व्याख्या :-

१. **भारतीय रिझर्व्ह बँकेच्या** मते, व्यवहारतोल हे एक सांख्यिकीय विधान हे जे दर्शविते.

   (i) अर्थव्यवस्था आणि उर्वरित जगातील वस्तू, सेवा आणि उत्पन्न यांचे व्यवहार.

   (ii) मालकीचे बदल आणि त्या अर्थव्यवस्थेच्या मौद्रिक सोन्यामधील इतर बदल, विशेष उचल अधिकार (SDR) आणि उर्वरित जगावरील वित्तीय दावे आणि जबाबदाऱ्या.

   (iii) प्रतिसाद न मिळालेल्या बदल्या/स्थलांतर.

२. **वॉल्टर क्रास :** 'एका विशिष्ठ कालावधीत एखाद्या देशातील नागरिकांच्या व उर्वरित जगातील नागरिकांच्या दरम्यान करण्यात आलेल्या संपूर्ण आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवस्थित विवरण म्हणजे व्यवहारतोल होय.'

३. **एल्थवर्थ :** 'एका देशातील रहिवाशी व उर्वरित जगातील रहिवाशी यांच्यात केल्या गेलेल्या सर्व देण्याघेण्याचे लिखित विवरण म्हणजे व्यवहारतोल होय.'

४. **बेनहॅम :** 'एका देशाचा व्यवहारतोल म्हणजे एका विशिष्ठ कालावधीत त्याचा जगाशी झालेल्या मौद्रिक व्यवहारांचा लेखा होय.'

## ❑ व्यवहारतोलात समाविष्ठ होणाऱ्या बाबी :-

व्यवहारतोलाची यथायोग्य कल्पना येण्यासाठी त्यात समाविष्ठ असणाऱ्या प्रमुख बाबींची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

१. दृश्य आयात व निर्यात.

२. **सेवांची आयात व निर्यात :** यामध्ये प्रवासी खर्च, विद्यार्थ्यांवर होणारा खर्च, जहाजाचे भाडे व जहाजाची सेवा आणि दुरुस्ती, त्याचबरोबर विदेशी गुंतवणूकीवरील नफा, आंतरराष्ट्रीय देणग्या, सरकारी व्यवहार, विम्याचे व्यवहार आदी बाबींचा समावेश होतो.

३. व्याज व लाभांश (विदेशातील गुंतवणूकीवरील)

४. विदेशात करावा लागणारा खर्च.

५. दीर्घकालीन गुंतवणूक व अल्पकालीन गुंतवणूक.

६. सुवर्णाची आयात व निर्यात.

७. मुद्रेचे आगमन-निर्गमन.

## ❑ व्यवहारतोलाची संरचना (Structure) :-

देशातील रहिवाशी आणि उर्वरित जगामध्ये होणारे आर्थिक व्यवहार नोंद केले जातात. ही रक्कम उर्वरित रकमेच्या निवेदनात नोंदविली गेली आहे. व्यवहारतोलात महामंडळे, व्यक्ती आणि सरकारकडून केले सर्व व्यवहार समाविष्ट आहेत. अशा प्रकारे हे देशाच्या विकासासाठीच्या निधीवर देखरेख ठेवण्यास मदत करते. म्हणून जेव्हा व्यवहारतोलामध्ये सर्व घटक जोडले जातात, तेव्हा ते मूलतः शून्यपर्यंतचे असावे.

व्यवहारतोल रचनेचा आधार घेणारे तीन मुख्य घटक आहेत.

### १. चालू खाते (Current Account) :-

चालू खाते वस्तू आणि सेवांच्या आत आणि बाहेर जाण्यासाठी देखरेखीसाठी उपयुक्त आहे. अशा प्रकारे या खात्यात उत्पादित वस्तू आणि कच्चा मालाच्या संदर्भात केलेली सर्व देयके आणि पावत्या समाविष्ट आहेत. शिवाय, यात पर्यटन, अभियांत्रिकी, व्यवसाय सेवा, वाहतूक इत्यादीच्या पावत्या देखील समाविष्ट आहेत.

देशांमध्ये होणाऱ्या व्यापाराच्या अनेक श्रेण्या आहेत. हे व्यवहार दृश्यमान किंवा अदृश्य असू शकतात. तेव्हा देशांमधील वस्तूंमध्ये व्यापार होतात तेव्हा त्यास दृश्यमान वस्तू म्हणतात. सेवांच्या आयात किंवा निर्यातीत होत असलेला व्यापार, अदृश्य वस्तू म्हणून संदर्भित आहे.

### २. भांडवली खाते (Capital Account) :-

देशांमधील भांडवली व्यवहारांचे भांडवली खात्याअंतर्गत परीक्षण केले जाते. अशा प्रकारे भांडवलाच्या व्यवहारात मालमत्तासारख्या संपत्तीची विक्री आणि खरेदी समाविष्ट असते. यापुढे भांडवली खात्यात करांचा प्रवाह, देशात किंवा बाहेर स्थलांतरित होण्यासाठी स्थिर मालमत्तेची खरेदी आणि विक्री इत्यादीचा समावेश होतो. भांडवली खात्यातील तीन प्रमुख घटक म्हणजे गुंतवणूक, परकीय चलनसाठा आणि कर्ज होत.

## ३. वित्तीय खाते (Financial Account) :-

रिअल इस्टेट, एफ.डी.आय., व्यवसाय उद्योग इत्यादींतील विदेशी गुंतवणूकीद्वारे विदेशात जाणाऱ्या व विदेशातून येणाऱ्या पैशाच्या निधीचे परीक्षण वित्तीय खात्यातून केले जाते. तसेच हे खाते परकीय मालकीच्या भिन्नतेचे मोजमाप करते. जेव्हा आपण याचे विश्लेषण करता तेव्हा आपण समजू शकतो की, एखादा देश अधिक विक्री करतो की खरेदी अधिक करतो. उदा. समजा भारतातून निर्यात केलेल्या वस्तूंचे मूल्य ९० कोटी रुपये आहे. तर भारतात आयात केलेल्या वस्तूंचे मूल्य ७० कोटी रुपये आहे. अशा प्रकारे असे म्हटले जाऊ शकते की, भारताकडे २० कोटी रुपयांचे व्यापार अधिशेष आहे.

## ४. एकपक्षीय व्यवहार (Unilateral Transactions) :-

एक पक्षीय व्यवहारात किंवा स्थानांतरणात ज्याची मूल्यफेड आयात करणारा देश करत नाही. अशा निर्यातीचा समावेश होतो. याची नोंद ही व्यवहारतोलाच्या जमा बाजूला करतात.

## ५. सुवर्ण :–

आंतरराष्ट्रीय व्यवहारात सोने यास वैशिष्ट्यपूर्ण स्थान असल्यामुळे त्याची नोंद स्वतंत्रपणे करण्यात येते. विविध देशांमध्ये सोन्याच्या किंमती वेगवेगळ्या असताना सोन्याची हालचाल सुरू होते. याचा देशाच्या पैशाच्या पुरवठ्यावर परिणाम होतो. देशांतर्गत चलन पुरवठ्यावरही सोन्याच्या हालचालीचा प्रभाव पडतो.

## ६. चूक आणि भूल (Errors and Omission) :-

व्यापारी वस्तू व सोने आयात निर्यातीची आकडेवारी सीमा शुल्क विभागाकडून अनेक बिनचूकपणे प्राप्त होते. परंतु इतर बाबींची विश्वासनीय आकडेवारी प्राप्त होत नाही. यामुळे व्यवहारतोलाच्या दोन्ही बाजू समान असण्याची शक्यता कमी असते. चूक व भूल या शिर्षकाखाली काही रकमा दाखविल्यामुळे व्यवहारतोलात दोन्ही बाजू समान होत असल्यातरी व्यवहारतोलाचे मूलभूत संतुलन त्यावर अवलंबून नसते हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

देशाच्या व्यापारातील शिल्लक किंवा तूट ओळखण्यासाठी व्यवहारतोल आर्थिक निर्देशक म्हणून मदत करतो. व्यवहारतोलात असे बरेच घटक आहेत जे कोणते क्षेत्र आर्थिकदृष्ट्या चांगले काम करीत आहेत हे स्पष्ट संकेत देते.

## ❑ व्यवहारतोलातील समतोल आणि असमतोल (Equilibrium and Disequilibrium in Balance of Payments) :-

व्यवहारतोलातील असमतोलाचे विश्लेषण करण्यापूर्वी व्यवहारतोल समतोल कसा असतो हे स्पष्ट करणे आवश्यक आहे. संतुलन किंवा समतोलपणा म्हणजे निरंतर आधारावर कठोर बेरोजगारीशिवाय मुक्त अर्थव्यवस्था टिकवणे शक्य होते.

या व्याख्येवरून आपणास असे दिसून येते की, (१) संबंधित कालावधी, (२) अर्थव्यवस्थेचा खुला भाग (म्हणजे आयातीवर कोणतेही अयोग्य निर्बंध), (३) बेरोजगारी नसणे, (४) समतोलाचा निरंतर आधार.

कालावधी साधारणपणे एक वर्ष असतो. अशा प्रकारे निर्यात आणि आयात यांच्यात हंगामी असमानता ही असमतोलाचे लक्षण नाही. जेव्हा एखाद्या देशाचा व्यवहारतोल संतुलित असतो, तेव्हा देशी चलनाची मागणी त्याच्या पुरवठ्याइतकीच असते. मागणी आणि पुरवठ्याची परिस्थिती अशाप्रकारे अनुकूलही नसते आणि प्रतिकूलही नसते. व्यवहारतोल समतोल जर एखाद्या देशाविरुध्द चालत असेल तर वस्तू सेवा किंवा निर्यातीच्या इतर प्रकारच्या निर्यातीला प्रोत्साहन देऊन किंवा सर्व प्रकारच्या आयातीला परावृत्त करून समायोजन केले जाणे आवश्यक आहे. कोणत्याही देशामध्ये कायमस्वरूपी प्रतिकूल रकमेची शिल्लक असू शकत नाही, परंतु हे काही देशामध्ये सामान्य आहे. कायमस्वरूपी व्यापार अनुकूल नसणे. एकूण जबाबदाऱ्या आणि राष्ट्राच्या एकूण मालमत्तामध्ये व्यक्तींनी दीर्घकाळ संतुलन राखले पाहिजे.

जेव्हा आपण परकीय चलन आणि ज्या स्रोतांकडून येणाऱ्या सर्व स्रोतांची मागणी जोडतो, तेव्हा या दोन प्रमाणात अपरिहार्यपणे समान असतात आणि अशा प्रकारे व्यवहारतोल एकूणच खाते आवश्यक प्रमाणात शिल्लक असते किंवा नेहमीच समतोल असणे आवश्यक असते.

जेव्हा आपण एखाद्या देशाचा व्यवहारतोल समतोल किंवा असमतोल आहे असे म्हणतो तेव्हा खात्यातील शिल्लक संदर्भित करतो ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून कर्ज घेणे, विशेष उचल अधिकार (SDR) वापरणे किंवा काढणे यासारख्या बाबींचा समावेश होतो. मध्यवर्ती बँकेकडे असलेल्या परकीय चलनसाठाचा वापर केला जातो.

या राहणाऱ्या वस्तू वगळता एकूण व्यवहारतोलामध्ये कोणतीही तूट किंवा अधिशेष नसतो तर तो समतोल असल्याचे म्हटले जाते. जेव्हा या अर्थाने तूट किंवा अधिशेष असेल तर व्यवहारतोल असमतोलात आहे असे म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून काढलेली रक्कम, विशेष उचल अधिकाराचा वापर, परकीय चलनांच्या साठ्यातील उचल किंवा रेखांकन (drowing) आणि विदेशातून मिळालेले कर्ज व मुदत यांच्याद्वारे व्यवहारतोलातील तुटीची भरपाई केली जाऊ शकते. उदाहरणार्थ

२००१-०२ मध्ये भारताने स्वत:च्या परकीय चलन साठ्यात ११७५७ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सची भर घातली. परंतु मागील अनेक वर्षापासून चालू खात्यावर भारताची देय रक्कम शिल्लक होती. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी देय रक्कम शिल्लक होती. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडून किंवा इतर देशांकडून घेतलेल्या तूट वित्तपुरवठा करण्यासाठी किंवा परदेशातून व्यावसायिक कर्ज घेण्याचाही हेतू आहे. परंतु सन २००१-२००२ या वर्षातील भारताची देय रक्कम शिल्लक होती.

एकूण येणी एकूण देणी पेक्षा जास्त असतात तेव्हा व्यवहारतोल शिल्लकीचा असतो त्यास अनुकूल व्यवहारतोल असे मानले जाते. याउलट जेव्हा एखाद्या देशाला परदेशी देणी अधिक द्यावी लागतात व येणी कमी राहतात, तेव्हा त्याच्या देय रकमेची तूट आहे, त्यास 'प्रतिकूल व्यापारतोल' असे म्हणतात. प्रतिकात्मकपणे (देयके शिल्लक) व्यवहारतोल खालील प्रमाणे परिभाषित केले जाऊ शकतात.

$$B = R - P$$

येथे B = व्यवहारतोल.

R = परदेशीयांकडून येणे.

T = परदेशी लोकांना दिलेली देयके.

अशाप्रकारे जेव्हा व्यवहारतोल शून्य असेल तेव्हा व्यवहारतोल समतोलात असतो. एखाद्या देशाचा व्यवहारतोल समतोलात आहे असे तेव्हाच म्हटले जाते की, जेव्हा त्या देशाची विदेशी देणी आणि विदेशी येणी यामध्ये समतोल साधला जातो.

समतोल व्यवहारतोल असणाऱ्या देशाला सहसा 'बाह्य शिल्लक' (External Balance) देश असे म्हणतात. तथापि, जेव्हा इतर जगाकडून एकूण येणी उर्वरित जगाच्या एकूण देयतेपेक्षा जास्त असते, तेव्हा त्या देशाला व्यवहारतोल अनुकूल किंवा शिल्लकीचा आहे असे म्हणतात. प्रतिकात्मकपणे _B_ जेव्हा धनात्मक असतो तेव्हा त्याला अनुकूल व्यवहारतोल असे म्हणतात. दूसरीकडे जर देशाच्या परदेशीयांकडून असणाऱ्या येणी परकियांना देय असणाऱ्या देणीपेक्षा कमी राहतात, तेव्हा व्यवहारतोल प्रतिकूल किंवा अनुकूल होतो. ज्या देशाचा व्यवहारतोल शिल्लकीचा असतो, त्या देशास शिल्लकीचा देश म्हणून संबोधले जाते. त्याचप्रमाणे जेव्हा त्याची देयके तुटीची असतात किंवा विरोधी असतात तेव्हा त्यास तुटीचा देश असे संबोधितात. एखाद्या देशाची विदेशाकडून येणी आणि विदेशाला देणी समान होतात तेव्हा समतोल व्यवहारतोल म्हणतात. तथापि, विदेशी देणी आणि विदेशी येणी जेव्हा समान नसतात. तेव्हा व्यवहारतोल असमतोल राहतो.

## ❑ व्यवहारतोल निर्माण होणाऱ्या असमतोलाचे प्रकार :-

व्यवहारतोलात विविध कारणांनी असमतोल निर्माण होत असल्यामुळे जेवढी कारणे असतात,

तेवढे असमतोलाचे प्रकार असतात. प्रा. किंडलबर्जर यांनी व्यवहारतोलातील असमतोलाचे किंवा असंतुलनाचे पुढील प्रकार सांगितले आहेत.

१. चक्रीय असमतोल (Cyclical Disequilibrium)

२. प्रदीर्घकालीन असमतोल (Secular Disequilibrium)

३. संरचनात्मक असमतोल (Structural Disequilibrium)

४. तात्पुरता असमतोल (Temporary Disequilibrium)

५. मुलभूत असमतोल.

## १. चक्रीय असमतोल (Cyclical Disequilibrium) :-

तेजीमंदीच्या व्यापारचक्रामुळे निर्माण होणाऱ्या असंतुलनाला चक्रीय असमतोल म्हणतात. आलटून-पालटून येणाऱ्या तेजी-मंदीमुळे अर्थव्यवस्था एका असमतोलाकडून दुसऱ्या असमतोलाकडे गेलेली दिसून येते. व्यापार चक्रांमुळे चक्रीय असमतोल निर्माण होत असले तरी निरनिराळ्या देशांमध्ये व्यापारचक्राची संरचना भिन्न मार्गावरील असल्यामुळे चक्रीय असमतोल निर्माण होते.

(i) व्यापारचक्र भिन्न देशांमधील भिन्न मार्ग आणि नमुन्याचे अनुकरण करते.

(ii) भिन्न राष्ट्रांमध्ये व्यापारचक्राच्या घटनेची समान वेळ आणि नियतकालिकता नाही.

(iii) कोणतेही समान स्थिरीकरण कार्यक्रम आणि उपाय भिन्न राज्यांनी स्वीकारले नाहीत.

(iv) निरनिराळ्या देशांमध्ये आयात करण्याची मागणीची उत्पन्न लवचिकता एकसारखी नसते.

(v) आयातीच्या मागणीची किंमत लवचिकता वेगवेगळ्या राष्ट्रांमध्ये भिन्न आहे. कमतरता आणि अधिशेष वैकल्पिकरित्या एका व्यापारचक्राच्या मंदी आणि तेजी टप्प्यात होते.

## २. प्रदीर्घकालीन असमतोल (Secular Disequilibrium) :-

अर्थव्यवस्थेत काही बदल हे संथगतीने व दीर्घकाळ होत असतात. अर्थव्यवस्था ही विकासाच्या एका टप्प्यातून दुसऱ्या टप्प्यात जात असताना होणाऱ्या बदलांचा व्यवहारतोलावर परिणाम होतो. यामुळे असमतोल निर्माण होतो, ते प्रदीर्घकालीन असमतोल होय. प्रदीर्घकालीन असमतोल ही व्यवहार तोलातील दीर्घकालीन घटना असते. जी दीर्घकाळापासून हळूहळू अर्थव्यवस्थेत घडून येणाऱ्या सखोल गतिशील बदलांमुळे होते. भांडवल निर्मिती, लोकसंख्या वाढ, तांत्रिक बदल, बाजारपेठांची वाढ, संसाधनामधील बदल इत्यादी अनेक गतिशील शक्तीमध्ये किंवा घटकांमधील बदलांमुळे हे निर्माण होते. उदा. एखाद्या नव्या विकसनशील देशाला आतापर्यंत निर्यातीपेक्षा जास्त गुंतवणूकीची आवश्यकता आहे. ही देशांतर्गत

बचत आहे. पुरेसे परकीय भांडवल येत नसल्यास त्यांच्या व्यवहारतोलामध्ये प्रदीर्घकालीन तूट येऊ शकते. उलटपक्षी, परिपक्व अर्थव्यवस्थेमध्ये अतिरिक्त भांडवल आणि अनुकूल संतुलन असू शकते. भांडवलाचा बहिर्गमन (Outflow) पुरेसा किंवा मर्यादित असल्यास व्यवहारतोलातील प्रदीर्घकालीन शिल्लक (Surplus) देशाला मिळू शकेल.

प्रदीर्घकालीन असमतोल दुरुस्त करण्याकरिता मौद्रिक व वित्तीय धोरणात योग्य बदल घडवून आणणे, विनिमय दराचा मूल्यऱ्हास करणे, कर्ज घेण्यावरील व कर्ज देण्यावरील दरात बदल करणे, बचत व गुंतवणूकीत समन्वय स्थापन करणे इत्यादी उपाययोजना करण्यात येतात.

### ३. संरचनात्मक असमतोल (Structural Disequilibrium) :-

संरचनात्मक असमतोल हा देशांतर्गत किंवा परदेशी अर्थव्यवस्थांच्या काही क्षेत्रांमध्ये उद्‌भवणाऱ्या रचनात्मक बदलामुळे निर्माण होतो. ज्यामुळे निर्यात किंवा आयात किंवा दोन्ही वस्तूंच्या पुरवठ्याच्या परिस्थितीत मागणी बदलू शकते. निर्यातीच्या विदेशी मागणीतील बदल हा तंत्रज्ञान बदल व स्वस्त पर्यायाच्या शोधामुळे निर्माण होवू शकतो. तसेच, संप किंवा इतर राजकीय प्रसंग, नैसर्गिक आपत्ती इत्यादीमुळे उत्पादनाच्या विखुरलेल्या अवस्थेतून पुरवठ्यात बदल होवू शकतो. आर्थिक परिस्थितीत बदल झाल्यामुळे किंवा इतर राष्ट्रांच्या आर्थिक धोरणामुळे परदेशातूनही मिळणारे उत्पन्न कमी होऊ शकते. आंतरराष्ट्रीय भांडवलाच्या हालचालीच्या दरात बदल केल्याने संरचनात्मक बदल देखील केले जातात. जेव्हा एखाद्या देशाच्या घटकांच्या किंमतीमध्ये असमानतेने घट होते, तेव्हा घटक स्तरावर संरचनात्मक असमतोल निर्माण होतो. थोडक्यात संरचनात्मक असमतोल दोन प्रकारे घडून येतो. एक वस्तू पातळीवरील संरचनात्मक असमतोल आणि दुसरे घटक पातळीवरील संरचनात्मक असमतोल.

व्यवहारतोलातील संरचनात्मक असमतोल (तूट) भरून काढण्यासाठी उत्पादन वाढवून निर्यातीपासून मिळणारे उत्पन्न वाढविणे व आयात शक्य त्या प्रमाणात कमी करून खर्चात काटकसर करणे, निर्यात वाढ करणे हे देशाच्या हातात नसते, परंतु आयात वस्तूंना पर्यायी वस्तू स्वदेशात निर्माण करून आयातीतल घट करता येते.

### ४. तात्पुरता/अस्थायी असमतोल (Temporary Disequilibrium) :-

जेव्हा भूकंप, महापूर, दुष्काळ, अतिवृष्टी इत्यादीमुळे अल्पकाळाकरिता काही वस्तूंचा तुटवडा पडल्यास त्यांची इतर देशांमधून त्वरित आयात करावी लागते. आयातीत वाढ होते पण निर्यातीत वाढ होत नाही, त्यामुळे व्यवहारतोलात तूट निर्माण होते. असमतोल निर्माण होतो. अशा असमतोलास अल्पकालीन किंवा तात्पुरता असमतोल म्हणतात.

### ५. मुलभूत किंवा दीर्घकालीन असमतोल :-

मूलभूत किंवा दीर्घकालीन असमतोल म्हणजे एखाद्या देशाच्या व्यवहारतोलात एक खोलवर रूजलेली सततची तूट किंवा शिल्लक होय. कालक्रमानुसार निर्माण झालेल्या अल्प मुदतीतील असमतोल तूट किंवा शिल्लक यामुळे दीर्घकालीन असमतोल निर्माण होतो. यामुळे संबंधित देशाची विनिमय स्थिरता धोक्यात येते. विशेषत: देशाच्या व्यवहारतोलातील शिल्लक रकमेची दीर्घपटीची तूट, त्याचे परकीय चलन साठा संपवते आणि अशी निरंतर तूट लक्षात घेता देश-विदेश लोकांकडून आणखी कर्ज घेण्यास असमर्थ ठरू शकतो.

## ४.२.२ व्यवहारतोल समायोजन यंत्रणा (Balance of Payment Adjustment Mechanisms) :-

व्यवहार तोलात शिल्लक अधिक असल्यास फारसा त्रास होत नाही. तथापि, प्रत्येक देशाने व्यवहारतोलातील तूट काढून टाकण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रयत्न केला आहे. तेथे व्यवहारतोल समतोलासाठी अनेक समायोजने केली जातात. जी व्यवहारतोलातील असमतोल दुरुस्त करण्यासाठी वापरली जातात. व्यवहारतोल समायोजन यंत्रणामध्ये दोन पध्दती वापरल्या जातात.

## ४.२.२.१ विनिमय दरातील बदलाद्वारे व्यवहारतोल समायोजन :-

जेव्हा व्यवहारतोलात परकीय मालमत्तेची खरेदी किंवा देशांतर्गत वस्तूंच्या विक्रीची नोंदणी केली जाते तेव्हा हे सुचविते की परकीय चलनाच्या मागणीत किंवा पुरवठ्यात बदलहोता. जोपर्यंत व्यवहाराचा एक पक्ष त्याच्या देशी चलनासाठी विदेशी चलनाची देवाण-घेवाण करण्यास तयार नाही तोपर्यंत आतंरराष्ट्रीय व्यवहार पूर्ण केला जाऊ शकत नाही. म्हणूनच व्यवहारतोलाच्या कोणत्याही घटकातील बदलांचा परकीय चलन पुरवठा आणि मागणीवर परिणाम होतो.

विदेशी चलनाचा पुरवठा करण्यास आणि मागणीला समतोल बनविण्याची परवानगी देणारे मुख्य बदल म्हणजे विनिमय दर होय. विनिमय दर हा विदेशी चलनाची सापेक्ष किंमत म्हणून परिभाषित केले जाते. म्हणून जर एखादा देशांतर्गत रहिवाशी विदेशी चलन खरेदी करू इच्छित असेल तर विनिमय दर विदेशी चलनाच्या प्रत्येक युनिटची किंमत सांगतो. औपचारिकपणे विनिमय दराद्वारे देशांतर्गत चलनाच्या संदर्भात परकीय चलनाच्या एका युनिटची किंमत परिभाषित केली जाते. उदा. भारताचा रुपया हे चलन आहे त्यांचा अमेरिकन डॉलरच्या संदर्भातील विनिमय दर E = Rs./$ (Rs. 65 = $ 1)

आता आपण भारताच्या दृष्टिकोनातून विनिमय दराचा विचार करू. जर एखादा भारतीय व्यक्ती सुट्टीसाठी US मध्ये जाण्याचे नियोजन करावयाचे असेल आणि तेथे भाड्याने घेतलेल्या कारची रुपयात

किंमत शोधू इच्छित असेल तर त्याला फक्त अमेरिकन डॉलरला विनिमय दराने गुणावे लागेल. त्यामुळे त्यास अमेरिकेतील कारचे भाडे रुपयांमध्ये समजू शकेल.

आपण ही कल्पना जरा पुढे घेऊन आपल्या आयातीच्या रुपयांचे मूल्य, आयात विनिमय दराला (E) आयात वस्तूंच्या संख्येने गुणून मिळवू शकतो. म्हणून विदेशी आयातीच्या किंमतीला विनिमय दराने गुणले असता सर्व आयात वस्तूचे एकूण मूल्ये देशांतर्गत चलनात सांगता येते. विनिमय दरामधील बदलांची त्याची स्वत:ची शब्दावली (Terminology) आहे. जर भारतीय रु./अमरिकन $ दर (1$ = 65 रु.) पर्यंत वाढला तर भारतीयांना अमेरिकन $ साठी अधिक/जादा रुपये द्यावे लागतील. अशावेळी अर्थशास्त्रज्ञ अमेरिकन डॉलरच्या तुलनेत रुपयाची घसरण झाले असे सांगतात. घसरण झाल्यास विनिमय दर कमी होते, असा विचार करणे एक सामान्य चूक आहे. रुपयखाली घसरल्याने विनिमय दर प्रत्यक्षात वाढतो. कारण विनिमय दर परकीय चलनाची किंमत आहे आणि रुपयाची किंमत कमी झाल्यामुळे ही किंमत वाढते.

आपण हे देखील लक्षात घेतले पाहिजे की, विनिमय दर हे सापेक्ष किंमती आहेत, जर एखाद्याला एक डॉलर (रुपयाची घसरण) खरेदी करण्यासाठी अधिक रुपयांची आवश्यकता असेल तर ते खरेदी करण्यासाठी आपणाला कमी डॉलर आवश्यक आहेत असे म्हणण्यासारखे आहे.

## ❑ व्यवहारतोल समायोजनासाठी लवचिकता दृष्टिकोन यंत्रणा (Mechanism of Elasticity Approach to Balance of Payment Adjustment) :-

व्यवहारतोल समायोजनासाठीचा लवचिकता दृष्टिकोन मार्शल व लर्नर यांच्या नावाशी संबंधित आहे. या दोन अर्थशास्त्रज्ञांनी ही अट स्वतंत्रपणे मांडली आहे. ज्या परिस्थितीत विनिमय दरात बदल होतो. त्या देशाच्या चलनाचे अवमूल्यन करून व्यवहारतोलामध्ये समतोल पुर्नप्रस्थापित केला जातो. हा दृष्टिकोन अवमूल्यनाच्या किंमत परिणामाशी संबंधित आहे.

## ❑ गृहीतके (Assumptions) :-

हे विश्लेषण पुढील गृहीतकांवर आधारित आहे.

(i) निर्यातीचा पुरवठा पूर्णपणे लवचिक आहे.

(ii) उत्पादनाच्या किंमती देशांतर्गत चलनात निश्चित केल्या जातात.

(iii) अवमूल्यन झालेल्या देशात उत्पन्नाची पातळी निश्चित केली जाते.

(iv) आयातीचा पुरवठा मोठा आहे.

(v) आयात आणि निर्यातीच्या मागणीची किंमत लवचिकता चाप (Arc) ची लवकिचता आहे.

(vi) किंमत लवचिकता निरपेक्ष मूल्यांचा संदर्भ देते.

(vii)देशाची चालू खात्यावरील शिल्लक ही त्याची व्यापार शिल्लक असते.

## ❑ सिध्दांताचे स्पष्टीकरण :-

व्यवहारतोल समायोजनाच्या लवचिकता दृष्टिकोनानुसार जेव्हा एखादा देश आपल्या चलनाचे अवमूल्यन करतो, तेव्हा त्याच्या आयातीची देशांतर्गत किंमत वाढविली जाते आणि देशातून होणाऱ्या निर्यातीच्या किंमती कमी केल्या जातात. अशा प्रकारे अवमूल्यन एखाद्या देशाच्या निर्यातीत वाढ करून आणि आयात कमी करून व्यवहारतोल तूट सुधारण्यास मदत करते.

परंतु देशाच्या आयातीसाठीची देशांतर्गत मागणीची किंमत लवचिकता आणि निर्यातीसाठीची विदेशी मागणीची किंमत लवचिकता यावर व्यवहारतोल समायोजनाचे यश अवलंबून असते.

डॉ. मार्शल व ए.पी. लर्नर यांच्या मते, 'जर देशाची निर्यात व होणारी आयात यांच्या मागणीच्या लवचिकतेची बेरीज एकापेक्षा अधिक (More than Unity) असेल तर, स्वदेशी चलनाच्या अवमूल्यनाचा व्यवहारतोलावर अनुकूल परिणाम होतो; याउलट विनिमय दराच्या उर्ध्वमूल्यनाचा व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम होतो.'

आयात आणि निर्यात मागणीची लवचिकतेची बेरीज जर एकापेक्षा कमी असेल तर अवमूल्यनाचा व्यवहारतोलावर प्रतिकूल परिणाम होतो. अशावेळी देशातील व विदेशातील पुरवठ्याची लवचिकता ही बरीच जास्त असते व अवमूल्यन करण्यापूर्वी देशातील आयातीचे मूल्य व निर्यातीचे मूल्य परस्परांशी समान आहेत.

औपचारिकरित्या मार्शल व लर्नरची अट असे स्पष्ट करते की, चलन अवमूल्यनाचा व्यवहारतोलावर सकारात्मक परिणाम होण्यासाठी निर्यात व आयातीच्या किंमत लवचिकतांची बेरीज एकापेक्षा जास्त असणे आवश्यक आहे. व्यापारतोलावरील निव्वळ परिणाम किंमत लवचिकतांवर अवलंबून असतो. जर निर्यात केलेल्या वस्तू किंमतीच्या बाबतीत लवचिक असतील तर त्याची मागणी किंमतीतील बदलापेक्षा कमी प्रमाणात वाढते आणि एकूण निर्यात उत्पन्न वाढेल. तसेच जर आयात केलेल्या वस्तूंच्या किंमती लवचिक असेल तर आयातीचा एकूण खर्च घटेल. दोन्ही व्यापार समतोल सुधारतील.

डॉ. मार्शल व लर्नर यांना अनुभवरित्या असे आढळले आहे की, अल्पावधीत वस्तूंच्या अलवचिक व्यापार असतो, कारण अल्पकाळ उपभोग आकृतीबंध बदलण्यास आणि व्यापार करार करण्यास वेळ लागतो. अशाप्रकारे, मार्शल लर्नरची अट पूर्ण होत नाही आणि अवमूल्यन झाल्यास सुरुवातीला व्यापार संतुलन बिघडू शकते. दीर्घकालावधीत ग्राहक नवीन किंमतीमध्ये समायोजित होतील आणि व्यापार संतुलन सुधारेल. या प्रभावाला जे वक्र प्रभाव (I Curve Effect) असे म्हणतात.

उदा. समजा एखादा देश तेलाची निव्वळ आयात करणारा आणि जहाजाचे निव्वळ उत्पादक आहे. सुरूवातीला अवमूल्यन झाल्यामुळे लगेचच तेलाची किंमत वाढते आणि अल्पावधीत वापराचे प्रमाण समान राहिल्याने आयात होण्यावर वाढीव रक्कम खर्च केली जाते आणि त्यामुळे आयातीवरील तूट आणखी वाढते. दरम्यान, जहाज बांधकामाच्या विक्री विभागाला कमी किंमतीचे साहस करण्यास आणि नवीन करार सुरक्षित करण्यास थोडा कालावधी लागतो. पूर्वीच्या कराराच्या मान्यतेमुळे मिळालेला, निधी आता चलनाच्या अवमूल्यनामुळे कमी होतो, त्वरित उपलब्ध होतो आणि निर्यातीची तूट पुन्हा वाढत जाते.

## ❑ J वक्र परिणाम (J-Curve Effect) :-

विनिमय दरातील घसरणीमुळे अल्पकाळ, चालू खाते बिघडू शकते. (कारणे मागणी स्थिर नसते) हे J वक्र परिणामाच्या सहाय्याने दर्शविले जाते. तथापि, दीर्घ कालावधीत, मागणी अधिक किंमत लवचिक होते आणि म्हणूनच चालू खाते सुधारण्यास प्रारंभ होतो. J वक्र हा मार्शल-लर्नरच्या स्थितीशी संबंधित आहे, ज्यामध्ये असे म्हटले आहे.

जर ($PED_X + PED_M > 1$) असेल तर अवमूल्यन चालू खात्यावर सुधारणा करेल. वेळ अंतर (Time lag) आर्थिक धोरणावर कसा परिणाम करते आणि उदाहरण म्हणजे J वक्र होय. हे सूक्ष्म आर्थिक तत्त्व (लवचिकता) आणि स्थूल आर्थिक परिणाम (चालू खाते) यांच्यातील दुवा देखील दर्शविते.

व्यवहार तोलावरील चालू खाते वस्तू व सेवाच्या निर्यात व आयातीचे निव्वळ मूल्ये आणि गुंतवणूक उत्पन्न मोजते.




आकृती क्र. ४.१ : अवमूल्यनाचा अल्पकालीन परिणाम

वरील आकृती ४.१ मध्ये OX अक्षावर मागणी नगसंख्या व OY अक्षावर वस्तूची किंमत दर्शविलेली आहे. DD हा मागणी वक्र आहे. आकृतीत किंमत OP वरून $OP_1$ पर्यंत अधिक प्रमाणात वाढते, तेव्हा मागणी नगसंख्या OQ वरून $OQ_1$ अशी अल्पशी कमी होते. किंमतीतील वाढीच्या प्रमाणापेक्षा मागणीतील घट अत्यल्प आहे. मागणी वक्र कमी लवचिक आहे.

अल्पावधीत निर्यातीच्या किंमतीतील घसरणीमुळे मागणी केलेल्या वस्तूंची संख्या अल्प प्रमाणात वाढेल. आयातीच्या किंमतीतील वाढीमुळे आयातीच्या मागणीत अल्प घट झाली आहे. म्हणूनच आयातीचे मूल्य प्रत्यक्षात वाढते. (आयातीवर खर्च अधिक होता) म्हणूनच मागणी अलवचिक असल्यास, घसारा कमी झाल्यास आपणास चालू खात्यात प्रत्यक्ष बिघाड झाल्याचा दिसून येतो.




**आकृती क्र. ४.२ : दीर्घकालीन परिणाम**

आकृती ४.२ मध्ये अवमूल्यनाचा/दीर्घकालीन परिणाम दर्शविला आहे. आकृतीत OX अक्षावर नगसंख्या OY अक्षावर किंमत दर्शविलेली आहे. किंमतीतील अल्प बदलामुळे ($P\ P_1$) मागणीत मोठा बदल ($Q\ Q_1$) घडून येतो. मागणी वक्र अधिक लवचिक आहे.

दीर्घकाळात निर्यातीची आणि आयातीची मागणी अधिक किंमत लवचिक होईल. म्हणजेच किंमतीबद्दल अधिक लवचिक होईल. म्हणून निर्यातीच्या किंमतीत घट झाल्यामुळे मागणीच्या नगसंख्येत मोठी (टक्केवारी) वाढ होईल. (म्हणून आपणांस निर्यात मूल्यात मोठी वाढ मिळेल.) जेव्हा मागणी लवचिकअसते, तेव्हा निर्यातीचे मूल्य वाढते आणि आपणास चालू खात्याच्या स्थितीत सुधारणा मिळते.

तसेच जर आयातीची मागणी ही किंमत लवचिक असेल तर आयातीच्या मागणीत जास्त टक्के घट होईल. या संबंधात आयातीवरील एकूण खर्च कमी होऊ लागतो.




**आकृती क्र. ४.३ इ व्यवहारतोल व चालू खाते**

वरील आकृती ४.३ मध्ये व्यवहारतोल व चालू खात्याची स्थिती दर्शविली आहे. आकृती जध ही अवस्था व्यवहारतोलातील शिल्लकीची स्थिती आहे. $OY_1$ ही तुटीची स्थिती आहे. a b या स्थितीत तुटीची अवस्था असताना चलनाचे अवमूल्यन केल्यास जर मागणीची किंमत लवचिकता एकापेक्षा कमी असल्यास अवमूल्यनामुळे चालू खात्यावर बिघाड निर्माण होतो. तर याउलट मागणीची किंमत लवचिकता एकापेक्षा अधिक असताना चलनाच्या अवमूल्यनामुळे चालू खाते सुधारण्यास मदत होते.

## ❑ व्यवहारतोल समायोजनाची शोषण/समावेश दृष्टिकोन (Mechanism of Absorption Approach to the Balance of Payment) :-

व्यवहारतोल समायोजनासाठी शोषण करण्याचा दृष्टिकोन हा सामान्य समतोल आहे. आणि तो केन्सवादी राष्ट्रीय उत्पन्न संबंधावर आधारित आहे. म्हणूनच याला केन्सवादी दृष्टिकोन असेही म्हटले जाते. अवमूल्यनाच्या एकूण परिणामांची चर्चा अवशोषण/शोषण दृष्टिकोनातून करणे सुरू आहे. सन १९५१ मध्ये अवशोषणाची ही कल्पना प्रथमत: सिडनी अलेक्झांडर यांनी मांडली. ही संकल्पना लवचिकता दृष्टिकोनाच्या किंमत परिणामाऐवजी अवमूल्यनाच्या उत्पन्न परिणामावर सुरू राहतो.

सिध्दांतानुसार एखाद्या देशाचा व्यवहारतोल तुटीचा असेल तर लोक उत्पादन करतात त्यापेक्षा अधिक अवशोषण करीत आहेत. उपभोग आणि गुंतवणूकीवरील देशांतर्गत खर्च हा राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा जास्त आहे. जर त्यांच्याकडे व्यवहारतोलात शिल्लक असेल तर ते कमी अवशोषण करतात. उपभोग आणि गुंतवणूकीवरील खर्च हा राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा कमी असतो. येथे व्यवहारतोलाची व्याख्या राष्ट्रीय उत्पन्न आणि देशांतर्गत खर्चामधील फरक म्हणून केली जाते. सिडनी अलेक्झांडरने या दृष्टिकोनाचे विश्लेषण खालील स्वरूपात स्पष्ट केले आहे.

$$Y = C + Id + G + X - M \quad \text{...............} \ (1)$$

येथे Y = राष्ट्रीय उत्पन्न, C = उपभोग खर्च.

Id = एकूण देशांतर्गत गुंतवणूक, G = स्वायत्त सरकारी खर्च.

X = निर्यात, M = स्वायत्त सरकारी खर्च.

C + Id + G ची बेरीज एकूण शोषण. _A_ म्हणून केले जाते आणि व्यवहारतोल (X – M) _B_ द्वारे नियुक्त केला जातो. समीकरण १ पुढीलप्रमाणे होईल.

$$Y = A + B$$

$$\text{Or} \quad B = Y - A \quad \text{...............} \ (2)$$

याचा अर्थ चालू खात्यावर व्यवहारतोल म्हणजे राष्ट्रीय उत्पन्न (Y) आणि एकूण अवशोषण (A) मधील फरक. एकतर देशांतर्गत उत्पन्न वाढवून किंवा अवशोषण कमी करून व्यवहारतोल सुधारू शकतो. यासाठी/हेतूसाठी अलेक्झांडर अवमूल्यनाचा सल्ला देतात. कारण ते दोन्ही मार्गांनी कार्य करते.

प्रथम, अवमूल्यनामुळे निर्यात वाढते आणि आयात कमी होते, ज्यायोगे राष्ट्रीय उत्पन्न वाढते. त्यामुळे व्युत्पन्न केलेल्या अतिरिक्त उत्पन्नामुळे गुणक परिणामाद्वारे उत्पन्न आणखी वाढेल. यामुळे देशांतर्गत उपभोगात वाढ होईल. अशाप्रकारे व्यवहारतोलावर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याचा निव्वळ परिणाम म्हणजे उत्पन्नातील एकूण वाढ आणि शोषणातील प्रेरित वाढ यामधील फरक. म्हणजे –

$$\Delta B = \Delta Y - \Delta A$$

एकूण अवशोषण ($\Delta A$) जेव्हा अवमूल्यन होते तेव्हा शोषणाच्या सीमांत प्रवृत्तीवर अवलंबून असते. हे A म्हणून व्यक्त केले जाते. उत्पन्नातील बदलाद्वारे अवमूल्यन देखील थेट परिणाम करते हे D द्वारे लिहिले आहे. म्हणून,

$$\Delta A = a\,\Delta Y + \Delta D \quad \text{...........} \ (4)$$

समीकरण ३ ला ४ पर्यायीकरण केल्यास आपणांस खालील समीकरण मिळेल.

$$\Delta B = \Delta Y - a\,\Delta Y - \Delta D$$

$$\text{Or} \quad \Delta B = (1 - a)\,\Delta Y - \Delta D \;\ldots\ldots\ldots.\; (5)$$

व्यवहारतोलावरील अवमूल्यनाच्या परिणामाचे स्पष्टीकरण करणाऱ्या तीन घटकांकडे हे समीकरण निर्देश करते. ते आहेत (i) शोषणाची सीमांत प्रवृत्ती (ii) उत्पन्नातील बदल ($\Delta Y$) आणि (iii) थेट शोषणातील बदल ($\Delta D$). हे लक्षात घेतले जाऊ शकते की, _a_ शोषूण घेण्याची सीमांत प्रवृत्ती (MP) असल्याने $1 - a$ = बचत करण्याची प्रवृत्ती आहे. हे घटक, त्याऐवजी, अविकसित देशातील बेरोजगार किंवा निष्क्रीय संसाधनाच्या आणि पूर्णपणे नियोजित संसाधनाच्या अस्तित्वामुळे प्रभावित होतात.

## ❑ अवमूल्यनाचे व्यवहारतोलावर परिणाम (Effects of Devaluation on BOP) :-

### १. शोषणाची सीमांत प्रवृत्ती :-

शोषणाची सीमांत प्रवृत्ती एकपेक्षा कमी असल्यास, देशातील निष्क्रिय संसाधनासह, अवमूल्यनामुळे निर्यात वाढेल आणि आयात कमी होईल. उत्पादन आणि उत्पन्न वाढेल आणि चालू खात्यावर व्यवहारतोल सुधारेल. जर शोषणाची सीमांत प्रवृत्ती एकापेक्षा अधिक असल्यास व्यवहारतोलाचा अवमूल्यनावर प्रतिकूल परिणाम असेल.

याचा अर्थ असा की लोक जास्त प्रमाणात शोषण करीत आहेत किंवा उपभोगावर अधिक खर्च करीत आहेत. अशा परिस्थितीत, अवमूल्यन केल्याने निर्यात वाढणार नाही आणि आयात कमी होणार नाही आणि व्यवहारतोलाची परिस्थिती आणखी बिकट होईल.

पूर्ण रोजगाराच्या स्थितीत जर शोषणाची सीमांत प्रवृत्ती एकपेक्षा जास्त असेल तर सरकारला अवमूल्यन करण्याबरोबरच खर्च कमी करण्याच्या धोरणात्मक उपायांचे पालन करावे लागेल, ज्यायोगे अर्थव्यवस्थेची संसाधने इतकी पुनर्निमित केली जातात की निर्यात वाढवणे आणि आयात कमी करणे, याचा परिणाम म्हणून व्यवहारतोल परिस्थिती सुधारेल.

### २. उत्पन्न परिणाम (Income Effects) :-

आपण अवमूल्यनाचे उत्पन्न परिणाम विचारात घेवूया. जर देशात निष्क्रिय संसाधने असतील तर, अवमूल्यन निर्यात वाढविते आणि अवमूल्यन देशाची आयात कमी करते. निर्यात व आयात प्रतिस्पर्धी उद्योगाच्या विस्तारासह उत्पन्न वाढते.

अर्थव्यवस्थेतील असे अतिरिक्त उत्पन्न गुणक परिणामाद्वारे उत्पन्न वाढविते. यामुळे व्यवहारतोलाच्या परिस्थितीत सुधारणा होईल. जर अर्थव्यवस्थेत संसाधने पूर्णपणे कार्यरत असतील तर अवमूल्यनामुळे

प्रतिकूल व्यापारतोल सुधारू शकत नाही कारण राष्ट्रीय उत्पन्न वाढू शकत नाही. त्याऐवजी किंमतीमध्ये वाढ होऊ शकते, त्यामुळे निर्यात कमी होईल व आयात वाढेल, ज्यामुळे व्यवहारतोलाची परिस्थिती आणखी बिघडू शकते.

### ३. व्यापार शर्तीचा प्रभाव (Terms of Trade Effect) :-

राष्ट्रीय उत्पन्नावर होणाऱ्या अवमूल्यनाचा परिणाम व्यापार अटीद्वारेही होतो. साधारणपणे अवमूल्यन व्यापाराच्या अटी बिघडवते. कारण अवमूल्यन देशाला पूर्वीएवढ्याच प्रमाणात आयात करण्यासाठी अधिक वस्तूंची निर्यात करावी लागते. परिणामी, व्यापार संतुलन बिघडते आणि राष्ट्रीय उत्पन्न घटते.

जर अवमूल्यनानंतर अन्य देशाच्या चलनात किंमती निश्चित केल्या गेल्या तर व्यापारातील अटी सुधारतात कारण निर्यात वाढते आणि आयात घटते. आयात करणारा देश आपल्या आयातीतून मिळालेल्या अवमूल्यन देशाच्या निर्यातीसाठी जास्त पैसे देतो. अशाप्रकारे अवमूल्यन केलेल्या देशाचे व्यापार संतुलन सुधारते आणि त्याचे राष्ट्रीय उत्पन्न वाढते.

### ४. थेट शोषण (Direct Absorption) :-

अवमूल्यन अनेक मार्गांनी थेट शोषणावर परिणाम करते. या अवमूल्यन करणाऱ्या देशाकडे निष्क्रिय संसाधने आहेत, निर्यातीत वाढ आणि आयात कमी होत असताना विस्तार प्रक्रिया सुरू होईल. परिणामी उत्पन्न वाढेल आणि शोषण होईल. उत्पन्नाच्या वाढीपेक्षा कमी प्रमाणात शोषण वाढल्यास व्यवहारतोल सुधारेल. सामान्यत: निष्क्रिय स्रोत असलेल्या देशात थेट शोषणावर अवमूल्यनाचा परिणाम महत्त्वपूर्ण नसतो. जर अर्थव्यवस्थेत पूर्ण रोजगार स्थिती असेल आणि त्यातही व्यवहारतोलात तूट असेल तर चलनाचे अवमूल्यन करून राष्ट्रीय उत्पन्न वाढविता येणार नाही. तर थेट शोषण कमी केल्याने व्यवहारतोलात सुधारणा होऊ शकते. वास्तविक रोख शिल्लक प्रभाव, पैशाचा भ्रम आणि उत्पन्नाच्या पुनर्वितरणामुळे अवमूल्यनाचा परिणाम म्हणून देशांतर्गत शोषण आपोआपच घसरते.

### ५. वास्तविक रोख शिल्लक प्रभाव (Real Cash Balance Effect) :-

जेव्हा एखादा देश आपल्या चलनाचे अवमूल्यन करतो, तेव्हा त्याच्या देशांतर्गत किंमती वाढतात. जर पैशाचा पुरवठा स्थिर राहिला तर लोकांद्वारे रोख रकमेचे खरे मूल्य कमी होते. त्यांचे रोख शिल्लक पुन्हा भरून काढण्यासाठी लोक अधिक बचत करण्यास प्रारंभ करतात. केवळ त्यांचा खर्च किंवा शोषण कमी केल्याने हे शक्य आहे. हा अवमूल्यन करण्याचा खरा रोख शिल्लक प्रभाव आहे.

जर लोकांकडे मालमत्ता असेल आणि अवमूल्यन केल्यास त्याची वास्तव रोख शिल्लक कमी होते, त्यामुळे ते त्याची विक्री करतात. यामुळे मालमत्तांचे दर कमी होतात आणि व्याज दरात वाढ होते.

यामुळे स्थिर पैशाचा पुरवटा होत असताना गुंतवणूक आणि उपभोग कमी होलि. परिणामी शोषण कमी होईल. हा अवमूल्यनाच्या वास्तव रोख शिल्लक प्रभावाचा मालमत्ता परिणाम आहे.

### ६. पैसा भ्रम परिणाम (Money Illusion Effects) :-

पैशाच्या भ्रमांचे अस्तित्व देखील थेट शोषण कमी करते. जेव्हा अवमूल्यनामुळे किंमती वाढतात, तेव्हा ग्राहकांना वाटते की, त्यांचे पैशातील उत्पन्न वाढले असले तरीही त्यांचे वास्तव उत्पन्न कमी झाले आहे. त्यांच्याकडे पैशाचा भ्रम आहे, ज्याच्या प्रभावाखाली ते त्यांचा उपभोग खर्च किंवा थेट शोषण कमी करतात.

### ७. उत्पन्न पुर्नवितरण प्रभाव (Income Redistribution Effect) :-

जर अवमूल्यन झाल्यास उच्च सीमांत बचत प्रवृत्ती असलेल्या लोकांच्या बाजूने आणि उपभोगासाठी उच्च सीमांत वाढ असलेल्या लोकांच्याविरुध्द उत्पन्न पुनर्वितरीत केल्यास थेट शोषण आपोआप घडून येते. जर कामगारांची सीमांत उपभोग प्रवृत्ती नफा मिळविणाऱ्यापेक्षा जास्त असेल तर शोषण कमी होईल. पुढे, जेव्हा कमी उत्पन्न गटातील लोकांचे उत्पन्न अवमूल्यनामुळे वाढते, तेव्हा ते उत्पन्न/आयकराच्या जाळ्यात येतात. जेव्हा ते आयकर भरण्यास प्रारंभ करतात, तेव्हा आधीपासून कर भरणा करणाऱ्या उच्च उत्पन्न गटातील लोकांच्या तुलनेत ते त्यांचा उपभोग कमी करतात. यामुळे आधीच्या बाबतीत शोषण कमी होते.

### ८. खर्च कमी करणारी धोरणे (Expenditure Reducing Policies) :-

सरकारने खर्च कमी करणाऱ्या आर्थिक-वित्तीय धोरणाचा स्वीकार केल्यास थेट शोषण कमी होते. ते व्यवहारतोलातील तूट कमी करण्यात यशस्वी ठरतील, परंतु त्यामुळे देशात बेरोजगारी निर्माण होईल.

## ४.२.२.२ धोरण बदलाद्वारे व्यवहारतोल समायोजन (BOP Adjustment through Policy Changes) :-

### ❑ व्यवहारतोल समायोजनासाठी मौद्रिक दृष्टिकोन :-

व्यवहारतोल समायोजनाचा मौद्रिक दृष्टिकोन म्हणजे व्यवहारतोलाचे सर्वांगीण स्पष्टीकरण आहे. पैशाची मागणी आणि पुरवठा या संदर्भात व्यवहारतोलातील बदलाचे स्पष्टीकरण या दृष्टीकोनाद्वारे दिले जाते. या दृष्टिकोनानुसार 'व्यवहारतोलातील तूट ही सर्वत्र आणि नेहमी मौद्रिक घटना असते' (A balance of Payments dificit is always and everywhere a monetary phenomenon) म्हणूनच ते केवळ मौद्रिक उपाययोजनांद्वारेच दुरुस्त केले जाऊ शकते.

## ❑ गृहितके (Assumptions) :-

हा दृष्टिकोनाखालील गृहितकांवर आधारित आहे.

१. वाहतुकीच्या खर्चास परवानगी दिल्यानंतर 'एका किंमतीचा कायदा' वेगवेगळ्या देशांमध्ये विकल्या गेलेल्या मान वस्तूंसाठी ठेवला आहे.

२. उत्पादन आणि भांडवलाच्या बाजारात उपभोगात पूर्ण पर्याय आहे जे प्रत्येक वस्तूंची एक किंमत आणि देशभरातील एकच व्याज दर याची खात्री देते.

३. देशाची उत्पादनाची पातळी बाह्य घटकांमुळे गृहित धरली जाते.

४. सर्व देश पूर्णत: रोजगारासाठी गृहित धरले जातात, जेथे वेतन किंमत लवचिकता पूर्ण रोजगारावर उत्पादन निश्चित करते.

५. असे मानले जाते की, निश्चित विनिमय दराखाली जागतिक स्तरावर एका किंमतीच्या नियमानुसार चलन प्रवाहाचे प्रभाव लोपन (Sterilisation) करणे शक्य नाही.

६. पैशाची मागणी ही साठा मागणी आहे आणि उत्पन्न, किंमती, संपत्ती व व्याजदराचे स्थिर फलन आहे.

७. नामपात्र पैशाच्या रकमेची मागणी ही नाममात्र उत्पन्नाचे सकारात्मक फलन आहे.

८. पैशाचा पुरवठा हा मौद्रिक आधाराचा गुणक आहे, त्यामध्ये देशांतर्गत पत व देशाच्या परकीय चलनसाठ्याचा समावेश आहे.

## ❑ सिध्दांताचे स्पष्टीकरण :-

वरील गृहीतके आधार मानून, पैशाची मागणी आणि पुरवठा यांच्यातील पुढील स्वरूपात मौद्रिक दृष्टिकोन स्पष्ट केला जाऊ शकतो.

पैशाची मागणी हे उत्पन्न (Y), किंमती (P) व व्याजदराचे (i) स्थिर फलन आहे.

$$Md = f(Y, P, i) \qquad ................ (1)$$

पैशाचा पुरवठा हा मौद्रिक आधार (M) चा एकाधिक गुण (multiple) आहे, ज्यामध्ये देशांतर्गत पैसा (पत) (D) व देशाचा परकिय चलनसाठा (R) असतात. निरंतर असलेल्या साधेपणासाठी मौद्रिक आधाराकडे (M) दुर्लक्ष करणे.

$$Ms = D + R \qquad ................ (2)$$

समतोल अवस्थेत पैशाची मागणी पैशाच्या पुरवठ्याइतकीच असते.

$$Md = Ms \quad ................ (3)$$

किंवा

$$Md = D + R (Ms) \quad ................ (4)$$

व्यवहारतोलातील तूट किंवा शिल्लक ही देशाच्या विदेशी चलनसाठ्यातील बदलाद्वारे दर्शविले जाते. म्हणून,

$$\Delta R = \Delta Md - \Delta D \quad ................ (5)$$

किंवा $\Delta R = B$ ................ (6)

येथे B व्यवहारतोल सादर करतो की जो पैशासाठीच्या मागणीतील बदल ($\Delta Md$) आणि देशांतर्गत पत ($\Delta D$) मधील बदल यामधील भेदाशी समान असतो. व्यवहारतोल तूट म्हणजे नकारात्मक B जो R आणि पैशाचा पुरवठा कमी करतो. दुसऱ्या बाजूला व्यवहारतोलातील शिल्लक म्हणजे सकारात्मक B जो R आणि पैशाचा पुरवठा वाढवितो. जेव्हा B = O, म्हणजे व्यवहारतोल समतोल होय. असमतोल नाही. मौद्रिक दृष्टिकोणामधील स्वयंचलित समायोजन यंत्रणा स्थिर व लवचिक विनिमय दर या दोन्ही पध्दतीद्वारे स्पष्ट केली जाते.

स्थिर विमिमय दर प्रणाली अंतर्गत असे गृहीत धरा की पैशासाठी मागणी (Md) = पैशाचा पुरवठा (Ms) जेणेकरून व्यवहारतोल समतोल असेल. (B = Zero) आता समजा, मौद्रिक अधिकाराने देशांतर्गत पैशाचा पुरवठा वाढविला, त्यावेळी पैशाच्या मागणीत कोणत्याही बदल नसेल. त्याचा परिणाम म्हणून पैशाच्या मागणीपेक्षा पैशाचा पुरवठा अधिक ($Ms > Md$) असले आणि तेथे व्यवहारतोलात तूट राहील. अधिक रोख शिल्लक असलेले लोक अधिक परदेशी वस्तू आणि रोखे खरेदी करण्यासाठी त्यांची खरेदी वाढवितात. यामुळे त्यांच्या किंमती वाढतील, वस्तूंची आयात व परकीय मालमत्तेत वाढ होईल. यामुळे व्यवहारतोलातील चालू व भांडवली खात्यांवरील खर्चात वाढ होईल. त्यामुळे व्यवहारतोलात तूट निर्माण होते.

स्थिर विनिमय दर कायम ठेवण्यासाठी मौद्रिक अधिकाऱ्यांना परकीय चलन साठा विकून देशी चलन खरेदी करावे लागेल. अशाप्रकारे परकीय चलनसाठा बाहेर जाण्याचा अर्थ म्हणजे R व देशांतर्गत पैशाच्या पुरवठ्यात घट होय. ही प्रक्रिया Ms = Md होईपर्यंत सुरू राहील व तेथे पुन्हा व्यवहारतोल समतोल घडून येईल. दुसरीकडे, दिलेल्या विनिमय दरानुसार $Ms < Md$ असल्यास व्यवहार तोलात शिल्लक असेल. यामुळे लोक परदेशी वस्तू व रोखे विकून देशांतर्गत चलन मिळवतात. ते त्याच्या उत्पन्नाच्या तुलनेने खर्च मर्यादित करून स्वत:जवळ अधिक पैसा बाळगतील. मौद्रिक अधिकारी त्यांच्या धोरणाचा एक भाग म्हणून देशांतर्गत चलनाच्या बदल्यात जादा परकीय चलन खरेदी करतील. येथे परकीय चलन साठ्याचा प्रवाह व देशांतर्गत पैशाचा पुरवठा वाढेल. ही प्रक्रिया पैशाचा पुरवठा = पैशाची मागणी

(Ms = Md) होईपर्यंत चालू राहील व व्यवहातोल समतोल पुन्हा पुनर्संचयित होईल. अशाप्रकारे व्यवहारतोलातील तूट किंवा शिल्लक ही एक तात्पुरती घटना आहे व दीर्घकाळात स्वयंचलित व स्वयंदुरुस्त होते.




**आकृती क्र. ४.५ : (अ) व (ब)**

वरील आकृती A मध्ये Md हा स्थिर पैशाच्या मागणीचा वक्र आहे. Ms हा पैशाच्या पुरवठ्याचा वक्र आहे. M (D) ही क्षितीज समांतर रेषा ही मौद्रिक आधार दर्शविते, जी देशांतर्गत पत गुणक आहे जो D आहे, तो स्थिर आहे. हा पैशाच्या पुरवठ्यातील देशांतर्गत घटक आहे म्हणून Ms पैशाचा पुरवठा वक्र C बिंदूपासून सुरू होतो.

Ms आणि Md वक्र E बिंदूत एकमेकांना छेदतात, जेथे देशाचा व्यवहारतोल समतोल असतो व त्याचा परकीय चलनसाठा OR एवढा असतो. B आकृतीत PDC हा देयकाला असमतोल वक्र आहे. जो आकृती A च्या Ms व Md वक्रांमधील उभा (Vertical) फरक म्हणून रेखाटली आहे. जसे की आकृती A मधील $B_0$ हा A आकृतीमधील E बिंदूशी संबंधित आहे, जेथे व्यवहारतोलात असमतोल नाही.

आकृती A मध्ये Ms < Md असल्यामुळे SP हे व्यवहारतोलातील अतिरिक्त (Surplus) असेल यामुळे परकीय चलन साठ्याचा आरंभ होतो, जो $OR_1$ पासून OR पर्यंत कमी होतो, त्यामुळे पैशाचा

पुरवठा वाढतो व E बिंदूत व्यवहारतोलाचा पुर्नसमतोल घडून येतो. दुसरीकडे Ms > Md असल्यास DF एवढी व्यवहारतोलात तूट निर्माण होते.

परकीय चलन साठ्याचा ओघ बाहेर गेला आहे जे $OR_2$ ते OR असा कमी होतो व त्यामुळे पैशाचा पुरवठा घटून व्यवहारतोल समतोल पुर्नस्थापित होवून E बिंदूत राहतो. आकृती B मध्ये ही सर्व प्रक्रिया दाखविली आहे. तेथे व्यवहारतोल असमतोल आपोआप दुरूस्त होतो, जेव्हा $B_1$ $S_1$ शिल्लक व $B_2$ $D_1$ तूट समान होतात.

किंमत वाढीमुळे पैशाची मागणी वाढते व त्याद्वारे परकीय चलन साठ्याचे कोणतेही प्रवाह न ठेवता Md व Ms ची समानता होते. याउलट जेव्हा Md > Ms होते, तेव्हा किंमतीत घसरण होते व देशातील चलनाचे उर्ध्वमूल्यन होते जे पैशाची मागणी आपोआप काढून टाकते. विनिमय दर Md = Ms व व्यवहारतोल समतोल होईपर्यंत परकीय चलन साठ्याच्या प्रवाहाशिवाय कमी होते.

## ❑ टीकात्मक परीक्षण :-

व्यवहारतोल समायोजनाच्या मौद्रिक दृष्टिकोनावर पुढील मुद्दयांच्या आधारे टीका केली जाते.

१. **पैशाची मागणी स्थिर नाही :** पैशाची स्थिर मागणी केली जाते, यावर टीकाकार सहमत नाहीत. पैशाची मागणी दीर्घकाळात स्थिर असते परंतु अल्पकाळात जेव्हा ती बदलते तेव्हा स्थिर असत नाही.

२. **पूर्ण रोजगार शक्य नाही :** पूर्ण रोजगाराचे गृहितक मान्य नाही, कारण देशात अनैच्छिक बेरोजगारी अस्तित्वात असते.

३. **एक किंमत नियम अवैध :** फ्रँकेल व जॉन्सन यांच्या मतानुसार विकल्या जाणाऱ्या एकसारख्या समान वस्तूंसाठी एकाच किंमतीचा नियम अवैध आहे, कारण जेव्हा उत्पादन घटक व्यापार नसलेल्या वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या क्षेत्राकडे आकर्षित केले जातात, तेव्हा व्यापार नसलेल्या वस्तूंची जास्त मागणी व्यापारातील वस्तूंच्या पुरवठ्यात कमी होते. यामुळे आयात जास्त होईल व सर्व व्यापार वस्तूच्या किंमतीच्या नियमात अडथळा येतो.

४. **बाजारातील अपूर्णता :** टीकाकारांच्या मते, बाजारात अपूर्णता असते. ज्या वस्तूच्या व्यापारासाठी अनेक बाजारात समान किंमत नियम योग्यरित्या कार्य करण्यास प्रतिबंध असतो, तेथे बाजारात अपूर्णता असते. किंमत भेद व बाजार माहितीचा अभाव यामुळे किंमतीत फरक असतो.

५. **प्रभावलोपन (Sterilisation) शक्य नाही :** स्थिर विनिमय दरानुसार चलन प्रवाहाचे निर्जुंतुकीकरण शक्य नाही. हे टीकाकारांनी स्विकारले नाही.

६. **व्यवहारतोल व पैशाचा पुरवठा यांच्यात जोडणी वैध नाही :** मौद्रिक दृष्टिकोन हा देशाच्या व्यवहारतोल व एकूण पैशाचा पुरवठा यांच्यातील प्रत्यक्ष जोडणी (direct link) वर आधारित असतो, असा प्रश्न अर्थशास्त्रज्ञांनी केला आहे.

७. **अल्पकाळाकडे दुर्लक्ष :** मौद्रिक दृष्टिकोन व्यवहारतोलामधील स्वदुरुस्त दीर्घकाळाच्या समतोलाशी संबंधित आहे. हे अवास्तव आहे, कारण अर्थव्यवस्था नवीन समतोल संपादन करण्यासाठी अल्पकालावधीचे वर्णन करण्यात अयशस्वी ठरते.

८. **इतर घटकांकडे दुर्लक्ष :** हा दृष्टिकोन सर्व वास्तविक व रचनात्मक घटकाकडे दुर्लक्ष करतो, ज्यामुळे व्यवहारतोलामध्ये असमानता निर्माण होते व केवळ देशांतर्गत पतपुरवठ्यावर लक्ष दिले जाते.

९. **आर्थिक धोरणाकडे दुर्लक्ष :** हा दृष्टिकोन व्यवहारतोल समतोल करण्यासाठी देशांतर्गत पतची भूमिकेवर भर देतो व आर्थिक धोरण उपायांकडे दुर्लक्ष करतो. प्रा. क्यूरी यांच्या मते, व्यवहारतोल समतोल हा वास्तविक प्रवाह व सरकारी अर्थसंकल्पातून खर्चात बदल करून मिळविता येतो.

या टीका असूनही मौद्रिक दृष्टिकोन वास्तविक आहे, कारण यामध्ये देशांतर्गत पैसा व परदेशी पैशाचा विचार केला जातो. प्रासंगिक किंमतीतील बदलांवर भर दिला जात नाही, परंतु ज्या प्रमाणात वास्तव पैशाच्या शिल्लक ठेवण्याची मागणी केली जाते ती अंतर्गत स्रोतांकडून, पत तयार करण्याद्वारे किंवा बाह्य स्रोताकडून व्यवहारतोल शिल्लक किंवा अतिरिक्त तूटद्वारे पूर्ण केला जाईल.

## ४.२.३ आर्थिक एकीकरण किंवा सहकार्य (Economic Integration or Co-operation) :-

आर्थिक एकात्मता किंवा एकीकरण म्हणजे वेगवेगळ्या राज्यांमधील आर्थिक धोरणांचे एकत्रिकरण, शुल्कांची अंशत: किंवा पूर्ण उन्मूलन आणि व्यापारावरील शुल्क नसलेले निर्बंध होय.

आर्थिक एकत्रीकरणाच्या हेतूने केलेला व्यापार-उत्तेजन परिणाम हा समकालीन आर्थिकदृष्ट्या सर्वोत्कृष्ट सिद्धांताचा एक भाग आहे, तिथे सिध्दांतानुसार, सर्वोत्तम पर्याय म्हणजे मुक्त व्यापार, मुक्त स्पर्धा आणि कोणताही व्यापार अडथळा नसतो. मुक्त व्यापारास एक आदर्शवादी पर्याय मानले जाते, परंतु काही विकसित राज्यात जरी हे समजले गेले असले तरी जागतिक एकत्रीकरणासाठी संपूर्ण आर्थिक व्यापारात अडथळे नसलेले आर्थिक एकीकरण हा दुसरा सर्वोत्कृष्ठ पर्याय मानला जात आहे.

कल्याणकारी पातळी वाढविण्याच्या उद्दिष्टाने वितरक व ग्राहकांना कमी किंमतीत आणण्यासाठी आर्थिक एकात्मता म्हणजे राज्यांची आर्थिक उत्पादकता वाढविणे.

देश आर्थिकदृष्ट्या एकत्रीकरणास येण्याची आर्थिक आणि राजकीय कारणे देखील आहेत. आर्थिक संघटनांच्या सदस्य देशांमधील व्यापार वाढीसाठी असणारा आर्थिक युक्तिवाद एकीकरणातून, उत्पादित नफ्यावर अवलंबून आहे. जागतिक स्तरावर आर्थिक एकत्रीकरणाच्या विकासासाठी हे एक कारण आहे. आता ASEAN, NAFTA, SACN, युरोपियन युनियन, AFCFTA आणि युरेशियन इकॉनॉमिक कम्युनिटीसारख्या खंडातील आर्थिक गटांमध्ये ही घटना घडली आहे आणि पूर्व आशिया व TRAN साठी व्यापक आर्थिक भागिदारीसारख्या आंतरखंडीय आर्थिक गटांसाठी प्रस्ताव ठेवला आहे.

## ❑ आर्थिक एकीकरणाचे स्वरूप (Forms of Economic Integration) :-

I. **NAFTA :** नॉर्थ अमेरिकन फ्री ट्रेड ॲग्रीमेंट हा कॅनडा, मेक्सिको आणि अमेरिकेने केलेला करार आहे. जो उत्तर अमेरिकेत त्रिपक्षीय व्यापार गट तयार करतो. हा करार १ जानेवारी १९९४ रोजी अस्तित्वात आला आणि १९९८ ला कॅनडा व अमेरिका मुक्त वापर करारास मान्यता दिली.

II. **ASEAN : दक्षिणपूर्व आशियाई देशाची संघटना :** दक्षिण पूर्व आशियातील दहा देशांचा समावेश असलेली एक प्रादेशिक आंतरशासकीय संस्था आहे. जे आंतरराज्यीय सहकार्यास प्रोत्साहन देते आणि आशियामधील त्याचे सदस्य आणि इतर देशांमध्ये आर्थिक, राजकीय, सुरक्षा लष्करी, शैक्षणिक आणि सामाजिक सांस्कृतिक एकीकरण सुलभ करते. ८ ऑगस्ट १९६७ रोजी या संस्थेची स्थापना झाली.

III. **SCM (Southern Common Market) : दक्षिणाई सामुदायिक बाजार :** अर्जेंटिना, ब्राझील, पराग्वे, उरूखे, व्हेनेझुएला आणि बोलिव्हिया या देशांचा समावेश आहे.

IV. **CACM (Central American Common Market) : मध्य अमेरिकन सामुदायिक बाजार :** कोस्टारिका, अल साल्वाडोर, ग्वाटेमाला, होंडूरास आणि निकारागुआ या विभागांचा समावेश आहे.

